

नांदेड वाघाळा महानगरपालिका

लेखा परीक्षण अहवाल

2013-2014

उप संचालक,(मनपा लेप) उपविभाग - 3, स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे नांदेड वाघाळा महानगरपालिका यांनी 2013-2014 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड सन 2013-14 या वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल

जा.क्र.स्था.-18/ब/लेखापरिक्षण अहवाल/2013-2014/137 दिनांक :-05.03.2018.

उपसंचालक(मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरिक्षा,
औरंगाबाद उपविभाग क्रं.3 यांचे
कार्यालय,
तिसरा मजला,लेखा कोष
भवन,फाजीलपुरा,

औरंगाबाद.

प्रति,
मा.आयुक्त,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण श्री.ए.आर.ऐनवाड, सहायक संचालक यांच्या पथकाने दि.20/10/2016 ते दि. 29/12/2017 या कालावधीत पूर्ण केले व श्रीमती वंदना हरिहरराव जोशी, उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद उपविभाग-3 यांनी दि.08/01/2018 रोजी मा.आयुक्त नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचेशी चर्चा करुन अंतिमीकरण केले.

लेखापरिक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी कार्यरत होते.

अ.क्र.	नाव	पदनाम	कालावधी
1.	श्री.जी.श्रीकांत	प्रशासन अधिकारी तथा आयुक्त	01/04/2013 ते 31/03/2014
2.	श्री.अ. सत्तार अ. गफूर	महापौर	01/04/2013 ते 31/03/2014

लेखापरिक्षणात आढळलेल्या महत्वाच्या अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने व वित्त विभाग शासन निर्णय क्र.स्थानिले-2010 /प्र.क्र.26ब/विमा प्रशासन मंत्रालय मुंबई दि.31/03/2011 नुसार राज्यातील महानगरपालिकेचे लेखापरिक्षण, संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी मा. नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे मार्ग दर्शन व पर्यवेक्षणाखाली करावयाचा निर्णय घेतला आहे, यापूर्वी सन 2011-2012 व सन 2012-2013 या वित्तिय वर्षाचे लेखापरिक्षण पूर्ण करण्यात येऊन अहवाल निर्गमित करण्यात आलेले आहेत.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड ही स्थानिक स्वराज्य संस्था सन 1997 पासून अस्तिवात आलेली असून महानगरपालिकेचा दर्जा "ड" वर्ग आहे. महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र हे एकूण 04 प्रभागात विभागलेले असून एकूण 81 नगरसेवक आहेत. सन 2013-2014 या वित्तिय वर्षाच्या लेखापरिक्षणाच्या सखोल तपासणीकरिता माहे मार्च-2014 हा महिना निवडक घेण्यात आला आहे. लेखापरिक्षणाच्या अखेर च्या दिवसापर्यत पथकाने एकूण 217 अर्धसमास ज्ञापन निर्गमित करण्यात आली असून त्यापैकी एकूण 65 अर्धसमास ज्ञापनाची उत्तरे लेखापरिक्षणास सादर करण्यात आली आहेत. सदर अर्धसमास ज्ञापनास वेळीच उत्तरे सादर करुन लेखापरिक्षणास सहकार्य करण्यास महानगरपालिकेच्या बांधकाम,पाणीपुरवठा विभागांनी मोठ्या प्रमाणावर उदासिनता दाखविलेली आहे. बांधकाम, पाणीपुरवठा या विभागाकडुन अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. सन 2013-2014 या वित्तिय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात एकूण 136 परिच्छेद नोंदविण्यात आहेत. त्याबाबतच्या निवडक परिच्छेदांचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

1.नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने सन 2013-2014 या वित्तिय वर्षात रक्कम रु.132.37 कोटी एवढी जमा दर्शविली असून खर्च रक्कम रु.133.15 कोटी दर्शविण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकातील रकमा या वास्तववादी नसल्याचे दिसून येते. अर्थसंकल्प तयार करताना वस्तुनिष्ठ व अचुकतेने करण्याची योग्य खबरदारी घेण्यात आलेली नाही तसेच मुळ अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेल्या अंदाजित जमा रकमा या वास्तववादी न दर्शविता मोठ्या प्रमाणावर वाढ करुन दर्शविलेल्या आहेत त्या आधारे अपेक्षित खर्च हा त्या प्रमाणात जादा दर्शविला गेलेला आहे. महिला व बालकल्याणसाठी 5% अपंगासाठी 3% व आर्थिक दुर्बल घटकांसाठी 5% निधी खर्च करणे आवश्यक असताना सदर घटकांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात आलेला नाही. अर्थसंकल्प हा वस्तुस्थितीवर आधारीत असणे आवश्यक आहे व ज्या बाबी करणे शक्य आहे त्यांचाच समावेश अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे.यावरुन अर्थसंकल्पीय नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते.

2.महाराष्ट्र शासन,नगरसचिव विभाग शासन निर्णय क्रमांक लेखास-102004 /प्र.क्र.5 /नावि-31 / दि.06/ 07/2005नुसार, "ड" वर्ग दर्जाच्या महानगरपालिकांनी दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे अद्यावत ठेवण्याबाबतची अंमलबजावणी ही सन 2006-2007 चे आर्थिक वर्षापासून करणे अनिवार्य होते. मात्र नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी सन 2013-2014 या वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत उपरोक्त शासन निर्देशा प्रमाणे आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अद्यावत ठेवले नसल्याची अनियमितता कायम आहे. महानगर पालिकेचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवणे बंधनकारक असतांना शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

3.नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या लेखा विभागाचे सन 2013-2014 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षणात शासकीय योजनांचा निधी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002 / प्र.क्र.128/ अर्थोपाय, मंत्रालय मुंबई-32/दि. 06 जून 2008 नुसार एका आर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेला निधी लगतच्या आर्थिक वर्षाअखेर खर्च करण्याची अनुमती आहे. तदनंतर निधी अखर्चित राहिल्यास सदर निधी शासनखाती भरणे बंधनकारक आहे. अशी तरतूद असताना महानगरपालिकेने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार प्रपत्र 139 मध्ये कामाची नोंदवही ठेवून कामाची नोंद घेणे, नियम 138 अन्वये मौल्यवान व वस्तु व रोख रकमा हाताळणारे कर्मचारी यांचे कडून वैयक्तिक बंधपत्र घेणे, नियम 191 नुसार अनामत रकमेबाबत ठेवीच्या स्वरुपात ठेव नोंदवहीत नोंदी घेऊन अदयावत करणे,इत्यादीबाबत नोंद घेणे आवश्यक आहे. तशा नोंदी घेतल्याची कार्यवाही महा नगरपालिकेने केलेली नाही. 5.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.जी.ई.एन.1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि.03/11/2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. तथापि महानगरपालिकेने सन 2013-2014 मध्ये तसे विमापत्र प्राप्त केलेले नाही. परिपत्रकात नमूद केल्यानुसार शासकीय विमा निधीकडील विमापत्र सादर करुन परिपत्रकातील सुचनेनुसार 1 टक्के रक्कम कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असताना महानगरपालिकेने ब-याच प्रकरणामध्ये त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही

6.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.विद्ययो/10200/1592/ प्र.क्र.189/ नावि-4/ दि 5 मार्च-2002 दलीतवस्ती सुधार योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीचे प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीत अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या 50% किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असल्याची अभिलेखे लेखापरीक्षणात पहावयास मिळाली नाहीत. अशा वस्त्यामध्ये रस्ते डांबरीकरण,सिमेंट नाली बांधकाम इ.सुविधांकरिता मार्गदर्शक तत्वानुसार अनुदानातून

मुलभुत सुविधाविषयक कामे करावीत असे निर्देशीत केले आहे. तथापि उपरोक्त मार्गदर्शक तत्वानुसार कामे पूर्ण झालेबाबतची कार्यवाही झाली नाही.

7.महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहीता 1971 चे नियम 182 नुसार बांधकाम विभागाने नमूना नंबर 139 मध्ये नोंदवही ठेऊन पूर्ण् झालेल्या कामाच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापी विभागाने अशा ब-याच प्रकरणा बाबत नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर कामाची नोंद नमूना नंबर 139 मध्ये करण्यात आली नाही.

8.श्री.सुरज इंटरप्राईजेस नांदेड यांना कमी दराची निविदा प्राप्त होऊन त्यांना बीआरजीएफ योजनेअंतर्गत नांदेड-वाघाळा महानगरपालिका हद्दीत शहरातील कब्रस्तानच्या आवार भिंतीचे बांधकाम व विकास करणे कामी प्रभाग क्र.5 अंतर्गत कामाचे आदेश दि.20.10.2011 रोजी दिले व त्यांनी प्रत्यक्षात दि.28.10.2011 रोजी काम सुरु केले व दि.12.07.2013. काम पुर्ण केले. तथापि कंत्राटदाराने कामाचे आदेशानंतर तब्बल नऊ महिन्यानंतर कामातील संयुक्तिक अडचण मांडली त्यामुळे काम बंद होते बांधकामाबाबत वेळीच पाहणी केली असती तर सदरची अडचणीचे वेळीच निर्मूलन करणे शक्य झाले असते. सदर कार्यालयाचे पत्र क्र.6406 दि.01.09.2012 अन्वये दि.04.09.2012 पर्यत काम पुर्ण न झाल्यास रु.500 प्रतिदिवस दंड आकारण्यात येईल असे म्हटले आहे व केवळ रु.2000/- दंड आकारणी केली आहे. अगोदर नमूद केल्यानूसार दि.22.07.2012 पासून (म्हणजेच 349 दिवसाचा) दंड आकारणे योग्य होते तरी रु.174500/- दंड आकारणी करणे आवश्यक आहे.

9.शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-10/2006/प्र.क्र.133/इमारती-2दि-02.11.2006 नुसार रु.5 लक्षावरील बांधकामासाठी निविदा सूचना कालावधी किमान 15 दिवसांचा देणे आवश्यक आहे.तथापि बहुतांश प्रकरणी उपरोक्त शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

10.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 470 नुसार निविदा जास्त खपाच्या किमान दोन वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे तथापि ब-याच प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही

11.मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट करारनामा रु.10 लाखापर्यत साठी रु.100 चे मुद्रांकावर व रु.10 लाखाचे वर असेल तर रु.100 अधिक 10 लाखाचे पुढील प्रत्येक लाखासाठी रु.100 अधिकतम रु. 5 लाखाच्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे तथापि काही प्रकरणी कमी मुद्रांक शुल्क घेण्यात आले असून कमी मुद्रांक शुल्क वसुल करुन "0030 मुद्रांक व नोंदणी" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे

12.सेवापुस्तकातील नोंदी अचुकरित्या नोंद घेणेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 नियम 38(1) (4) शासकीय कर्मचा-याच्या संबंधीत महत्वाच्या गोष्टींच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात याव्यात जसे नेमणूक, सर्व प्रकारच्या पदोन्नत्या/वेतनवाढी, बदल्या, रजा इत्यादींची नोंद वेळच्यावेळी घेतली पाहीजे. रजेचा सविस्तर लेखा देखील ठेवला पाहीजे अशी प्रत्येक नोंद यथोचितरीत्या पडताळून कार्यालय प्रमुखाने साक्षांकीत करणे आवश्यक असताना अशा प्रकारची कार्यवाही कार्यालयाकडुन झालेली नाही.

13.मुंबई प्रांतिक महानगरपालीका अधिनियम-1949 नुसार ज्येष्ठता / पात्रता विहीत करण्यात येतील अशा भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहीत नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्या पासून सुट मिळणे इ.वेळोवळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेश पूर्ण किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणे तसेच विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे, शासन अधि सुचना सामान्य प्रशासन विभाग क्र.सेप्रनि/1098/प्र.क्र.7/98/12 दि 25.01.1999 अनुसार एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण, तसेच शासन निर्णय क्र.एन.व्ही.बी.3097 /1469/प्र.क्र.181/97/वि-22/दि.05 एप्रिल1999 अनूसार एल.एस.जी.एस.परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती नियम 1981 अनुसार) पदोन्नतीच्या पदासाठी विहीत करण्यात आलेली ज्येष्ठता, अर्हता पात्रता परीक्षा या सर्व बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे अशा प्रकारची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेली नाही.

14.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 3 मधील (6)(1)(2) अन्वये लेखापरिक्षणास सर्व प्रमाणके कागदपत्रे व अभिलेख स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारीत) अधिनियम-2011कलम (6) नुसार स्थानिक प्राधिकरणाने लेखापरिक्षणास अभिलेख सादर करणे आवश्यक आहे. तथापि,लेखापरिक्षण दरम्यान लेखा विभागाकडील निवड महिन्यातील मुळ प्रमाणकांची एकूण रक्कम रु.150925992/-एवढया रकमांच्या प्रमाणका संबंधित संचिका / अभिलेख लेखापरिक्षण पथकास सादर करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे त्यावर अभिप्राय देण्यात आलेले नाहीत.

15.नांदेड वाघाळा महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालयातील वसुली बाबत तसेच महानगरपालिका लेखा सहिता 1971 चे नियम 9(3), 9(7), 9(8), 9(3), 9(4) चे पालन केल्याचे निर्देशनास आले नाही. वसुली लिपिकाने वसुल केलेल्या कराची रक्कम अचानकपणे वसुली निरीक्षकांने किंवा विभाग प्रमुखाने तपासणी करणे, रोजच्या विलंबाने जमा केलेबाबत खात्री करणे, जमा रक्कम विलंबाने जमा केलेबाबत शास्ती लावणे अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. वसुली व थकबाकीचे विवरणपत्र मागणी करुनही उपलब्ध करुन न दिल्याने थकबाकी व वसुलीची टक्केवारी याबाबत माहिती होवू शकली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखांसहिता 1971 चे नियम 76 मधील तरतूदीप्रमाणे मागील वर्षाच्या कराची थकबाकी रक्कमा पुढील वर्षाच्या मागणी नोदवहित अचूकपणे घेतल्याबाबत सक्षम अधिकारी यांनी खात्री करुन तशा

आशयाचे प्रमाणपत्र प्रत्येक मागणी नोदवहित नोदविणे आवश्यक असताना नियमानूसार उचित कार्यवाही महानगरपालिकेकडून झालेली नाही. तसेच थकीत करदाते यांची संख्या व रक्कम, व्यापारी संस्था उदा. मोबाईल टॉवरधारक, मंगल कार्यालय ई. संस्थाकडील थकबाकी बाबतची माहिती विवरणपत्रा अभावी करता आली नाही. श्री. राजु जोरवर, वसुली लिपीक यांच्याकडील पावती पुस्तक क्रमांक. 7972 पावती क्रमांक 62 ते 64दिनांक 19.03.2014 जमा रक्कम रुपये 11,110/-, 20/- रक्कमेचे चलन तसेच मुख्य रोखपाल पावती पुस्तक क्रमांक 7992 मधील पावती क्रमांक 89,90 दिनांक 31.03.2014 रक्कम रुपये अनुक्रमे 8476/- व 8476/- अशी एकुण रक्कम 28,102/- तसेच इतवारा प्रभाग रोख शाखेचे दिनांक 18.03.2014 रुपये 500/- वदिनांक 03.03.2014 रुपये 100/- घनकचरा जमा रक्कमेचे चलन तपासणीस उपलब्ध झाले नाही, प्रथम दर्शनी संशयीत अपहार दिसून आला.

6.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसुची ड चे प्रकरण 3 मधील (6) (1) (2) अन्वये लेखापरिक्षणास सर्व प्रमाणके कागदपत्रे व अभिलेख स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे.तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारीत) अधिनियम-2011 कलम (6) नुसार स्थानिक प्राधिकरणाने लेखापरिक्षणास अभिलेख सादर करणे आवश्यक आहे. तथापि, लेखापरिक्षण दरम्यान परिच्छेद क्रमांक 53 ते 64 मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुळ खर्चाच्या योजना निहाय 1.आयडीएसएमटी रक्कम रु.11765459/-, 2.तेरावा वित्त आयोग रु.91395532/-, 3.ई-गर्व्हेणस रु.2949100/-, 4.खासदार निधी रु.43638/-, 5.विशेष अनुदान रु.20000000/-, 6.स्वच्छता अभियान घनकचरा व्यपस्थापन रु.112277782/- व 7.पाणीपुरवठा मल-निस्सारण रु.126922039/- एवढया रकमां च्या प्रमाणका संबंधित संचिका/अभिलेख लेखापरिक्षण पथकास सादर करण्यात आलेल्या नाहीत.

17. सन 2013-2014 मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिमेच्या योजनेसाठी शासना कडून(केंद्र व राज्य) अनुज्ञेय असलेले अनुदान हे मंजूर प्रकल्प कामनिहाय प्राप्त झालेले आहे. फेब्रु-2011 च्या मार्गदर्शक तत्वाच्या तरतुदीनुसार अनुदानाच्या प्राप्त रक्कमा या शासनाने ज्या प्रयोजनासाठी (प्रकल्प / कामे) मंजूर केले आहे त्याच प्रयोजनासाठी महानगरपालिकेने वापरावयाचे असल्याचे स्पष्ट निर्देश असतांना महानगरपालिकेने कर्मचा-याच्या वेतनासाठी नियमबाहयरित्या रक्कम रु.11774047/- खाते क्रमांक 318010200000213 मध्ये वर्ग करुन खर्च करण्यात आलेली आहे. सदर योजना दि 31/03/2012 रोजी संपुष्टात आलेली आहे तरी महानगरपालिकेने कर्मचा-याच्या वेतना पोटी खर्च केलेली रक्कम रु.11774047/- व अखर्चित रक्कम रु.12957502/- अशी एकत्रित एकूण रक्कम रु.24731549/- शासनखाती भरणा केलेली नाही, त्यामुळे शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी ज्या प्रयोजनार्थ, ज्या प्रकल्प कामासाठी उपलब्ध करुन दिला होता त्या प्रकल्प कामी वापरात न आणता तो निधी इतर नियम बाहय वेतनावर खर्च केल्यामुळे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम या योजनेचा मुळ हेतू साध्य झाला नाही.

18.महानगरपालिकेच्या विधी विभागाने विधीज्ञ नियुक्त केलेले आहेत. विभागाकडून विधीज्ञांना फि च्या रुपात अदा केलेल्या रकमाच्या देयकातून आयकराची रक्कम रु.1736362/- व झोपडपटी सुधार योजना (BSUP) अंतर्गत ठेकेदारांच्या देयकातून BSUP विभागाने आयकराची रक्कम रु.811476/- अशी एकूण आयकराची रक्कम रु 2547838/- वसुल केलेली नाही.

19.अधिकारी / कर्मचारी यांचेकडे थकीत असलेल्या अग्रीम रकमांची अदयापपावेतो अग्रीमाची एकूण रक्कम रु.19758662/- वसुली झालेली नसून सदर रक्कम लेख्याबाहेर राहिलेली आहे. समायोजन अभावी सदरच्या अग्रीम रकमांचा खर्च त्याच प्रयोजनासाठी झाला असे म्हणता येत नाही.

20.सन 2013-2014 या आर्थिक वर्षात विदयुत विभागाकडून शहरामध्ये झोन क्रमांक 01 ते 06 च्या देयकामधील रस्त्यावरील स्ट्रीट लाईट (पोलवरील लाईट) लावण्यात आलेल्या देयकामध्ये ब-याच प्रमाणात वीज वितरण कंपनीकडून देण्यात आलेल्या वीज बिलामध्ये व्याजाची व थकबाकीची आकारणी केलेली दिसून येते. परंतु विभागाने दिलेल्या वीज देयकामध्ये ब-याच प्रमाणात बिलामधील चालू महिन्यातील देयकाची रक्कम अदा केली असून मागील थकबाकी / व्याज अदा न केल्यामुळे विदयुत मीटरमधील देयकातील व्याजाची रक्कम रु.1143917/- व थकबाकीची रक्कम रु.6527473/- अशी एकूण व्याज व थकबाकीची रक्कम रु.7671390/- एवढी झालेली आहे. विभागाने विदयुत देयके वेळेवर अदा केली असती तर थकबाकी / व्याजाचा भूर्दड तसेच दायित्वामध्ये होणारी वाढ टाळता येणे शक्य झाले असते. याबाबत वेळीच योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.

21.मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम 1949(सुधारणा 2011)चे कलम 106(3)नुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर महानगरपालिकेने सर्व लेख्यावरील आपला अभिप्राय असलेला अहवाल तयार करुन मा.स्थायी समितीस सादर करावयाचा आहे. मात्र सन 2013-2014 चा लेख्यावरील अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती समोर सादर केला नसल्याची अनियमितता झालेली आहे.

22.सन 2013-2014 या आर्थिक वर्षात विदयुत विभागाने शासन निर्णय उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्र भाखस-1088(2522) उदयोग-6 दि.02 जानेवारी 1992 मधील परिशिष्ट 10 : 6 व परिशिष्ट 11 नुसार इलेक्ट्रिक साहित्य हे लघुउद्योगाकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात आलेले आहेत असे असूनही लघुउद्योगाजकाकडून साहित्य खरेदी केलेले नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 10 (फ) नुसार महापालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हित संबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल, अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदा

धारकाकडून त्याचे उपरोक्त तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही एकाही प्रकरणी केलेली नाही.

23.मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये महानगरपालिका पदाधिकारी/ अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी समूह भ्रमणध्वनी (मोबाईल) सेवेसाठी सिमकार्ड उपलब्ध करुन देणे व त्याबाबत मासिक खर्च करणे इ.बाबत कोणतीही तरतूद नाही.तसेच कलम 458 नुसार महानगरपालिकेने या विषयांकीत बाबीकरिता आवश्यक तो उपविधी शासनाकडून मंजूर करुन घेतलेला नाही यामुळे भ्रमण ध्वनीवरील एकूण रक्कम रु.1789041/- एवढा नियमबाहय खर्च केलेला आहे.

24.सन2013-2014या आर्थिक वर्षात पाणीपुरवठा विभागाकडून पुरवठादार अश्विनी ट्रेडर्स यांचेशी लिक्विड क्लोरीन गॅस खरेदी संदर्भात शासन निर्णय उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्र भाखस-1088 (2522) उदयोग-6 दि.02 जानेवारी 1992 नुसार निविदा प्रक्रिया न राबविल्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ न होता लिक्विड क्लोरीन गॅस खरेदी मध्ये रक्कम रु.1114735/- एवढया रकमेने जादा खर्च झालेला आहे.

25. सन 2013-14 यांत्रिकी विभागाने वाहन दुरुस्ती व सुट्टे भाग खरेदी संदर्भात शासन निर्णय उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्र भाखस-1088(2522) उदयोग-6 दि.02 जानेवारी 1992 नुसार निविदा प्रक्रिया न राबविल्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ न होता जादा खर्च झालेला आहे. वित्तिय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला उपविभाग दोन अ.क्र. 19 (क) नियम क्रमांक 69 अन्वये नमुद खर्चापेक्षा जादा खर्च करणे इत्यादी बाबत नमुद वाहन शासकीय कार्यशाळेत दुरुस्त करण्यात आले नसेल तर वाहनावरील दुरुस्तीचा खर्च वाजवी नसलेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता,शासकीय परिवहन सेवा यांचेकडुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे नमुद वाहनावर खर्च करताना वित्तीय अधिकारा पेक्षा जादा खर्च झालेला आहे. तसेच वाहन दुरुस्ती अधिकृत्त डिलरकडुनच करणे आवश्यक असताना वांरवार एकाच स्थानिक पुरवठा धारकाकडुन सुट्टे भागाची खरेदी व दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आलेले आहे.

26.सन 2013-2014 मध्ये महागनरपालिकेसाठी खाजगी वाहन भाडे करारामध्ये झालेल्या निविदा प्रक्रिये मध्ये वाहन पुरवठा कालावधी दि 01/12/2012 ते 30/11/2013 पर्यंत नमुद असताना प्रत्यक्षात तन्वीर टुरिष्ट्र सेंटर, नांदेड यांचे दर निश्चिती करताना दि.01/06/2013 ते 31/05/2014 या कालावधीसाठी कर ण्यात आल्याने निविदा व करार यांचेमध्ये विसंगती दिसते. तन्वीर दुरिष्ट्र सेंटर,नांदेड यांचेशी वाहन पुरवठा करार करणेपुर्वी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील नमुद वाहन पुरवठा करणे बाबतचे दर उपलब्ध करुन घेणे आवश्यक असताना त्यांचेकडुन तशी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर

कालावधीत महानगरपालिकेसाठी तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांचेकडुन किती वाहनाचा पुरवठा झाला, वाहनाचे लॉग बुक, वाहने चांगल्या स्थितीत असल्याबाबत आर.टी.ओ. कार्यालयाचे परवाना प्रमाणपत्र, इ. कोणतीही अभिलेखे तपासणीस उपलब्ध करुन दिलेली नाहीत. 27.सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या एकूण 05 घटकांवर रक्कम रु.48033814/- एवढा खर्च झालेला असून विभागाने सन 2012-2013 मधील घटकनिहाय शिल्लक निधीची रक्कम व सन 2013-2014 मधील शासनाचा प्राप्त निधी व जमा व्याजाच्या रकमा रकमाबाबत विभागाने कार्यवाही केलेली नाही.

28.नगररचना विभागाकडुन रहिवास व वाणीज्य प्रयोजनार्थ करण्यात येणा-या बांधकाम प्रस्तावाना शासन निर्देशाप्रमाणे विकास शुल्क व इतर फी यांची आकारणी करुन बांधकाम परवानगी देण्यात येते. संबंधीता कडुन देय होणारे विकास शुल्क व इतर फी रक्कमांचा भरणा लेखा (रोखपाल) विभागाकडे करण्यात येवुन लेखा विभागाकडुंन सामान्य पावती देण्यात येते. तथापि शासन निर्देश नगरपरिषद प्रशासन संचालानालय क्र/ न.प.प्र.स /विकास कामे 2005 /प्र.क्र.292 /32 / दि.28.11.2005 तसेच स्थायी निर्देश क्र. 34 दि.28.5.2005 चे आदेश 3(फ)(ग) अन्वये विकास शुल्क रक्कमे साठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे नियंत्रण अधिनियम 2001 चे कलम (6)(1) नुसार महानगरपालीकेने प्रशमन शुल्क/गुंठेवारी विकास रेखांकन निहाय स्वतंत्र लेखाशिर्षात जमा करुन स्वतंत्र रोखवही महानगरपालीकेने परिरक्षीत केलेली नाही यामुळे विकासशुल्क थेट मनपा निधीत जमा झाले किंवा कसे याबाबत सत्यता पडताळता आलेली नाही.

29.महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2014-15 चे बांधकाम परवाना नोंदवहीत मालमत्ता धारकांना बांधकाम परवाने देण्यात आली असुन नमुना नं.45 च्या नोंदवहीत मालमत्ता धारकांच्या बेरजेमध्ये रक्कम रु.1271575/- कमी वसुल केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 143 व विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.32(2) अन्वये अधिमुल्य तसेच नियम 124 मध्ये सुधारणा 2010 प्रमाणे बाजार मुल्य दरानुसार विकास शुल्क/एलबीटी शुल्क/पावसाळी पुर्नरभरण/ अनामत रक्कम/नॉन स्टॉकींग रक्कम/प्रशमन शुल्क/दंडनिय व्याज रक्कम वसुल झाल्याचे अचुक नोंद घेण्यात आलेल्या नसून संबंधीताकडून कमी वसुल झालेल्या रकमाच्या जमा नोंदी नोंदवहीस घेण्याची कार्यवाही केलेली नाही.

30.महाराष्ट्र शासन, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/ प्र.क्र.108/ कामगार 7-अ/ दि.17/06/2010 नुसार कंत्राटी कामाच्या देयकातून 1 टक्का कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करणे आवश्यक आहे तथापि सन 2013-2014 मध्ये बहुतांश प्रकरणी अशी कपात केलेली नाही. सबब रक्कम वसुल करुन कामगार कल्याण मंडळाचे खाती जमा होणे आवश्यक आहे.

31.विभागाने लेखापरिक्षणास उपलब्ध केलेल्या अभिलेख्याची व नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सन 2013-2014 या आर्थिक वर्षाचे अंतिम लेख्याची पडताळणी केली असता मार्च-2014 अखेर माल मत्ता कर व इतर अनुषंगिक कर अंतिम लेख्यातील नोंदीनुसार वसुली थकीत आहेत तरी सदर वसुलीबाबत विशेष मोहिम राबविणे आवश्यक आहे.

32.नांदेड वाघाळा महानगरपालिकेने 2013-2014 चे वर्षिक लेखे तपासणी कालावधी पर्यंत अद्यावत करुन महासभेचे मंजुरी घेवुन शासनास सादर केलेली नाहीत.

33.नांदेड वाघाळा महानगरपालिकेने सन 2013-2014 मध्ये योजनानिहाय रोख वहया समक्ष अधिकारी यांचे स्वाक्षरीने अद्यावत ठेवण्यात आलेले नाहीत. दरमहा बँक स्क्रोल प्राप्त करुन ताळमेळ घालण्यात आलेला नाही. शिल्लक रक्कमेचा तपशील नोंदविलेला नाही. न वटलेले धनादेश व निव्वळ फरक इत्यादी नोंदी रोखनोंदवहीस घेण्यात आलेल्या नाहीत. निवडक महिना मार्च-2014 संगणीकृत्त प्रिंटवरुन तपासणी करण्यात आलेली आहेत. वरील कार्यवाही न केलेमुळे अनियमितता होणार नाही याची दक्षाता घेण्यात आलेली नाही.

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण 1

I PART I : भाग १ 3

मागील लेखा परीक्षण अहवाल 3

PART II 14

कलम ९ अ खालील आक्षेप 15

1 सन 2013-2014 चे मंजूर अर्थसंकल्पाबाबत अभिप्राय 16

2 दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे अद्यावत न करणेबाबत. 21

3 सर्व योजनेचे रोख पुस्तिका शिल्लकेशी बँक स्क्रोलप्रमाणे ताळमेळ न घालणे बाबत 22

4 प्रतिभूती बंधपत्र न घेणे बाबत 24

5 वार्षिक विवरणपत्र शासनाकडे व मा. महालेखापाल, नागपुर यांना सादर न केल्याबाबत. 25

6 ठेव नोंदवही बाबत. 26

7 अधिकारी / पदाधिकारी / कर्मचारी यांच्या समूह भ्रमणध्वनी वरील खर्च मनपा निधीतून झालेल्या अनियमिततेबाबत. 27

8 रोख पुस्तकात पुरेशी शिल्लक नसतांना अधिक रकमेचे धनादेश वितरीत करणे बाबत. 28

9 मुळ प्रमाणके लेखापरिक्षणासाठी सादर न करणेबाबत. 29

10 IDSMT योजनेची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 32

11 13 वा वित्त आयोगाची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 33

12 भविष्य निर्वाह निधीची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 34

13 महानगरपालिका निधीची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 36

14 E-GOVERANANCE बाबतची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 37

15 खासदार निधी बाबतची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 38

16 शासन विशेष अनुदानाची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 39

17 बॅक स्टेटमेंट लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 40

18 दिपनगर पाटी ते धन्वंतरी कॉलनी मार्ग तुंगनेवार यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड तयार करणे कामातील अनियमीततेबाबत. (बीआरजीएफ) 42

19 प्रभाग क्रं.2 मधील देखभाल दुरुस्ती (AMC)अंतर्गत करण्यात आलेल्या कामाच्या अनियमीततेबाबत. 43

20 झोन बीआरजीएफ योजने अंतर्गत झोन क्र.२ मध्ये नंदीग्राम सोसायटी भागात सीमेंट रोड व सीमेंट नाली बांधकाम करणे बाबत. (सन 2013-14 पहीला टप्पा) 45

21 महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या 124 चे कलमान्वये कार्यवाही न केल्याने झालेल्या अनियमीततेबाबत. 47

22 नांदेड महानगरपालीका हददीत वॉर्ड क्र. 12 वॉर्डात आर.सी.सी नालीकाम करणे. 48
23 द.व.सु.योजनेअंतर्गत वसरणी भागात वॉर्ड क्र.36 मध्ये रस्ते व नालीबांधकाम करणे. 51
24 द.व.सु.योजनेअंतर्गत शिवरायनगर भागात आर.सी.सी नाली करणे (वार्ड क्र.78 तरोडा (खु.) मेनरोड ते ग्रीन पार्क) 53
25 पौर्णीमा नगर प्रभाग क्र.5 मधील दलीत वस्ती अप्रोच रस्त्याच्या उर्वरीत भागाचे डांबरीकरण करणे कामातील अनियममीतता बाबत....56
26 नांदेड वाघाळा महानगरपालीका हददीत बी आर जी एफ योजनेअंतर्गत सिडको परिसरात अंतर्गत/नादुरुस्त/जी आय वाहिनी बदलणे बाबत. 58
27 नांदेड वाघाळा महानगरपालीका हददीत बी आर जी एफ योजनेअंतर्गत सिडको परिसरा अंतर्गत D1 K9 पाईप लाईन बदलणे बाबत (सन 2011-12 पहीला टप्पा)....60
28 नांदेड वाघाळा महानगरपालीका हददीत बी आर जी एफ योजने अंतर्गत शहरातील उपयुक्त ठिकाणी हॉकर्स करीता औटे / गाळे बांधणे....62
29 नांदेड वाघाळा महानगरपालीका हददीत बी आर जी एफ योजने अंतर्गत तरोडा भागात स्मशान भुमीचे बांधकाम करणे (वॉर्ड क्र. 74)....65
30 आमदार निधी अंतर्गत नांदेड वाघाळा महानगरपालीका हददीत इतवारा भुसार लाईन जिल्हा परीषद समोरील रस्ता (जेएनएनयुआर एम रोड नं.4) बकरा मटन मार्केट पर्यंत डांबरीकरण करणे....67
31 बिआरजिएफ योजनेअंतर्गत नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीत शहरात विविध भागातील कब्रस्तानच्या आवार भिंतीचे बांधकाम व विकास करणे. (प्रभाग क्र.5 अंतर्गत)....69
32 वार्षीक देखाभाल दुरुस्तीअंतर्गत दर करार करण्यासाठी झोन न.3 मधील रस्ते दुरुस्ती,बिल्डीग दुरुस्ती, नाली दुरुस्ती,कलरिग व नावाचे बोर्ड बाबत काम करणे....72
33 नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीत तरोडा भागात स्मशानभुमीचे बांधकामाबाबत (झोन क्र.6)....74
34 नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.4 मध्ये वार्षीक देखाभल दुरुस्ती करणे(प्रभाग क्र.05) 77
35 BRGF योजनेअंतर्गत नावांशमनपा हद्दीत तरोडा नाका येथे पाण्याच्या टाकीच्या जागेतील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे.(सन 2011-12 पहिला टप्पा) 79
36 वित्तीय वर्ष सन 2013-2014 च्या लेखापरिक्षणा करिता अभिलेखे उपलब्ध न करणेबाबत. 82
37 नांदेड वाघाळा महानरगपालिका हद्दीत BRGF योजनेअंतर्गत डंकीन येथील स्वर्ग स्मशान भुमी मुलभुत सुविधा पुरविणेबाबत.(कंपाऊंड वॉल व सिंमेट रोड) 83
38 दलित वस्ती सुधार योजना सन 2013-14 ची संचिका/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत. 87
39 जिल्हा क्रिडा अधिकारी, वसतीगृह जागेची अभिलेखे(संचिका) सादर करणे बाबत. 87
40 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 88
41 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 96
42 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 99
43 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 99

44 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 101
45 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 102
46 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 102
47 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 103
48 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 105
49 मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी सादर न करणे बाबत. 106
50 नांदेड वाघाळा महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालयातील जमा पावती पुस्तके चालान व इतर अनियमिततेबाबत. 108
51 नांदेड वाघाळा महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालयातील जमा पावती पुस्तके चालान व इतर अनियमिततेबाबत. 111
52 लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करणेबाबत 114
53 पुरवठादार अश्विनी ट्रेडर्स यांचेशी कोणताही करार/निविदा न करता रुपये 1114735 चे लिक्वीड क्लोरीन गॅस खरेदी करुन झालेल्या अनियमितते बाबत. 116
54 लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करणेबाबत 117
55 सन 2013-14 मध्ये पाणीपुरवठा विभागातील पंप दुरुस्तीच्या कामाचे मोजमाप पूस्तीका, मंजरी आदेश, ई-दरपत्रके, स्थाई समीती ठराव इ .अभीलेखे उपलब्ध न करुन देणे बाबत. 119
56 बीएसयुपी (झोपडपट्टी सुधार योजना)अंतर्गत लाभार्थी हिस्सा झोन क्र.1 ते 6 भरणा केलेल्या रक्कामाचे स्टेट बँक ऑफ इंडिया स्क्रोल उपलब्ध करुन देणेबाबत. 121
57 बीएसयुपी (झोपडपट्टी सुधार योजना) अंतर्गत ठेकेदार मे.बीव्ही इंडिया लि पुणे यांना जादा रक्कम अदाई केली, वसुल केल्याचे अभिलेखे उपलब्ध करुन देणे बाबत. 122
58 महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक पथदिव्याची देखभाल, दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे कामासाठी खाजगी कंत्राटदारांकडून व्यवस्था करणेकामी झालेल्या अनियमितताबाबत. 125
59 गुरु-ता-गद्दी सोहळा व विकास योजना नांदेड अंतर्गत रस्ता क्रमांक -05 कीं चौक ते भोजालाल गवळी चौक ते दरबार मस्जीद या रस्त्या करीता करण्यात आलेल्या भू संपादनातील अनियमीतते बाबत. 129
60 स्थायी अग्रीम मंजुर रक्कमेतुन दरमहा वाहन दुरुस्ती व देखभाल खर्चाच्या अनियमतते बाबत 131
61 आर.डी.क्र.124/2001 या प्रकरणामध्ये अदा करण्यात आलेल्या वाढीव मोबदल्यावरील व्याजाचे रक्कमेबाबत 133
62 सन 2013-2014 महिला व बाल कल्याण विभाग खर्चाची संचिका/अभिलेखे/ प्रमांणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे बाबत. 134

कलम ९ ब खालील आक्षेप 137

63 आश्वासीत प्रगती योजना लाभा अंतर्गत वेतन निश्चीती सुधारीत करणे बाबत. 138
64 मुंबई वित्तीय नियमावली नियम 1959 क 42 नुसार वेतन अतिप्रदान वसुली करुन लेख्यात जमा करणे बाबत. 139

65 कर्मचा-यांच्या वेतनावर नियमबाहयरित्या रक्कम खर्च करणे बाबत.....140
66 अग्रीम समायोजित न करणे बाबत.....141
67 वॉकी टॉकी व व वायरलेसबेस स्टेशन देखभाल व दुरुस्ती मधील अनियमितता.....144
68 अग्निशमन सेवा फी चे नुतणीकरण करतांना कमी दराने आकारणी करणे बाबत.....145
69 अग्नीशमन सेवा ना-हरकत प्रमाणपत्र नुतणीकरण फी कमी दराने आकारणी करणेबाबत.....146
70 अग्नीशमन सेवेची (स्टॅंड बाय डयुटी) ची वसूली कमी दराने केल्याबाबत.....148
71 अग्निशमन विभागातील आगीचे प्रमाणपत्र फी चे (हददीत / हददीच्या बाहेर) कमी दराने आकारणी करणे बाबत. 149
72 अग्निशमन विभागातर्फे आग प्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार फायर आडीट न करुन घेण्या बाबत 151
73 विधी विभाग़ातून अदा करण्यात आलेल्या अग्रीमाचे समायोजन न झाले बाबत.....152
74 नांदेड मनपाने नियुक्त केलेल्या विधीज्ञांना अदा केलेल्या देयकातून आयकराची रक्कम वसुल न केल्याबाबत. 153
75 महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक पथदिव्याची देखभाल, दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे या कामासाठी पुरवठादारांकडून व्यवस्था करणे कामी अदा केलेल्या देयकामध्ये वसुल न केलेल्या रकमाबाबत. 155

कलम ९ क खालील आक्षेप..... **158**

---------- निरंक ---------- **159**

कलम ९ ड खालील आक्षेप..... **161**

76 विहीत अहर्ता प्राप्त नसतांना दिलेल्या पदोन्नती बाबत.....162
77 विहीत अहर्ता प्राप्त नसतांना दिलेल्या पदोन्नती बाबत.....165
78 बिंदु नामावली नूसार पदे न भरता खुल्या प्रवर्गातुन पदे भरल्या बाबत. 169
79 बिंदु नामावली नुसार मागावर्गीय पदांचा अनुशेष भरणे बाबत. 175
80 कालबध्द पदोन्न्ती/आश्वासीत प्रगती योजना लाभ जादा अदा करणे बाबत.....177
81 निलंबन कालावधीतील प्रदान केलेल्या वेतन वाढी वसुल करुन लेख्यात जमा करणेबाबत 178
82 वेतन देयकातील त्रुटी दुर करणे बाबत.....179
83 सेवापुस्तकातील नोंदी अचुक रित्या नोंद घेणे बाबत.....182
84 नांदेड वाघाळा महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालयातील जमा पावती पुस्तके चालान व संशयीत अपहाराबाबत. 183
85 नांदेड वाघाळा महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालयातील जमा पावती पुस्तके चालान व संशयीत अपहाराबाबत. 186
86 मालमत्ता व मध्यवर्ती भांडार नोंदवहीतील उणीव बाबत 190

87 बीएसयुपी (झोपडपट्टी सुधार योजना) अंतर्गत आयकर रक्कम ठेकेदाराच्या देयकातून कपात न करणेबाबत. 191

88 बीएसयुपी (झोपडपट्टी सुधार योजना) अंतर्गत रोख नोंदवही शिल्लकेशी बँक स्क्रोल शिल्लके प्रमाणे दरमहा ताळमेळ न घालणे बाबत. 192

89 बीएसयुपी (झोपडपट्टी सुधार योजना) अंतर्गत लाभार्थी हिस्सा रक्कम स्वीकरली, पावती पुस्तक नोंदवही अद्यावत न ठेवणे/कर्मचारी कडुन रोख रक्कम तारण न घेणे बाबत. 194

90 2 टक्के स्थानिक उपकर रक्कम ठेकेदार मे. एन.एस. सेठी यांचे देयकातून कपात न करणेबाबत. 196

91 बीएसयुपी (झोपाडपटी सुधारणा योजना) विभाग अंतर्गत डि.यु. इन्फ्रास्ट्रक्चर रमा माता आंबेडकर नगर मे.पांडे ए.व्ही. ठेकेदार यांचेकडुन रक्कम रुपये 25831 वसुल करणे बाबत. 197

92 महानगरपालिका सर्वसाधारण व स्थायी समिती सभेस गैरहजर सदस्य बाबत. 197

93 पुर्ण/ अपुर्ण कामाची योजनानिहाय नोंदवही न ठेवणेबाबत. 199

94 पुर्ण/ अपुर्ण कामाची योजनानिहाय नोंदवही न ठेवणेबाबत. 200

95 पाणीपुरवठा विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही न ठेवणे बाबत 201

96 पाणीपुरवठा विभागाने स्थावर मालमत्ता नोंदवही अदयावत न ठेवणे बाबत 202

97 संगणक विभागातील देयके अदा करतांना तसेच संगणक साहित्याची दुरुस्ती करतांना झालेल्या अनिमितता 203

98 ग्रंथालय विभागाने पुस्तके खरेदी प्रकियेत झालेली अनियमितता 205

99 बाजार परवाने (मालमत्ताविभाग) अंतर्गत महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडे रक्कम स्विकारणा-या कर्मचा-यांकडून तारण न घेणेबाबत 206

100 बाजार परवाने (मालमत्ता विभाग) अंतर्गत महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडे रक्कम ॲक्सीस बँक मध्ये भरणा केलेली बँक स्क्रोल प्रमाणे जमा झाल्याची खात्री करणेबाबत. 207

101 बाजार परवाने (मालमत्ता विभाग) अंतर्गत महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडे रक्कम मागणी, वसुली व प्रलंबीत नोंदवही अदयावत ठेवून प्रलंबित रक्कम वसुल करणे बाबत. 210

102 श्री स.मुस्तफा अली बंदे अली (लिपिक) यांनी अपहारा केलेली रक्कम वसुली बाबत. 211

103 श्री विजय मोहन तोटावाड (लिपिक) यांनी अपहारा केलेली रक्कम वसुली बाबत. 212

104 सन 2013-2014 जावक विभाग अंतर्गत नोंदवही अ व ब अदयावत न ठेवणे, अग्रीम रक्कम खर्चाचे अनियमितते बाबत. 213

105 सन 2013-14 पाणीपुरवठा टँकर नोंदवहीतील अनियमीतता. 215

106 पाणीपुरवठा विभाग तुरटीचा ग्रेड 1 सन 2013-14 च्या अनियमीततेबाबत 216

107 कॅनॉन डिजीटल हेवीडयुटी कॉपीअर एडीव्ही-4045 (40 पीपीएम) च्या खरेदीबाबत. 219

108 सन 2013-14 या वर्षातील खर्चाच्या प्रमाणकांबाबत. 221

109 सन 2013-14 ची स्थानिक संस्था कराची व्यापारी प्रतिष्ठाणचे नोंदवहीत झालेल्या अनियमितता. 222

110 सन 2013-14 मधील विवीध लेखाशिर्षाखालील रक्कमांसाठी एकाच पावतीवर रक्कम स्विकारल्या बाबतची अनियमीतता. 223

111 आग्निशमन सेवा फी आकारणी करुन वसुल कार्यवाही न केल्याने झालेल्या नुकसानी बाबत.....225
112 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधी खर्चाबाबत.....226
113 अग्निशमन विभागातील लेखे रोजच्या रोज बंद न करणेबाबत.....228
114 केद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील अग्नीशमन व आणीबाणी सेवेचे बळकटीकरण करण्यामधील अखर्चीत रकमा 229
115 नांदेड महानगर पालिकेसाठी संगणक प्रणाली विकसीत करण्यासाठी अदा केलेल्या देयकातून आयकराची रक्कम कमी वसूल करणेबाबत.....230
116 विदयुत विभागाने सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची मागील थकबाकी / व्याज अदा न केल्यामुळे आकारण्यात येत असलेल्या थकबाकी /व्याजामुळे महानगरपालिकेच्या होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत.....231
117 सन 2013-14 अखेर मनपा लेख्यावरील अहवाल मुख्य लेखापरिक्षक यांनी मा.स्थायी समिती पुढे सादर न करणे बाबत.....237
118 सन 2013-14 या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापूस्तकातील अनियमितते बाबत. 238
119 सन 2013-14 वर्षात सेवानिवृत्त झालेले अधीकारी/कमर्चारी यांचे सेवानिवृत्ती.....240
120 नमुना नं.45 ईमारत परवाना नोंदवही अद्यावत न ठेवणे बाबत. 241
121 बांधकाम परवाना नोंदवहीस बेरजेत कमी रक्कम दर्शवीलेली वसुल करणे बाबत. 242
122 सन 2013-2014 मध्ये महानगरपालिकेने वाहन घसारा निधीची तरतुद केलेली नसल्याने झालेल्या अनियमितते बाबत. 245
123 सन 2013-2014 मध्ये महागनरपालिका वाहन निर्लेखन करतेवेळी झालेली अनियमितते बाबत. 246
124 सन 2013-14 तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांनी महानगरपालिका कार्यालयास केलेल्या वाहन पुरवठा बाबत झालेली अनियमितते.....248
125 सन 2013-14 महानगरपालिका वाहन दुरुस्ती व सुटटे भाग खरेदी बाबत झालेली अनियमिता व आयकर वसुली बाबत. 250
126 सन 2013-2014 मध्ये महागनरपालिकेसाठी खाजगी वाहन भाडे करार व अदा रक्कम यामध्ये झालेल्या अनियमितते बाबत. 254
127 सन 2013-2014 मध्ये महागनरपालिका वाहन लॉग बुक/ हिस्ट्री शीट मधील नोंदीच्या अनियमितते बाबत. 256
128 लेखा विभागाने वेतन राखीव निधी पुरेसा न ठेवणेबाबत.....259
129 पाणीपुरवठा राखीव निधी पुरेसा न ठेवणेबाबत.....260
130 वृक्षकर प्राधिकरण निधी न ठेवणेबाबत. 261
131 लेखा विभागाने निवृत्ती वेतन अंशदान निधी पुरेसा न ठेवणेबाबत.....262
132 लेखा विभागाने शासकीय योजनाचा निधी शासन निर्णयाप्रमाणे दोन आर्थिक वर्षामध्ये खर्च न झाल्यास अखर्चित निधी शासनखाती न भरल्याबाबत.....263

133 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना फिरता निधी वितरणा तील अनियमितता. 265

134 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत शहरी गरिबासाठी प्रशिक्षण कार्यक्रम योजने मधील अनिमिततेबाबत.....266

135 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना(DWCUA)योजनेअंतर्गत शहरी महिला स्वयंसहायत्ता कार्यक्रम योजनेतील अनियमिततेताबाबत.....268

136 सन 2013-2014 महिला व बाल कल्याण विभाग अंतर्गत रात्र निवारा चालविण्याचे कामाबाबत झालेली अनिमियतते बाबत. 270

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 273

विवरणपत्रे व जोडपत्रे **274**

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

विभाग	९अ	९ब	९क	९ड
इतर	59, 60			86, 87, 88, 89, 90, 91, 92, 93, 94, 95, 96, 97, 98, 99, 100, 101, 102, 103, 104
सामान्य प्रशासन	40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49	63, 64		76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83
शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम	18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38			
शहर अभियंता आणि विद्युत विभाग	58	75		116
पाणी पुरवठा व मल निसा:रण	53, 54, 55			105, 106, 107, 108, 109, 110
लेखा विभाग	1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17			128, 129, 130, 131, 132
लेखापरीक्षण		66		117, 118, 119
नगर रचना				120, 121
वाहन विभाग				122, 123, 124, 125, 126, 127
जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम		65		
विधी विभाग	61	73, 74		
घन कचरा व्यवस्थापन	52			

प्रकल्प				
संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान				115
झोपडपट्टी सुधार	56, 57			
महिला व बालकल्याण विभाग	62			136
क्रिडा विभाग	39			
अग्निशमन विभाग		67, 68, 69, 70, 71, 72		111, 112, 113, 114
प्रभाग कार्यालये	50, 51			84, 85
समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग				133, 134, 135

I Part I : भाग १

मागील लेखा परीक्षण अहवाल

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड लेखापरिक्षण अहवाल 2013-14

भाग-1

मागील लेखापरिक्षण जमा व खर्च बाजूचा अहवाल

अ)सन 2011-12 या लेखापरिक्षण अहवालातील एकूण 134 परिच्छेद प्रलंबित असून प्रलंबित परिच्छेदांची यादी खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	वित्तीय वर्ष	परिच्छेद क्रमांक	एकूण् प्रलंबित परिच्छेदांची संख्या
1	2011-12	01,02,03,04,05,06,07,08,09,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85,86,87,88,89,90,91,92,93,94,95, 96,97,98,99,100,101,102,103,104,105,106,107,108,109, 110,111,112,113,114,115,116,117,118,119,120,121,122, 123,124,125,126,127,128,129,130,131,132,133,134,	134
		एकूण	134

ब) <u>वित्तीय वर्ष 2012-13</u>

परि. क्र.	परिच्छेदाचे शीर्षक	विभाग
01	सन 2012-2013 चे अर्थसंकल्पाबाबत.	लेखा
02	दूहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी होत नसलेबाबत	लेखा
03	गुंतवणूक रकमाचे संचिका सादर न करणेबाबत	लेखा
04	रोख पुस्तक व प्रमाणके मधील अनियमितता	लेखा
05	प्रतिभूती बंद पत्र न घेणेबाबत	कर निर्धारण व संकलन
06	स्थावर मालमत्ता नोंदवही न नं.128व जमिनीची नोंदवही न.नं. 129 सादर न करणेबाबत.	भूमी व मालमत्ता
07	महिला व बालकल्याण विभागास दिलेल्या अग्रीमाचे समायोजन न झाले बाबतची अनियमितताबाबत.	महिला व बालकल्याण
08	मुख्य लेखापरिक्षक यांनी सन 2012-2013 चा अहवाल स्थायी समिती समोर सादर न करणेबाबत.	लेखापरिक्षण
09	अतिक्रमण विभागाने वसुल न केलेल्या रकमांचे अभिलेखे उपलब्ध न केले बाबत.	अतिक्रमण
10	मंजूर अभिन्यासात दर्शविलेले रस्ता व खुली जागा महानगरपालिके च्या नांवे न केल्याबाबत.	नगररचना
11	शासनाची पूर्व मान्यता न घेता अभिन्यास रेखांकनास अटी व शर्तीवर मंजुरी देण्याची अनियमितताबाबत.	नगररचना
12	सुधारीत अभिन्यास रेखांकन मंजुर करान त्यातील अनुज्ञेय खुली जागा विकसकास परस्पर वापरावयास देण्याची अनियमितता.	नगररचना
13	मौजे फत्तेजंगपूर येथील गट क्रमांक -16 मधील जमीन क्षेत्राचे अभिन्यास	नगररचना

	रेखांकन मंजुरीतील अनियमितताबाबत.	
14	नवीन हददवाढ तसेच इतर अटी व शर्तीवर अभिन्यास रेखांकनास अंतिम /तात्पूरती मंजुरी प्रदान प्रकरणातील अनियमितताबाबत.	नगररचना
15	पाणीपुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर न चालविणे बाबत	पाणीपुरवठा
16	विष्णूपूरी जलाशयातील होणारा अनधिकृत पाणी उपसा थांबविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना यातून झालेल्या खर्चाबाबत	पाणीपुरवठा
17	दक्षिण नांदेड पाणीपुरवठा वितरण व्यवस्था अंतर्गत मंजूर डी .पी.आर मधील उपकाम नसतांना नियमबाहयपणे कामावर खर्च करण्याची अनियमितता.	पाणीपुरवठा
18	पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांच्या समूह भ्रमणध्वनी वरील खर्च मनपा निधीतून करण्याची अनियमितता	सामान्य प्रशासन
19	सन्माननीय पदाधिकारी/अधिकारी यांना नियमबाहयपणे मोबाईल हॅण्डसेट खरेदी करुन देणेची अनियमितता.	सामान्य प्रशासन
20	उपआयुक्त श्री.रत्नाकर कांतराव कुकडगांवकर महानगरपालिका नांदेड वाघाळा यांचे नेमणूकीच्या तक्रारीबाबत.	सामान्य प्रशासन
21	आयकर रक्कम कमी कपात केलेबाबत.	इतर
22	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत में :- .ए.टू.झोड इन्फ्रास्ट्रक्चर लि .गुरगांव (हरियाणा) यांचेकडून रक्कम रु.15616875/- वसुलीबाबत.	घनकचरा व्यवस्थापन
23	यांत्रिकी विभागातील अग्रीम रक्कम रु.4370143/-वसुलीबाबत.	वाहन विभाग
24	औषधी खरेदी करताना झालेल्या रु.239745/- चे अतिप्रदानाबाबत.	आरोग्य
25	सन 2012-2013 अखेर पावेतो घरपटी रकमा विहीत मुदतीत वसुल न झाल्याने अदत्त रकमांवर शास्तीची आकारणी केले नसलेबाबत तसेच रु.6823900/- दिलेल्या करातील सुटबाबत.	कर निर्धारण व संकलन
26	अग्रीम रकमांचे समायोजन न झालेबाबत.	लेखा
27	अखर्चित निधी शासनाकडे परत न करणेबाबत.	लेखा

28	विधी व न्याय विभागास देण्यात आलेल्या नियमबाहय अग्रीमाबाबत.	विधी विभाग
29	लेखापरिक्षण अभिलेखे उपलब्ध न केल्याबाबत.	उदयान
30	लेखापरिक्षण अभिलेखे उपलब्ध न केल्याबाबत.	क्रिडा विभाग
31	सन 2012-2013 आकृतीबंधास संच मान्यतेबाबत.	शिक्षण
32	शिक्षकांचे वेतन व भत्ते वर 50 टक्के मनपा निधी खर्च न करणेबाबत.	शिक्षण
33	मायक्रोझोनेशन प्रोजेक्ट खर्च रु.466000 अनियमिततताबाबत.	शिक्षण
34	सन 2012-2013 मध्ये जयंती/पूण्यतिथी व राष्ट्रीय सणावरील केलेल्या खर्चा च्या अनियमिततताबाबत.	सामान्य प्रशासन
35	बांधकाम कामगार उपकर वसुल न करता बांधकामांना परवानगी दिल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.	नगररचना
36	बांधकाम परवाना मंजुर प्रकरणात स्थानिक संस्था कर वसुल न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.	नगररचना
37	अनधिकृत मोबाईल टॉवर बांधकामाबात नियमानुसार कार्यवाही न केल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत.	नगररचना
38	विकास शुल्क रक्कम कमी आकारलेबाबतची अनियमितता.	नगररचना
39	JNNURM योजने अंतर्गत प्रदान देयकातून विहीत दराने शासकीय रकमांची कपात न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.	पाणीपुरठा
40	पाणी टॅकरच्या वसुल रकमांबाबतची अनियमितता.	पाणीपुरठा
41	ऍलम(तुरटी)रसायने खरेदीबाबत.	पाणीपुरठा
42	JNNURM योजने अंतर्गत शासन अनुदानाच्या रकमा नियमबाहयपणे इतर निधी खाती वर्ग करणेची अनियमितता.	JNNURM
43	अग्निशमन सेवा फि आकारणी करुन वसुली कार्यवाही न केल्याने झालेल्या नुकसानीबाबत.	अग्निशमन
44	झोन क्र.4 वार्षिक देखभाल दुरुस्ती.	बांधकाम

45	वार्ड क्र.33 ख्रिश्चन कब्रस्थान मध्ये खडीकरण,सिमेंट रस्ते बांधणे व दिवाबत्ती व्यवस्था करणे	बांधकाम
46	नांदेड शहर विकास नागरोत्थान योजनेतून तरोडा खु .बु.येथे विविध विकास कामे करणे (पॅकेज-1)	बांधकाम
47	नांदेड शहर विकास नागरोत्थान योजनेतून तरोडा खु .बु.येथे विविध विकास कामे करणे (पॅकेज-2)	बांधकाम
48	मेगा टुरीझाम सर्किट किल्ले पर्यटन स्थळ विकास निधीतून नंदिगिरी किल्ला पर्यटन स्थळ विकसित करणे.	बांधकाम
49	जिमखाना वसुल केलेल्या व चलनाने लेखा विभागाकडे जमा केलेली रक्कम मनपा निधी रोखवहीस कमी जमा केल्याबाबत.	क्रिडा विभाग
50	सेवा निवृत्ती अभिलेख्यात आढळून आलेल्या त्रुटीबाबत.	लेखा
51	सेवा निवृत्ती लाभाचे थकीत रकमेबाबत.	लेखा
52	धनादेश नोंदवही व स्थळ प्रतीतील धनादेश नसल्याने झालेल्या अनियमित तेबाबत.	लेखा
53	अधिकारी / कर्मचारी यांना प्रदान केलेल्या अग्रीमाच्या अनियमिततेबाबत व सन 1997 पासून अदयाप न वसुल केल्याबाबत.	लेखा
54	वार्षिक विवरणपत्र शासनाकडे व मा .महालेखापाल नागपूर यांना सा दर न केल्याबाबत.	लेखा
55	रोखपुस्तकात पुरेशी शिल्लक नसतांना धनादेश वितरीत करणेबाबत.	लेखा
56	ठेव नोंदवहीबाबत.	लेखा
57	भविष्य निर्वाह निधीबाबत अनियमितता.	लेखा
58	मुदतबाहय धनादेशाबाबत.	लेखा
59	नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे निवृत्ती वेतन लेखा क्रमांक दिले नसलेबाबत.	लेखा

60	भविष्य निर्वाह निधी कपात केलेल्या रकमांचे भरणा नोंदवही , कॅशबुक, बॅक पासबुक न ठेवणेबाबत.	लेखा
61	गटविमा योजना व व्यवसायकर कपाती केलेल्या रकमांचे भरणा नोंदवही , कॅशबुक, बॅक पासबुक न ठेवणेबाबत.	लेखा
62	सार्वत्रिक निवडणूक झोन 6 निवडणूकीसाठी झालेल्या अल्पोहार खर्चाची प्रमाणके नसलेबाबत.	लेखा
63	सन 2012-2013 चे वार्षिक लेखेबाबत.	लेखा
64	जलतरणीका कडील अभिलेख्यातील त्रुटीबाबत.	क्रिडा विभाग
65	जलतरणीका विभागाकडील लेखे अभिलेखे परिक्षित न करणे व उपलब्ध अभि लेख्यातील त्रुटीबाबत.	क्रिडा विभाग
66	मा.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह विभागाकडील लेखे अभिलेखे परिक्षित न करणे व उपलब्ध अभिलेख्यातील त्रुटीबाबत.	क्रिडा विभाग
67	बगीचा विभाग साहित्य खरेदीतील अनियमितता व अभिलेख्याबाबत.	उदयान
68	मोकाटश्वान निर्बिजीकरण व लसीकरण योजना राबविणेतील अनियमितता	आरोग्य
69	पशुसंवर्धन विभागाकडील नोंदवहयाबाबत.	पशुसंवर्धन
70	जिम्नॅशियम विभागाकडील नोंदवहयाबाबत.	क्रिडा विभाग
71	जिम्नॅशियम विभागाकडील दप्तरी कामकाजातील अनियमितता.	क्रिडा विभाग
72	सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या वेगवेगळया घटकांर्गत लाभार्थ्याना केलेल्या अर्थसहायताबाबत व योजनेच्या लेख्यामधील अनियमिततेबाबत.	सुवर्णजयंती
73	सुवर्णजयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत शहरी गरिबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम योजनेमधील अनियमिततेबाबत.	सुवर्णजयंती
74	वाचनालयाच्या वर्गणीची थकबाकी व इतर अनियमिततेबाबत.	वाचनालय
75	शहरी आपत्तीव्यवस्थापन नुतनीकरण कार्यक्रमावर झालेला खर्च अनियमितता.	वाहन

76	कोंडवाडा विभागाने मोकाट जनावराकरिता उपाययोजना न केल्याबाबतची अनियमितता.	कोंडवाडा
77	बगीचा व क्रिडा विभागाकडील अग्रीमधन नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्याबाबत	क्रिडा विभाग
78	पशुसंवर्धन विभागाकडील अग्रीमधन नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्याबाबत	पशुसंवर्धन
79	स्थानिक संस्था कर व्याजाची रक्कम रु.916994/- वसुलीबाबत	स्था .सं .कर
80	मे.पल्लवी कन्स्ट्रक्शन , परभणी यांचेकडून पारगमन शुल्काची रक्कम रु.17576448/- वसुलीबाबत.	स्था .सं .कर
81	स्थानिक संस्था कर विभागास पुरविलेल्या पारगमन पावती बुकांचे वापरा बाबत..	स्था .सं .कर
82	एकत्रित मालमत्ता कर व इतर कर मोठया प्रमाणावर थकीत राहिल्याने रु.3463910 आर्थिक नुकसानीबाबत.	भूमी व मालमत्ता
83	मालमत्ता कर विभागातील सेवाकराची रक्कम रु.529173 वसुलीबीबत.	भूमी व मालमत्ता
84	जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पामध्ये थकीत रॉयल्टी सव्याजासह रक्कम रु 1087060 च्या नुकसानीबाबत.	घनकचरा
85	आरोग्य विभागातील सर्जिकल साहित्य खरेदीतील आयकराची व विक्रीकराची रक्कम वसुलीबाबत.	आरोग्य
86	यांत्रिकी विभागातील वापरात असलेल्या वाहनांचे अभिलेख्यातील अनियमिततेबाबत	वाहन विभाग
87	यांत्रिकी विभागाने वाहन देखभाल व दुरुस्तीसाठी केलेल्या रक्कम रु 2171650 खर्चाच्या अनियमिततेबाबत.	वाहन विभाग

88	यांत्रिकी विभागाने वाहन खरेदी रु .3784596 अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबाबत.	वाहन विभाग
89	सन 2007 पासून नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने मनपा निधीची रोख पुस्तिका परिरक्षित न केल्याबाबत	कर निर्धारण व संकलन
90	प्रभाग क्र.3 मालमत्ता कर व जमा पावती पुस्तके व चालान अनियमितता	कर निर्धारण व संकलन
91	प्रभाग क्र.4 मालमत्ता कर व जमा पावती पुस्तके व चालान अनियमितता	कर निर्धारण व संकलन
92	प्रभाग क्र.5 दैनिक संकलंन रजिस्टर पावती पावती पुस्तके व चालान व किर्द मधील अनियमितता.	कर निर्धारण व संकलन
93	शिक्षण विभागातील सेवा पुस्तकांमधील अनियमितता.	शिक्षण
94	महानगरपालिका शाळांकरिता इमारत भाडेतत्वावर घेणेबाबत अनियमितता.	शिक्षण
95	सर्व शिक्षण अभियान अंतर्गत प्रलंबित अग्रीम रक्कम रु .2118400 समा योजनाबाबत	शिक्षण
96	प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू करणेबाबत.	शिक्षण
97	अनुदान निर्धारण सन 2012-2013 बाबत.	शिक्षण
98	बॅक ताळमेळ अदयावत नसणेबाबत.	शिक्षण
99	मनपा प्राथमिक शाळा क्र 01 वजिराबाद शाळेस प्राप्त निधी रक्कम रु.1000000 इतर शाळेस वर्ग करणेबाबत अनियमितता.	शिक्षण
100	जन्म-मृत्यु फी वसुलीतील अनियमितता	जन्म-मृत्यु
101	वाचनालय विभागाने पुस्तके खरेदी करण्यासाठी निविदा न मागविण्याच्या अनियमिततेबाबत.	भांडार
102	सामान्य पावती बुकाचे वापराबाबत.	भांडार
103	महिला व बालकल्याण योजनेकरिता विहीत प्रमाणात तरतूद करुन योजना राब	महिला व

	विणेबाबत.	बालकल्याण
104	रात्रनिवारा कार्यपध्दतीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.	म व बा
105	शालेय विदयार्थ्यांना विज्ञान विषयक शैक्षणिक साहित्य पुरविणेबाबत.	म व बा
106	विधीज्ञाना प्रत्येक बाबीवर व्यावसायिक फि देणेकरिता झालेल्या खर्चाबाबत	विधी विभाग
107	बांधकाम परवानगी,विकास शुल्क व इतर फि वसुल रकमाबाबत अनियमितता	नगररचना
108	म्हाडाचे जमीन मालकत्व असतांना भाडेकरुने सादर केलेल्या बांधकाम प्रस्तावास मंजुरी देणेची अनियमितता.	नगररचना
109	प्रशमन शुल्क (गुंठेवारी विकास) विहीत प्रमाणात निर्धारीत कामी खर्च न करणेबाबत.	नगररचना
110	इमारत परवाना नोंदवहीबाबत.	नगररचना
111	वरीष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचा -यांना 4000-6000 वेतनश्रेणीऐवजी 5000-8000 वेतनश्रेणी देणेबाबत.	सामान्य प्रशासन
112	कनिष्ठ विधी अधिकारी/विधी सहायक पदोन्नतीचे पदाबाबत.	सामान्य प्रशासन
113	मुळ सेवापुस्तकातील सर्वसाधारण उणीवाबाबत	सामान्य प्रशासन
114	सहायक आयुक्त यांच्या मुळ सेवापुस्तिकेबाबत	सामान्य प्रशासन
115	दूरध्वनी खर्च व नोंदवहीच्या अनियमिततेबाबत.	दूरध्वनी
116	मुळ सेवापुस्तिकेतील अनियमिततेबाबत.	सामान्य प्रशासन
117	स्थावर मालमत्ता नोंदवही नसलेबाबत. (पाणीपुरवठा विभाग)	पाणीपुरवठा
118	पूर्ण/अपूर्ण कामाची योजना निहाय नोंदवही नसलेबाबत. (पाणीपुरवठा योजना)	पाणीपुरवठा
119	जंगम मालमत्ता नोंदवही नसलेबाबत. (पाणीपुरवठा विभाग)	पाणीपुरवठा

120	पाणीपुरवठा विभागास पुरविलेल्या पाणीपटी वसुली पावती बुके व मोजमाप पुस्तिका साठा नोंदवही बाबत.	पाणीपुरवठा
121	नियमबाहयपणे टॅकरव्दारे पाणी पुरविल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.	पाणीपुरवठा
122	टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणेबाबत.	पाणीपुरवठा
123	पाणीपटी वसुली पावतीपुस्तके न दर्शविणे तसेच इतर अनियमिततेबाबत.	पाणीपुरवठा
124	पाणीपटी कराच्या वसुली रकमा विलंबाने भरणा करणेबाबत.	पाणीपुरवठा
125	अधिकारी व कर्मचारी यांचेकडून तारण पत्र न घेणे व नोंदवही परिरक्षित नसलेबाबत (JNNURM योजनाव पाणीपुरवठा विभाग)	पाणीपुरवठा
126	विहीत नमून्यात अनामत नोंदवही न ठेवणेबाबत (JNNURM)	पाणीपुरवठा
127	म.न.पा. स्थायी समिती,विशेष सभा व सर्वसाधारण सभेच्या खर्चाबाबत	नगरसचिव
128	जंगम मालमत्ता नोंदवही परिपूर्ण नोंदी नसलेबाबत. (अग्निशमन विभाग)	अग्निशमन
129	JNNURM योजने अंतर्गत अपूर्ण राहिलेल्या प्रकल्प कामावरील खर्चाबाबत	JNNURM
130	बी.एस.यु.पी. योजनेतील अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबाबत.	JNNURM
131	बी.एस.यु.पी. योजनेतील अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबाबत.	JNNURM
132	शहरी गरिबांना मूलभूत सुविधा पुरविणे कार्यक्रम बी .एस.यु.पी. योजनेतील अनियमिततेबाबत.	JNNURM
133	JNNURM अंतर्गत निविदा प्रसिध्दी शासनाच्या संकेतस्थळावरुन प्रसिध्द न करता निविदा प्रक्रिया करणेबाबत.	JNNURM
134	सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अग्रीमधन नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्याबाबत	बांधकाम
135	सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मोजमाप पुस्तिका नोंदवहीबाबत.	बांधकाम
136	लेखापरिक्षणास नोंदवहया उपलब्ध न केल्याबाबत.	बांधकाम

137	बांधकाम विभागातील आमदार निधीतील अनियमिततेबाबत.	बांधकाम
138	बांधकाम विभागातील बी .आर.जी.एफ.निधीतील कामगार विमा शासकीय विमा निधी अंतर्गत न घेता खाजगी विमा कंपनीकडून घेण्याची अनियमितता.	बांधकाम
139	बी.आर.जी.एफ. योजनेतील पंधरा लक्ष रकमेची कामे निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिल्यामुळे वर्तमानपत्रातील जाहिरात खर्चाच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.	बांधकाम
140	रस्ते निधीतून केलेल्या खर्चाबाबत.	बांधकाम
141	बांधकामावर वापरलेल्या गौण खनिज रकमेवर जादा दरा ने आकारणी केल्या बाबत	बांधकाम
142	शासकीय विमा निधीकडे रकम जमा न केल्याबाबत.	बांधकाम
143	घटक साहित्य चाचणी करिता केलेल्या खर्चाबाबत.	बांधकाम
144	लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करणेबाबत.	बांधकाम
145	तिर्थक्षेत्र विकास निधीतून केलेल्या खर्चाबाबत.	बांधकाम

उपरोक्त नमूद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाचे पुढील अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत.

पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेख्यावरील लेखापरिक्षण पुनर्विलोकन, अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	लेखापरिक्षण वर्ष	परिच्छेद क्रमांक	एकूण
1	2011-12	4(2.280),16(2.281),22(2.282),36(2.283),53(2.284),57(2.285), 60(2.286),62(2.287),63(2.288),64(2.289),73(2.290),76(2.291) ,87(2.292),129(2.293) तक्तांकन 6 (2.325)	15

Part II

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

1 सन 2013-2014 चे मंजूर अर्थसंकल्पाबाबत अभिप्राय.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 17

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

सन 2013-2014 चे मंजूर अर्थसंकल्पातील सर्वसाधारण असलेल्या अनियमितताबाबत. जसे शासन निर्देशा नुसार अर्थसंकल्प तयार न करणे, वस्तूनिष्ठ व अचूक अर्थसंकल्प तरतुदी करणेची खबरदारी न घेणे, मागील तीन वर्षाच्या सरासरी उत्पन्न व खर्च आकडेवारी अर्थसंकल्प तयार करतांना विचारात न घेणे, लेखे विहित कालावधीत बंद न करणे, इ.

1.नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या नागरी स्वराज्य संस्था याचे सन 2013-2014 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात मंजूर अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता, मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2012-2013 चे सुधारित व कलम 95 नुसार सन 2013-2014 चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीने चर्चा करुन दि.08/03/2013 नुसार सर्वसाधारण सभेसमोर सादर केला.त्यामध्ये महानगरपालिका नांदेड-वाघाळा यांच्या सर्वसाधारण सभेने सुधारणा व दुरुस्त्या करुन सन 2013-2014 करिताचा मुळ अर्थसंकल्प जमा रक्कम रु.3010828304/- व खर्च रक्कम रु.2867705777/- यास महा नगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेने दि.03/04/2013 अन्वये मंजुरी प्रदान केली आहे.

2.नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड याच्या सन 2013-2014 या वित्तिय वर्षासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96व100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले सन 2013-2014 या वित्तिय वर्षाचा मूळ अर्थसंकल्प व कलम 103 व 104 अन्वये संमत केलेल्या सुधारीत अर्थ संकल्पीय जमा खर्चाच्या रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अंदाजपत्रक बाब	सर्वसाधारण सभेचे मूळ	अंदाजपत्रक बाब
अंदाजपत्रक -अ	1204827730	1215293457

अंदाजपत्रक -क	118879198	116195076
एकूण	1323706928	1331488533

उपरोक्त नमूद तपशिलाचे अवलोकन केले असता अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना सन 2013-2014 चे मुळ अर्थसंकल्प, सुधारीत अर्थसंकल्प व प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रक्कमा पाहता अर्थसंकल्प तयार करताना प्रत्यक्ष अपेक्षित जमा रक्कम व त्या आधारावर खर्च रक्कम यामध्ये मोठया प्रमाणात वाढ करुन फूगवून दाखविण्यात आलेली आहे. वस्तुनिष्ठ व अचुकतेने अर्थसंकल्प तयार करण्याची योग्य ती खबरदारी घेण्यात आलेली नाही.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 26 अन्वये व स्थायी निर्देश परिपत्रक क्रमांक नपसू/प्र.क्र.24/2000/1/दि.13/10/2000 नुसार अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करताना संस्थेच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचे व प्रत्यक्ष खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या सरासरीवर आधारीत असावयास पाहिजेत. मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्चाबाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	सन	प्रत्यक्ष जमा	प्रत्यक्ष खर्च
1.	2011-2012	1672340348	1351274093
2.	2012-2013	1592840400	1179684102
3.	2013-2014	1668704400	1369961232

वरीलप्रमाणे मागील वर्षाची व सन 2013-2014 ची प्रत्यक्ष जमा व खर्च पाहता मुळ व सुधारीत अर्थसंकल्प तयार करताना शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाहीचा अवलंब करुन अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत नाही.

3.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949 चे कलम 94(1)नुसार मा. आयुक्त यांनी प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील वर्षातील वार्षिक लेखे मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.सन 2013-2014 चे वार्षिक लेखे नांदेड-वाघाळा शहर महानगर पालिका नांदेडने तयारच केलेले नाहीत हे लेखे विहीत नमुन्यात तयार केले नसल्यामुळे लेखाशिर्ष निहाय खर्च किती झाला व तो योग्य होता कि नाही याबाबतील कुठलेही निष्कर्ष काढता आलेला नाही महाराष्ट्र नगरविकास विभाग दि.06/07/2005 चे शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने त्यांचे वार्षिक लेखे व्दीनोंद लेखा पध्दतीने उपर्जित तत्वावर ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 60 व 61 अन्वये महानगरपालिकेने वार्षिक लेखे यांचा गोषवारा नमूना क्रमांक 28 प्रमाणे मत्ता व दायित्वे नमूना क्रमांक 29 प्रमाणे तयार करुन संचालक, नगर विकास विभाग, नवी मुंबई यांना सत्वर पाठविणे आवश्यक असतांना सन 2013-2014 करिताचे विहीत नमुन्यात आकडेवारी/ विवरणपत्र सादर करण्यात आलेली नाहीत.

5.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 246(3) व राज्यसुचीच्या अ.क्र.05 नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना राज्य शासनाच्या वैधानिक चौकटीत आणण्यात आले असून 1992 च्या 74 व्या घटना दुरुस्तीने राज्यघटनेत 243(3) कलमांचा समावेश करुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा देण्यात आला त्यामुळे महानगरपालिकांच्या कार्य, कर्तव्य, निधीची तरतूद व जबाबदा-यात वाढ करुन नव्याने 18 विषय महानगरपालिकांकडे सोपविण्यात आले.

11व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी देशातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखे व अर्थसंकल्प यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी National Accounting Manual च्या धर्तीवर एकसारखी लेखासंहिता तयार करण्याविषयी राज्यशासनास सुचित केले,शासन निर्णय, नगरविकास विभाग,महाराष्ट्र शासन दिनांक 06 जुलै 2005 नुसार National Municipal Accounting Manual लागू करण्याचे आदेश सर्व महानगरपालिकांना दिलेले आहेत. तथापि नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड अदयापही (Accrual Base Double Entry) उपर्जित तत्वावर व्दिनोंद पध्दतीने लेखे ठेवलेले नाहीत. जुन्याच पध्दतीने Single Entry लेखे ठेवलेले आहेत. सदर लेख्यावरुन सन 2013-2014 चा अर्थसंकल्प तयार केलेला आहे.

6.शासन निर्णय,नगरविकास विभागाच्या आदेश व परिपत्रकान्वये महानगरपालिकांनी त्यांच्या वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना राखीव निधी ठेवण्याबाबत सुचना केलेल्या आहेत,त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अ)नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक GEN-1093/325/प्र.क्र.24 न.वि-32/दि.17/04/1993 नुसार महिला व बालकल्याणासाठी 5 टक्के अर्थसंकल्पांचा निधी राखीव ठेवावा.

ब)नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक GEN-1093/1981/न.वि-14/दि.14/07/1993 नुसार अपंगा साठी 3 टक्के निधी राखीव ठेवावा.

क)नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक GEN-1655/प्र.क्र.46/न.वि-33/दि.14/02/2002 नुसार नगर सेवकांना 2 टक्के निधी राखीव ठेवावा.

ड)नगरविकास विभाग, परिपत्रक क्रमांक-14200/2264/प्र.क्र-144/न.वि-24/दि.26/02/2001 नुसार आर्थिक दूर्बल घटकासाठी 5 टक्के निधी राखीव ठेवावा.

7.नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-BCC-1089/6056/D-10/दि.03/07/1982 Aaturary Provision 5 टक्के ठेवणे आवश्यक आहे. अखेरची शिल्लक दर्शविलेले अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता, उपरोक्त नमूद 01 ते 05 शासन निर्णय /परिपत्रकानुसार नमूद केल्याप्रमाणे बाबनिहाय राखीव निधी रक्कमांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही.

8.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 27(6) व शासन निर्णय दिनांक 04/05/2006 नुसार आस्थापना खर्च 35 पेक्षा जास्त होऊ नये असे स्पष्ट नमूद असतांना नांदेड-वाघाळा महानगर पालिकेने आस्थापना खर्च 68% पेक्षा अधिकचा आहे.

9.जमा रक्कम वाढविणे सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पाच्या जमेचे अवलोकन केले असता महानगर पालिकेने अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारिक पध्द्तीने घेतलेले आहेत. मागील तीन आर्थिक वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रक्कम व त्यावर आधारीत चालू अर्थसंकल्पात जमा होऊ शकणा-या सरासरी जमा रक्कमा गृहित धरणे आवश्यक आहे. परंतु मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष जमा रक्कम खुप कमी असतांना त्या प्रमाणात जमा रक्कमा न घेता त्यात अनावश्यक वाढ दर्शवून जमा रक्कम घेतलेल्या आहेत. यावरुन जमा रक्कमा वाढविल्याचे स्पष्ट होते.

10. नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडने घसारा निधी नियमावली तयार करुन त्याप्रमाणे घसारा निधीची रक्कम निश्चित करुन अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक असताना अशी तरतूद नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने केलेली नाही ही बाब शासन निर्देशा विरुध्द आहे.

11.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम100 नुसार महानगरपालिकेने पाणीपुरवठा निधी उभारणे आवश्यक आहे तसेच महानगरपालिकेच्या कर्मचारी/अधिका-यांच्या तीन महिन्याच्या एकूण वेतना इतका वेतन/निवृत्तीवेतन राखीव निधी उभारणे आवश्यक असताना अशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही.

12.नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड ने वित्तिय विवरणपत्राच्या आधारे जमा व खर्चाचे लेखा शिर्ष निहाय तपशिलवार वर्गीकरण छोटया घटकापर्यत केलेले नाही.

13.अर्थसंकल्पीय तरतुदी प्राप्त झाल्यानंतर खर्च करणारे विभाग त्यांना प्राप्त तरतुदीनुसार रक्कमा प्रत्यक्ष जमा नसल्या तरी रक्कमा महानगरपालिकेकडे उपलब्ध आहेत किंवा नाही याची खातरजमा न करता वर्ष अखेरीस रक्कम खर्च करण्यात येतात यामुळे महानगरपालिकेच्या देयतेत (Liability) वाढ होते.

14.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडने अंदाजपत्रक केवळ वार्षिक खर्च नियोजनापुरतेच मर्यादीत दिसून येते. संपूर्ण नांदेड वाघाळा शहर विकासाचा दिर्घकालीन विकास आराखडा(Development Plan) तयार करुन प्रत्येक वर्षाच्या अंदाजपत्रकातून विभागनिहाय तरतुदीची

विभागणी करुन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात माध्यमातून महानगरपालिकेच्या नियोजन व खर्चावर नियंत्रण करण्या बरोबरच महानगरपालिकेच्या विकास कार्यक्रमाची तत्वे व दिशा व खर्चाचे अग्रक्रम दिसून येणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून किमान उत्पन्नाच्या आधारे जास्तीत जास्त आवश्यकताची पूर्तता करुन शक्य होईल तेवढी आर्थिक उद्दीष्टे साध्य केली पाहिजेत व त्यासाठी लागणा-या सर्व साधनसामुग्रीचा कर्मचारी,प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचा पुरेपूर वापर करुन नियोजित उद्दीष्टे साध्य केल्याचे दाखविण्याचे अर्थसंकल्प हे प्रभावी साधन आहे.

15.महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा ढोबळ आकडेवारीत दर्शविण्यांत आलेला आहे. अर्थसंकल्प पुस्तकात विविध विभागात वाटप केलेल्या तरतुदीमधून साध्य करावयाची आर्थिक व भौतिक उद्दीष्टे स्पष्ट करणे आवश्यक आहे. अशी उद्दीष्टे अर्थसंकल्पात समाविष्ठ नाहीत. त्यामुळे वित्तिय शिस्त न राखता फक्त रक्कमा खर्च करण्याकडे कल दिसून येतो. (केला जातो) व भौतिक उद्दीष्टे साध्य करता येत नाहीत आणि सामान्य करदात्यांच्या पैशाचा विनियोग योग्य प्रकारे झाला किंवा नाही याची खात्री पटत नाही.

16.आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या सहा महिन्यानंतर जमा होणाऱ्या प्रत्यक्ष रकमा उत्पन्न होणारा प्रत्यक्ष खर्च यावर नियत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी आढावा तफावती दूर करून आर्थिक संतुलन राखण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे अशा आढावा बैठकीत कठोर उपाययोजना करण्याऐवजी फक्त शिल्लक तरतुदी दिल्या जातात व याची चर्चा देखील सुधारित अदाज सभागृहात होत नाही.

17.विविध विभागांना वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी वार्षिक नियोजन करुन समप्रमाणात आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून खर्च करणे अपेक्षित आहे, परंतु तसे न करता आर्थिक वर्ष संपताना खर्च करण्याकडे कल दिसून येतो. वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी वर्षा अखेरीस संपविल्या नाही तर खालीलप्रमाणे घटना घडतात.

अ. विभागाच्या खाती शिल्लक राहिलेली अर्थसंकल्पीय तरतुद वर्षा अखेरीस व्यपगत होते.

ब. विभागाकडून मागील वर्षी अर्थसंकल्प तरतूद व्यपगत झाल्यामुळे पुढील वर्षी तरतूद कमी प्राप्त होते.

क. नियंत्रक अधिकारी संबंधीत विभागास मागील आर्थिक वर्षाच्या तरतूदीप्रमाणे कमी खर्च करण्यासाठी बजावतात यामुळे व आर्थिक वर्षाच्या समाप्तीमुळे तरतूदी व्यपगत होण्याचे शासकीय नियम व वेळेचे बंधन यामुळे संबंधीत विभागाचे अधिकारी आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी दिलेली तरतूद संपविण्याची घाई करतांना दिसतात.

ड. विविध विकासाच्या योजनासाठी घेतलेली कर्जे त्यांची परतफेड व व्याजाचे हप्ते त्या त्या योजनेवर न टाकल्यामुळे संबंधीत योजनांचे मुल्य कमी दिसून येते व अंतिम उपभोगत्याकडून कराच्या रुपाने

वसुल करावयाची किंमत अपूरी राहते.

MUMARAM8201 (Ref No : 1, Hmm No : 128)

2 दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे अद्यावत न करणेबाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

शासन निर्देशानुसार महानगरपालिकेने सन 2013-2014 अखेर पर्यंतचे अभिलेखे व्दिनोंद पध्दतीने ठेवले नसलेबाबतची अनियमितता.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग ,शासन निर्णय क्र .लेखांस-10/2004/71/प्र.क्र.5/04नवी-3,दि.06/07/2005नुसार आपले लेखे हे दुहेरी (व्दिनोंद) (DOUBLE ENTRY)नोंद पध्दतीने अद्यावत ठेवण्याबाबतचे स्पष्ट निर्देश देण्यात आले ले असून, ड वर्ग दर्जाच्या महानगरपालिकांनी असे दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे अद्यावत ठेवण्याबाबतची अंमलबजावणी ही सन 2006-2007 चे आर्थिक वर्षापासून करणे अनिवार्य होते .मात्र नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी सन 2013-2014 या वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अद्यावत ठेवले नसल्याची अनियमितता कायम असल्याचे आढळून आले आहे .याबाबत सन 2012-2013 चे लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्र .02 नुसार आक्षेप नोंदवून ही महानगरपालिकाने हेतूपुरस्कर शासन निर्देशाप्रमाणे दुहे री नोंद पध्दतीत लेखे अद्यावत (सन2006-2007 पासूनचे) ठेवणेकामी विलंब /टाळाटाळ केली असल्याचे लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत झाले आहे.

शासन निर्देशाप्रमाणे दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी होत नसल्याने सन 2013-2014 अखेर महानगरपालिकाने वार्षिक अंदाजपत्रक ताळेबंद व उत्पन्न खर्च विवरण (Income & Expenditure Statement)इ.महत्वपुर्ण बाबींची अचुकता लेखापरीक्षणात पडताळता आलेली नाही.

दुहेरी नोंद लेखा पध्दतीत महानगरपालिकेने लेखे ठेवण्यास सुरुवात केली आहे.तथापि सदरची पध्दत मा.आयुक्त तथा संचालक,नगरविकास संचालनालय यांच्या सह मतीने व उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे

पुर्ण पणे कार्यान्वित केली नसल्याने सदरच्या आर्थिक वर्षाकरीता पुर्वीच्या रोख तत्वावर लेखे ठेवण्याची पध्दत अनुसार लेखे पडताळणीचे काम लेखापरीक्षणात करण्यात आलेले आहे .यामुळे दुहेरी नोंद लेखा पध्दत ठेवण्याच्या मुळ उद्देशाची उचित फलश्रुती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

तरी महानगरपालिकाने उपरोक्त शासन निर्देशाप्रमणे तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या सहमतीने पुर्वलक्षी प्रभावाने आपले सर्व लेखे दुहेरी नोंद पध्दतीत अद्यावत करुन सदरची पध्दत सत्वर अस्तित्वात आणणे आवश्यक आहे.

MUMARAM8201 (Ref No : 2, Hmm No : 73)

3 सर्व योजनेचे रोख पुस्तिका शिल्लकेशी बँक स्क्रोलप्रमाणे ताळमेळ न घालणे बाबत

00

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका अनुक्रमांक 1 ते 15 रोख नोंदवहया योजनानिहाय विविध ठेवण्यात आलेल्या आहेत. रोख नोंदवहया संगणकीकृत ठेवण्यात आल्या असून नोंदवहयास सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत. तसेच दरमहा महिनाअखेर रोख नोंदवही शिल्लक व बँक शिल्लक ताळमेळ घालून न वटलेल्या धनादेशाचा व शिल्लक रक्कमेचा तपशिल नोंदविलेला नाही. वर्षाअखेर अखर्चित रक्कम मोठया प्रमाणात शिल्लक असून ती शासनखाती भरणा केलेली नाही त्यामुळे अनियमीततेस वाव आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका लेखा विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील रोख नोंदवहयास शिल्लक रक्कम दिसून आली.

वर्ष 2013-2014						
अ.क्र.	योजनेचे नाव	सुरुवातीची शिल्लक	प्राप्त रक्कमा	व्याज व इतर जमा	एकुण खर्च	अखेरची शिल्लक
1.	दलित वस्ती सुधार	17715715	16000000	443835	7350339	26809211
2.	आमदार निधी	4461646	5624000	273261	5782223	4576684
3.	खासदार निधी	355495	0	13249	43638	325106

4.	BRGF योजना	32844976	0	1302705	16486576	17661105
5.	13th Finance	758080	138557489	743935	110970570	29088934
6.	नावीन्यपुर्ण योजना	26360959	40827000	2794318	14777533	55204744
7.	D.R.R.P. Fund	4198001	12197885	248620	4225643	12418863
8.	अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास	2305029	2000000	101880	690133	3716776
10.	E-Governance	29559208	0	2287471	16534063	15312616
11.	रस्ते अनुदान	620252	16409859	19154172	66183636	-29999353
12.	सिडको मोंढा	19807336	0	0	9000000	10807336
13.	IDSMT	22420334	0	2054887	8476323	15998898
14.	JNNURM	31831220	83218	7081311	26038247	12957502
15.	Marathwada Pkg.	-13453	0	3139707	2944313	181941

1. वरील रोख नोंदवहयास व्याजाची/ अखर्चित रक्कम मोठया प्रमाणात शिल्लक दिसन आली ती महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 10.02/प्र.क्र.128/ अर्थोपाय दिनांक 06 जून, 2008 नुसार एखादया आर्थिक वर्षात प्राधिकरण (महानगरपालिका) यांना दिलेला निधी , अखर्चित नि धी मुक्त केल्यानंतर खर्च करण्याची कालमर्यादा ही लगतच्या आर्थिक वर्षापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होवून निधी अखर्चित राहिला असेल तर तो शासनखाती भरणा करावयास पाहिजे .अनुक्रमांक 1ते15 रोख नोंदवहया योजनानिहाय विविध ठेवण्यात आलेल्या आहेत. रोख नोंदवहया संगणकीकृत ठेवण्यात आल्या असून नोंदवहयास सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत.

2. महानगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 51(3) नुसार दैनंदिन व्यवहारास दिनांक निहाय जमा व खर्चाच्या नोंदी घेवून बँकस्क्रोलप्रमाणे महिनाअखेर ताळमेळ घातलेला नाही, न वटलेल्या धनादेशाचा तपशील नोंदविलेला नाही , शिल्लक रक्कमेचा तपशील नोंदविलेला नाही त्यामुळे अनियमीततास वाव आहे.

3. महानगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 24 अन्वये मनपा लेखा खात्यावर कोषागार अथवा बँकेत भरणा केलेल्या सर्व रक्कमाचे प्रदाने याच्या नोंदी पासबुकामध्ये करणे आवश्यक आहे.

4. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, 2010 (2)(ग) अन्वये प्राधिकृत केलेल्या बँक खात्यावर जमा होणा-या रक्कमाशी ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र स्थानिक संस्था अधिनियम, 1931 सुधारण 2011 मधील कलम 6 नुसार अर्धसमास

क्रमांक 156 दिनांक 25/10/2017 अन्वये कळवून अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

MUMARAM8201 (Ref No : 3, Hmm No : 156)

4 प्रतिभूती बंधपत्र न घेणे बाबत

00

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 138 नुसार जमानतनामे व जमानत बंधपत्र संबंधित वसुली लिपीक यांचेकडून घेण्यात आलेले नाही.

नांदेड-वाघाळा महानगरपालिका अंतर्गत लेखा परीक्षण केले असता असे निदर्शणास आले की , सर्व विभागात , भांडार, मालमत्ता,बीएसयुपी, जन्म-मृत्यु,अग्नीशमन, दवाखाने,पशुसंवर्धन,करविभाग, अतिक्रमण, लेखा विभाग, इत्यादी विभागाअंतर्गत तसेच क्षेत्रीय कार्यालयात रोख रक्कमा हाता ळण्याचे काम कर्मचारी करतात. विभागाने संबंधीत वसुली कर्मचारी किंवा रोखपाल इत्यादीकडून तारण घेतलेले नाही. तसेच तारण नोंदवही अदयावत ठेवलेली नाही .नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 138 अन्वये मौल्यवान वस्तु व रोख रक्कमा हाताळणारे कर्मचारी यांचेकडून रोख रक्कमे चे तारण किंवा नमुना-05 मध्ये वैयक्तिक बंधपत्र घेण्याची तरतूद असतांना कार्यालय प्रमुखाने सर्व विभागातील कर्मचा-याकडून तारण घेतलेले नाही.तरी संबंधीत पात्र कर्मचारी यांचेकडून जमानतनामे बाबत अभिलेखे हस्तगत करुन कार्यालया च्या अभिलेख संचिकेत ठेवल्याचे निदर्शणास न आल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

MUMARAM8201 (Ref No : 4, Hmm No : 151)

5 *वार्षिक विवरणपत्र शासनाकडे व मा. महालेखापाल, नागपुर यांना सादर न केल्याबाबत.*

00

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम 1949 चे नियम 126 नुसार वार्षिक विवरणपत्र राजपत्रात प्रसिध्दीस न देता शासनाकडे व महालेखापाल, नागपुर यांना सादर न केल्याबाबत.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे सन 2013-14 या वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना खालील बाबींची गंभीर अनियमीतता आढळून आलेली आहे.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 126 नुसार मा. आयुक्तांनी प्रत्येक वर्षाच्या शेवटी पुढील गोष्टी दर्शविणारे एक विवरणपत्र तयार केले पाहिजे.

अ) महानगरपालिका ज्याबद्दल दायी आहे व ज्याची वर्ष सुरु होण्यापुर्वी पूर्णपणे परतफेड करण्यात आली नाही अशी मागील वर्षात काढलेली कर्जे ,वर्षाच्या सुरुवातीस देणे असलेली बाकी रक्कम ,कर्ज घेतल्याची तारीख व कर्जाबद्दल दयावयाचे वार्षिक आकार यांच्या तपशिलासह;

ब) वर्षामध्ये महानगर पालिकेने काढलेली कर्जे, कर्जाची रक्कम, कर्जे काढल्याची तारीख व कर्जा बद्दल दयावयाचे वार्षिक आकार यांच्या तपशिलासह;

क) ज्यासाठी कर्जनिवारण निधी स्थापन करण्यात आला आहे अशा प्रत्येक कर्जाच्या बाबतीत वर्षअखेर अशा वर्षात निधीच्या खाती जमा करण्यात आलेली रक्कम वेगळी दाखवून कर्जनिवारण साचलेली रक्कम;

ड) त्या वर्षात फेडलेली कर्जे आणि हप्त्यांनी किंवा वार्षिक रक्कम काढून फेडलेल्या कर्जाच्या बाबतीत त्या वर्षात फेडलेल्या रक्कमा आणि वर्ष अखेरीस देणे असलेली बाकी रक्कम;

ई) ज्या कर्जरोख्यांमध्ये कर्जनिवारण निधीच्या रकमा गुंतविण्यात आल्या आहेत किंवा ज्यांच्यासाठी त्या राखून ठेवण्यात आल्या आहेत त्या कर्जरोख्यांचा तपशील.

2. असे प्रत्येक विवरणपत्र महानगरपालिकेच्या बैठकीपुढे ठेवण्यात आले पाहिजे व ते शासकिय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले पाहिजे आणि अशा विवरणपत्राची एक प्रत राज्य शासनाकडे व महा लेखापाल, नागपुर यांच्याकडे पाठविण्यात आली पाहिजे.

सदरील कार्यवाही झालेली नसल्यामुळे गंभीर अनियमितता झालेली असून कलम 126 चे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झालेले आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक07दिनांक 19/10/2016 नुसार संबंधित विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

MUMARAM8201 (Ref No : 5, Hmm No : 07)

6 ठेव नोंदवही बाबत.

00

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

नांदेड-वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांनी ठेव नोंदवही लेखापरिक्षणास सादर केली नाही.

नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 191 नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांस ठेकेदाराकडून, पुरवठादाराकडून व इतर सन 2013-14 या आथिक वर्षात प्राप्त झालेल्या अनामत रक्कमेची नोंदी ठेवीच्या स्वरुपात ठेव नोंदवही नमुना148मध्ये नोंदी घेऊन नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक अस तांना अर्धसमास पत्र क्रमांक 07दि19/10/2016 नुसार लेखापरीक्षणास ठेव नोंदवहीची मागणी केली असता ठेव नोंदवही सादर करण्यात आलेली नाही.

आर्थिक वर्ष सन 2013-14 मध्ये ठेवी या सदराखालीकिती रक्कम जमा झाली पैकी किती रक्कम मागणीदारास प्रदान केली वर्षाअखेरीस किती रक्कम शिल्लक राहिली, शिल्लक रकमेचा गोषवारा नोंदवही अभावी तपासता आला नाही.

महानगरनलिका लेखा संहिता 1971 नियम 190 (3) नुसार महसुली जमा शिर्षकाखाली 3 वर्षापेक्षा अधिक

कालावधीच्या ठेवी व्यपगत करुन महसुली जमा शिर्षकाखाली जमा करण्यात आलेली रक्कम मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेउन मागणीदारास प्रदान केलेल्या रक्कमांची खात्री करता आली नाही. ठेव नोंदवही अदयावत करुन लेखा परीक्षणास सादर करावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक07दि19/10/2016 नुसार संबंधित विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

MUMARAM8201 (Ref No : 6, Hmm No : 07)

7 अधिकारी / पदाधिकारी / कर्मचारी यांच्या समूह भ्रमणध्वनी वरील खर्च मनपा निधीतून झालेल्या अनियमिततेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1789041.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1789041.00/-

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेला ठराव क्र.190 दि.31/03/2010 नुसार अधिकारी/ पदाधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी आयडिया सेल्यूलर मर्या. सिमकार्ड वापर सेवेकरिता रु.399/- – 649/- चा प्लॅन व कर्मचारी यांच्यासाठी रु.349/- चा प्लॅन याप्रमाणे आदेश जा.क्र./ नांवाशमनपा/ करवि/ 3120 /10/ दि.14/07/2010 नुसार वापर सेवा पुरविण्यात आलेली असून त्यावरील खर्च रु.1789041/- मनपा निधीतून करण्यात आलेला आहे.

सन 2013-2014 या वित्तिय वर्षात दुरध्वनी विभागाने अधिकारी / पदाधिकारी/ कर्मचारी यांच्या समूह भ्रमणध्वनी वरील उपलब्ध करण्यात आलेल्या खर्चाबाबतचे अभिलेखे तपासले असता , महानगर पालिकेने संबंधीत अधिकारी / पदाधिकारी / कर्मचारी यांना समूह भ्रमणध्वनी सिमकार्ड पुरविले असून त्यावरील खर्च मनपा निधीतून करण्यात आलेला आहे . नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका , नांदेड यांच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेला ठराव क्र .190 दि.31/03/2010 नुसार अधिकारी/ पदाधिकारी यांच्यासाठी आयडिया सेल्यूलर मर्या . सिमकार्ड वापर सेवेकरिता रु .399/- - 649/- चा प्लॅन व कर्मचारी यांच्यासाठी रु.349/- चा प्लॅन याप्रमाणे आदेश जा.क्र./ नांवाशमनपा / करवि / 3120 / 10 /

दि.14/07/2010 नुसार वापर सेवा पुरविण्यात आलेली आहे . ठरावानुसार प्रत्येक मोबाईलधारकांचे दरमहा प्लॅनच्या रकमेपेक्षा जादा बिल आल्यास विभागाने लेखा शाखेक डे संबंधीताच्या जादा आलेल्या रकमेची वेतन देयकातून कपातीचे बिल तयार करुन रक्कम वसुल करणेबाबत कळवून उर्वरीत मासिक खर्चास मर्यादेच्या अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे . त्या अनुषंगाने एकूण 429 सिमकार्ड वापरात असुन सदर आर्थिक वर्षात कालावधी निहाय एकूण रक्कम रु.2223769/- एवढी खर्च झालेली असून संबंधीताच्या बिलातील आलेली जादा रक्कम वेतनदेयकातून रु .434728/- एवढी वसुल करुन उर्वरीत रक्कम रु.1789041/- खर्च करण्यात आलेली आहे.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये महानगरपालिका अधिकारी /विभाग प्रमुख यांना कार्यालयीन कामकाजासाठी समूह भ्रमणध्वनी (मोबाईल) सेवेसाठी सिमकार्ड उपलब्ध करुन देणे व त्याबाबतचा मासिक खर्च करणे इ . बाबत कोणतीहीं तरतूद नाही , तसेच कलम 458 नुसार महानगरपालिकेने या विषयांकीत बाबीकरिता आवश्यक तो उपविधी शासनाकडून मंजूर करुन घेतलेला नाही. यामुळे समूह भ्रमणध्वनीवरील एकूण केलेल्या खर्चाची रक्कम रु.1789041/- नियमबाहय असून वसुलीस पात्र ठरतो. त्यामुळे सदर खर्च संबंधीताकडून वसुल करुन रक्कम महा नगरपालिका निधीत भरणा करावी.

2.भ्रमणध्वनी मासिक खर्चास उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मान्यता दिलेली असल्याने सन 2013-2014 चे मंजुर सुधारीत अर्थसंकल्पात महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता-1971 चे नियम 28 नुसार केलेली तरतूद व त्यानुसार झालेला खर्च नियमबाहय ठरतो.

तरी आक्षेपानुरुप कार्यवाही करावी , नियमात तरतूद नसल्याने अधिकारी / पदाधिकारी / कर्मचारी यांचा समूह भ्रमणध्वनी (मोबाईल) सेवेवर होणारा कोणताही खर्च महानगरपालिका निधीतून देय असणार नाही व तो होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी . सन 2012-2013 च्या लेखापरिक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 18 मध्ये आक्षे प नमूद करुनही अदयापपावेतो महानगर पालिकेने याबाबत योग्य ती कार्यवाही केलेली नाही

CCRVNRM6701 (Ref No : 110, Hmm No : 172)

8 *रोख पुस्तकात पुरेशी शिल्लक नसतांना अधिक रकमेचे धनादेश वितरीत करणे बाबत.*

लेखा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 181225801.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 181225801.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 181225801.00/-

नांदेड-वाघाळा महानगरपालिका योजनानिहाय रस्ते अनुदान व सुवर्ण जयंती या योजनांची रोजकिर्द तपासणी केली असता प्राप्त तरतुदीपेक्षा जादा खर्च करुन रोख पुस्तीकेत शिल्लक नसतांना वजाती खर्च दर्शवून धनादेश वितरीत करण्यात आलेले आहेत. रोजकिर्दीमध्ये 31.03.2014 रोजीची खालील योजनांची अखेरची शिल्लक उणे दर्शविण्यात आलेली आहे.

अर्धसमास पत्र क्रमांक 156 दिनांक 25/10/2017 नुसार लेखा विभागाने समर्थनीय खुलासा प्राप्त करुन न दिल्यामुळे खालील परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

1. रोख पुस्तिका रस्ते अनुदान नोंदवहीस मार्च-2014 अखेर रक्कम रुपये 2,99,99,353/- एवढा खर्च वजाती दर्शवून धनादेश वितरीत केलेले आहे.

2. रोख पुस्तिका सुवर्ण जयंती नोंदवहीस मार्च-2014 अखेर रक्कम रुपये 15,12,26,448/- एवढा खर्च वजाती दर्शवून धनादेश वितरीत केलेले आहे.

वरील दोन्ही योजनेत रक्कम शिल्लक नसतांना खर्च टाकण्यात आलेला असून रोख पुस्तिका लेखा विभाग यांच्या नियंत्रणात असल्यामुळे अतिरीक्त टाकण्यात आलेला खर्च मुंबई वित्तीय नियमावली, 1959 अन्वये वित्तीय औचित्याचा भंग झालेला आहे. या अनियमीततेबाबत खुलासा करून अनुपालन सादर करण्यात यावे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 156 दि25/10/2017 नुसार संबंधित विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

MUMARAM8201 (Ref No : 116, Hmm No : 156)

9 मुळ प्रमाणके लेखापरिक्षणासाठी सादर न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : डिआरआरपी शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4162643.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 4161643.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.10 दि.26.10.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

D.R.R.P Fund 2013-14

Sr.No.	Vor. No.	Date	Amount	Amount Claim Company
1	1	23.7.13	3000	प्रेसिडेट गोदावरी जीवरक्षक सेवाभावी संस्था नांदेड
2	2	3.8.13	318000	श्री.बेनुधर बरीक प्रोजेक्ट सपोर्ट असोसाईट मनपा नांदेड
3	3	22.8.13	3000	प्रेसिडेट गोदावरी जीवरक्षक सेवाभावी संस्था नांदेड
4	4	18.09.13	50000	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
5	5	8.10.13	30000	प्रेसिडेट गोदावरी जीवरक्षक सेवाभावी संस्था नांदेड
6	6	30.10.13	159000	श्री.बेनुधर बरीक प्रोजेक्ट सपोर्ट असोसाईट मनपा नांदेड
7	7	31.10.13	79800	प्रेसिडेट गोदावरी जीवरक्षक सेवाभावी संस्था नांदेड
8	8	31.10.13	475626	टाटा मोटार्स लि.पुणे
9	9	31.10.13	160000	बबोलट असोशिएट
10	10	31.10.13	1003500	सोलारी इंजिनियरीग पुणे
11	11	31.10.13	30000	प्रेसिडेट गोदावरी जीवरक्षक सेवाभावी संस्था

				नांदेड
12	12	2.12.13	519463	एमजिएम कॉलेज ऑफ इंजिनीयरींग
13	13	5.12.13	20178	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
14	14	5.12.13	12412	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
15	15	5.12.13	10140	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
16	16	5.12.13	15500	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
17	17	5.12.13	60500	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
18	14	20.12.13	18412	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
19	14	24.1.14	18412	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
20	18	24.1.14	58500	श्री.मिर्जा फरहातुल्ला बेगम, गार्डन सुपरिटेंडेट मनपा नांदेड
21	19	1.2.14	159000	श्री.बेनुधर बरीक प्रोजेक्ट सपोर्ट असोसाईट मनपा नांदेड
22	20	6.2.14	104400	फिटेक इक्वीपमेंट(आया) प्रा.लि.
23	21	11.02.14	411800	लोणार फाऊंडेशन पुणे
24	22	15.03.14	415000	लोणार फाऊंडेशन पुणे
		एकूण	4162643	

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र **अर्धसमासपत्र क्र.10 दि.26.10.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत** कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका याना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने **सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे**

अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते. वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे

FDSKVSM6701 (Ref No : 52, Hmm No : 10)

10 IDSMT योजनेची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :IDSMT शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 11765459.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 11765459.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.11 दि.26.10.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद IDSMT योजनेची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount	Amount Claim Company
1	1	21.05.13	92232	डायरेक्टर श्री.गोविंदसिंघ इन्स्टीटयुट ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नोलॉजी नांदेड
2	2	19.09.13	3383971	मे.प्रविण कंस्ट्रक्शन नांदेड
3	3	5.12.13	3284136	मे.प्रविण कंस्ट्रक्शन नांदेड
4	3	5.12.13	3284136	मे.प्रविण कंस्ट्रक्शन नांदेड
5	4	18.03.13	1720984	मे.प्रविण कंस्ट्रक्शन नांदेड

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र अर्धसमासपत्र क्र.11 दि.26.10.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते. वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 53, Hmm No : 11)

11 13 वा वित्त आयोगाची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :13 वा वित्त आयोग शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 91395532.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 91395532.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.12 दि.26.10.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद 13 व्या वित्त आयोगाची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount	Amount Claim Company
1	1	06.04.13	15000000	उपजिल्हाधिकारी भुसंपादन अधिकारी नादेड

2	2	28.05.13	10000000	आयुक्त महानगरपालिका नांदेड
3	3	28.05.13	14500000	मॅनेजर कॅनडा बॅक नांदेड
4	3	1.06.13	4886196	ए टु झेड इन्फ्रास्ट्राक्चर लि.
5	5	03.06.13	5988166	ए टु झेड इन्फ्रास्ट्राक्चर लि.
6	6	19.08.13	5853369	ए टु झेड इन्फ्रास्ट्राक्चर लि.
7	9	1.10.13	6367626	ए टु झेड इन्फ्रास्ट्राक्चर लि.
8	10	1.11.13	3140504	मै इंद्रजा कंस्ट्रक्शन नांदेड
9	11	26.11.13	2293588	मै इंद्रजा कंस्ट्रक्शन नांदेड
10	12	21.12.13	1197226	मै इंद्रजा कंस्ट्रक्शन नांदेड
11	13	28.01.14	2411691	मै इंद्रजा कंस्ट्रक्शन नांदेड
12	14	25.03.14	2537697	मॅनेजर कॅनडा बॅक नांदेड
13	15	27.03.14	2017590	अशोक इंटरप्राईजेस नवी मुंबई
14	16	29.03.14	9475994	ए टु झेड इन्फ्रास्ट्राक्चर लि.
15	16	29.03.14	5725885	आयुक्त महानगरपालिका नांदेड

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र **अर्धसमासपत्र क्र.12 दि.26.10.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत** कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने **सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते.** वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 54, Hmm No : 12)

12 भविष्य निर्वाह निधीची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :भ.नि.नि. मनपा निधी निधी

नांदेड वाघाळा महानगरपालिका

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 272094.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 272094.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.13 दि.04.11.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद भविष्य निर्वाह निधीची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount	Amount Claim Company
1	0	10.03.14	95698	इलावतगे गुरुनाथ शंकरआप्पा
2	0	11.03.14	17796	मारोती माणिका जोंधळे
3	0	12.03.14	81000	गुंडेवार गणेश राजाराम
4	0	28.03.14	60000	कांबळे डी.जी.
5	0	28.03.14	7600	जनार्धन कामाजी किरणे
6	0	31.03.14	10000	नवाबकौर राजेश बिडला
		एकुण	272094	

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र **अर्धसमासपत्र क्र.13 दि.04.11.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत** कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने **सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते.** वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 55, Hmm No : 13)

13 *महानगरपालिका निधीची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : मनपा मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 691740.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 691740.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.14 दि.04.11.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद महानगरपालिका निधीची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount
1	3289	28.03.14	239120
2	3290	29.03.14	1000
3	3293	29.03.14	448
4	3292	25.03.14	109582
5	3016	03.03.14	340690
6	3092	18.03.14	900

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र अर्धसमासपत्र क्र.14 दि.04.11.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने सदर बाब महाराष्ट्र

स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते. वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 56, Hmm No : 14)

14 E-GOVERANANCE बाबतची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनिक्रमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :ई-गर्व्हन्स शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 2949100.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2949100.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.18 दि.08.11.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद E-GOVERANANCE बाबतची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount	Particular
1	1	04.05.13	150000	मे.ऑमट्रीक्स नांदेड
2	2	04.05.13	852000	मे विजन टेक सोल्युशन नांदेड
3	5	13.09.13	1256800	डॅक्सीस सिक्युरीटी प्रा.लि.पुणे
4	7	13.09.13	81300	एम एन इन्टरप्रायजेस

				नांदेड
5	14	1.11.13	84000	श्री सदाशिकव पंडीतराव पतंगे
6	16	6.11.13	250000	मे.सॉफटेक इंजिनीयर नांदेड
7	20	12.03.14	275000	फाउंटेनहेड इंफो सोल्युशन प्रा.लि.
		एकुण	2949100	

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र **अर्धसमासपत्र क्र.18 दि.08.11.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत** कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने **सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते.** वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 57, Hmm No : 18)

15 खासदार निधी बाबतची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : खासदार निधी शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 43638.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 43638.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेंदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.17

दि.08.11.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद MP FUND बाबतची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount	Particulars
1	1	16.04.13	21821	मे.कुणाल कंन्स्ट्रक्शन नांदेड
2	1	04.10.13	21817	मे.कुणाल कंन्स्ट्रक्शन नांदेड

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र **अर्धसमासपत्र क्र.17 दि.08.11.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत** कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने **सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते.** वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 58, Hmm No : 17)

16 शासन विशेष अनुदानाची प्रमाणके/अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :विशेष अनुदान शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 20000000.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 20000000.00/-

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने सविस्तर परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रमाणके, अभिलेखे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्र.16 दि.08.11.2016 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने खालील नमूद महाराष्ट्र शासन विशेष अनुदान बाबतची प्रमाणके, रोख पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

Sr.no.	Vor.No	Date	Amount	Particulars
1	0	18.03.14	20000000	मॅनेजर देना बॅक शाख आनंद नगर नांदेड

वरिलप्रमाणे प्रमाणके,अभिलेखे लेखा शाखेस अर्धसमासपत्र **अर्धसमासपत्र क्र.16 दि.08.11.2016 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत** कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने **सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते.** वरिल विवरणात नमूद केलेली रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत असुन सदर परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 59, Hmm No : 16)

17 बॅक स्टेटमेंट लेखापरिक्षणासाठी सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 07

लेखा शीर्ष : लेखा शाखा शासना/मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,अभिलेखे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) नुसार स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु लेखा शाखेने बॅक ताळमेळाची विवरणपत्रे सादर केलेली नाहीत त्यामुळे निधीचा ताळमेळ करता आला नाही याबाबत अर्धसमासपत्र क्र.27 दि.10.01.2017 अन्वये मागणी करुनही बॅक विवरणपत्रे सादर केलेली नाहीत.

लेखापरिक्षणासाठी प्रमाणके,विवरणपत्रे उपलब्ध करुन् देणे ही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधील कलम 6 अन्वये स्थानिक प्राधीकरणाची जबाबदारी आहे परंतु लेखा शाखेने रोख पुस्तक सादर केले परंतु बॅक ताळमेळाची विवरणपत्रे सादर केलेली नाहीत त्यामुळे निधीचा ताळमेळ करता आला नाही. उपलब्ध केलेल्या रोख पुस्तकाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1.सदर रोख पुस्तक मुंबई वित्तीय नियमावली 1959 नियम क्र.45 चा अवलंब करुन तयार करण्यात आले नाही.

2.सदर रोख पुस्तकात पृष्टाकन करुन साक्षांकीत केलेले नाहीत.

3.सदर रोख पुस्तकात किती महसुल/निधी प्राप्त झाला याची जमा बाजूस नोंद घेतलेली नाहीत.

4.सदर रोख पुस्तकात खर्च बाजूस धनादेश क्रमांक तसेच प्रमाणक क्रमांक नोंदविण्यात आला नाही.

5.सदर रोख पुस्तकात महिना अखेर ताळमेळ/गोषवारा काढण्यात आला नाही.

6.रोख पुस्तकात प्रारंभीची शिल्लक व शेवटची शिल्लक नोंद नाही.

7.रोख पुस्तकात रोख शिल्लक काढूण अंकात व अक्षरात लिहून सक्षम प्राधीका-याची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त बाबत अर्धसमासपत्र क्र.27 दि.10.01.2017 अन्वये लेखापरिक्षणासाठी सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते तसेच मा.उपसंचालक(मनपालेप),स्थानिक निधी लेखापरिक्षा,उपविभाग-3 औरंगाबाद यांनी मा.आयुक्त,नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांना अर्धशासकीय पत्रान्वये अभिलेखे लेखापरिक्षणासाठी सादर करणेबाबत कळविले होते तसेच प्रमाणके उपलब्ध करुन देण्याबाबत स्मरणपत्र क्र.58 दि.02.03.2017 देण्यात आले होते तरिसुध्दा अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नसल्याने सदर बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930(सुधारणा 2011) मधिल कलम 07 नुसार अभिलेखे अनुपलब्ध सदर्भात दंडात्मक कारवाई करणे करीता पात्र ठरते.

FDSKVSM6701 (Ref No : 62, Hmm No : 27)

नांदेड वाघाळा महानगरपालिका

18 दिपनगर पाटी ते धन्वंतरी कॉलनी मार्ग तुंगनेवार यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रोड तयार करणे कामातील अनियमीततेबाबत. (बीआरजीएफ)

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 शासन निधी मागास वर्ग अनुदान निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4380875.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 4140056.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 240819.00/-

निवीदा प्रक्रिया रदद न करता इतर कामाकरीता मान्य केलेली निवीदा स्विकारून व त्या निवीदाकारास नियमबाहयरित्या कामाचे आदेश देणे कामाचे कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रीया चुकीच्या पदध्दतीने झालेली असल्याने जादा प्रदान होणे, शासन परिपत्रक 03.11.03 नुसार कामाचा व कामगारांचा शासकीय विमा न उतरविणे

अनु क्र.	देयक	रककम	धनादेश क्र.	दिनांक
1.	प्रथम धावते देयक	3266612	1771380	31.12.2013
2.	अंतीम देयक	1114263	771013	19.05.2014

सदर कामास जिल्हाधीकारी यांचे आदेश क्र.41 दि.6.2.2013 अन्वये प्रशासकीय मान्धता प्रदान आहे. मुळ प्रशासकीय मान्यता ही जंगमवाडी भागात mseb पॉवर स्टेशन ते पुर्णा रोड पर्यंत रस्ता व rcc नालीचे बांधकाम या संबंधीताची आहे.

नस्तीची तपासणी केती असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हाधीकारी यांचे आदेश क्र. 41 दि 6.2.2013 अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता ही जंगमवाडी भागात mseb पॉवर स्टेशन ते पुर्णा रोड पर्यंत रस्ता व rcc नालीचे बांधकाम या संबंधीताची आहे. तथापी मा.आयुक्त यांच्या स्थळ पाहणी दरम्यान (दि 15.7.2013) प्रस्तावीत रस्त्यावर सिंचन विभागामार्फत B.T.रस्त्याची काम केलेले आहे . त्यामुळे मनपाच्या वतीने कामात बदल करुन प्रस्तावीत काम घेणे बाबतचा प्रस्ताव मा जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला. मा जिल्हाधिकारी यांनी त्यांचे आदेश दि 03.10.2013 अन्वये जंगमवाडी भागा तील काम रदद करुन नविन काम दिपनगर पाटी ते धन्वंतरी कॉलनी मार्ग तुंगनेवार याच्या घरापर्यंत CC रस्ता करण्याच्या कामांना सन

2013-14 या वित्तीय वर्षामध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

2 विभागाने तांत्रीक मान्यतेनंतर सन 2011-12 च्या दरसुचीवर आधारीत मे .निखीला कन्स्ट्रक्शन नांदेड यांची ई -निवीदेच्या चौथ्या मागणीनुसार 4.7% जास्त दराची निवीदा (रु.43.82) लक्ष मंजुर दिसते. मा जिल्हाधिकारी यांचे आदेश दि 03.10.2013 नूसार जंगमवाडी येथील रस्ता व नालीचे काम रदद झाले असल्याने त्या कामाच्या अनुषंगाने आलेली निवीदा प्रक्रीयाही रदद करणे अनिवार्य असताना महानगरपालीकेने अशी कार्यवाही न करता पुर्वीच्या रदद झालेल्या कामाचे निवीदाकार मे . निखीला कन्स्ट्रक्शन्स यांनाच प्रस्तावीत काम 4.7% जास्त दराने देऊन अनियमीतपणे कार्यारंभ आदेश निर्गमीत केले आहेत.

3 सदरील कामाचे कार्यारंभ आदेश देण्या ची प्रक्रीया चुकीच्या पदध्दतीने झालेली असल्याने सदर कामाचे प्रदान रु 4380875/- आपेक्षाधीन तसेच कार्यारंभ आदेश 4.7% जास्त दराने दिलेले असल्याने त्याबाबतची रु.1.97 लक्ष रककम वसुल पात्र ठरते . तसेच काम सुरु होण्याच्या अगोदर गुत्तेदाराने कामचा तसेच कामगारांचा विमा शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्रं.जेईएन/1098/1357/प्र.क्रं.166/98 दि.03.11.03 नुसार काढला नसल्याने कामाच्या 1% प्रमाणे रु.43819.00 ही वसुल पात्र ठरतात.

4. याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 42 दि.31.01.2017 अन्वये अनुपालनाकामी देउनही अनुपालन प्राप्त न झाल्याने अभिप्राय अंतीम करण्यात आले.

अंतीम अमान्य रक्कम - 240819/-

तात्पुरती अमान्य रक्कम - 4140056/-

DATRMSM6902 (Ref No : 7, Hmm No : 42)

19 प्रभाग क्रं.2 मधील देखभाल दुरुस्ती (AMC)अंतर्गत करण्यात आलेल्या कामाच्या अनियमीततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 2922374.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2797748.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 124626.00/-

निवीदा तयार करताना विवरणपत्र ब तयार न करता जिल्हा दरसुचीनुसार किरकोळ कामाकरीता रू50 लक्ष ही अंदाजपत्रकीय रक्कम निश्चीत करूनही नस्तीतील नोंदीनुसार रू1.24 कोटी इतक्या रकमेचे देयक प्रदानाकरीता सादर केली आहेत देखभाल दुरूस्ती करीता दरकरार करताना जिल्हा दरसुचीचा वापर केलेला असताना खर्चाची रक्कमेत मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसुन येते म्हणजेच दरकरार करताना कामाची व्यापकता लक्षात न घेता ढोबळ मानाने निविदा तयार केलेली आहे. महाराष्ट्र शासन (नगर विकास विभाग) यांच पत्र जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98 नवि28 दि 03.11.2003 अन्वये मनपाच्या वतीने घेण्यात येणा-या प्रत्येक कामा संदर्भात त्याचा विमा शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केलेली नाही.

1.सन 2013-14 या वर्षाकरीता (AMC) अंतर्गत झोन क्र.2 मध्ये काम करणेस्तव मे.श्रध्दा इलेक्ट्रीक इंजी. यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निवीदेस स्थाई सर्मीती ठराव क्र .69 दि 11.7.13 अन्वये मंजुरी प्रदान आहे . त्याअनुषंगांना मे श्रध्दा इलेक्ट्रीक इंजी . यांना दि 8.8.13 अन्वये कार्यारंभ आदेश निर्गमीत करण्यात आले . गुत्तेदारासोबत करारनामा करत असताना रु .50.00 लक्ष इतक्या रककमेचे काम ग्रहीत धरून (निवीदा रककम) करारनामा करण्यात आला. तथापी संचीकेचे अवलोकन केल्यानंतर दिसुन येते की सदर कामाचा खर्च रु1.24 कोटी पर्यंत झालेला आहे. याचाच अर्थ विभागाकडून कामाचे निवीदा रककम काढण्यात चुक झाली आहे . प्रस्तावीत कामाचे गुत्तेदारामार्फत रु .2797748/- दि 30.09.2013 अन्वये प्रथम धावते देयक व रु . 9651347/- रककमेचे दुसरे व अंतीम देयक सादर करण्यात आले आहे . प्रथम देयकाचे प्रदान 3 टप्यात झालेले दिसुन येते व अंतीम देयकाचे प्रदान अद्याप पुर्ण:त झालेले दिसुन येत नाही.

2.देखभाल दुरूस्ती करीता दरकरार करताना जिल्हा दरसुचीचा वापर केलेला असताना खर्चाची रक्कमेत मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसुन येते म्हणजेच दरकरार करताना कामाची व्यापकता लक्षात न घेता ढोबळ मानाने निविदा तयार केलेली आहे

3.महाराष्ट्र शासन (नगर विकास विभाग) यांच पत्र जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98 नवि दि.03.11.03 अन्वये या प्रत्येक कामाकरीता त्याचाविमा शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविणे आवश्यक असताना महानगरपालीकेने अशी कार्यवाही केलेली नाही . सदर बाबीकडे दुर्लक्ष झाल्याने कंत्राटदारास मनपाने प्रदान केलेलया रकमेमधुन 1% दराने विमा निधी वसुल करणे क्रमप्राप्त ठरते . तरी 1% दराने रु 124626/- वसुल करुन विभागाने अनुपालन सादर करावे.

4.याबाबत अर्धसमास पत्र क्रं. 49 दि. 08.02.2017 अन्वये अनुपालनाकामी देउनही अनुपालन प्रा प्त न झाल्याने अभिप्राय अंतीम करण्यात आले.

आक्षेपाधीन रक्कम - 2797748 /-

वसुलपात्र रक्कम - 124626 /-

DATRMSM6902 (Ref No : 8, Hmm No : 49)

20 झोन बीआरजीएफ योजने अंतर्गत झोन क्र.२ मध्ये नंदीग्राम सोसायटी भागात सीमेंट रोड व सीमेंट नाली बांधकाम करणे बाबत. (सन 2013-14 पहीला टप्पा)

मागास क्षेत्र अनुदान निधी

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1499549.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1499549.00/-

विभागाने काम करतांना पक्के मुरुम व ग्रॅनुलर सब बेस ही कामे अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा फार कमी प्रमाणात केलेली असल्याने कामाचा योग्य तो दर्जा राखल्या गेला नाही.TPTA अहवालानुसार नालीचे ड्रेन (मोरी) हे रस्त्याच्या वर झालेले आहे जे विसंगत आहे.

लेखा शीर्ष : भूसंपादन विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 16220.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 16220.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 16220.00/-

वजीराबाद, नांदेड येथील सर्व्हे नंबर 72/बी या भूमापन क्रमांकापैकी 28 गुंठे इतके क्षेत्र ड्रेनेज स्कीम सेवर लाईन-ए या प्रयोजनासाठी संपादीत संघ- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य विभाग, नांदेड यांचेकरीता उपजिल्हाधिकारी, नांदेड यांनी केलेल्या भूसंपादनास LAR क्रमांक 7/1974 अन्वये न्यायालयामध्ये अपील दाखल करण्यात आले होते. सदरील प्रकरणात दिनांक 25.04.1980 रोजीचे न्यायनिर्णयानुसारची रक्कम न्यायालयात जमा करण्यात आलेली नसलेने नियमीत दरखास्त क्र.124/2001 व्दारे रक्कम वसुलीसाठी जप्ती वॉरंटची रक्कम रुपये 16,220/- महानगरपालिकेने ते सदरील भूसंपानदाचे संपादीत संघ नसतांना अदा केलेली आहे.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण भूसंपादन विभागाचे उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असून त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंद विण्यात येत आहेत.

1. नांदेड, वजीराबाद येथील सर्व्हे नंबर72/बी या भूमापन क्रमांकापैकी 28 गुंठे इतके क्षेत्र ड्रेनेज स्कीम सेवर लाईन -ए या प्रयोजनासाठी संपादीत संघ कार्यकारी अभियंता ,सार्वजनिक आरोग्य विभाग , नांदेडयांचे करीता भूसंपादन अधिनियम 1894 मधील कलम 4अन्वये दि .18.08.1966 च्या अधि सुचनेव्दारे संपादीत करण्यात आलेले आहे .सदरच्या निवाडयानुसार मिळणा -या मोबदल्याशी जमीन

मालक सहमत नस ल्याने भूसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक7/1974 न्यायालयामध्ये दाखल करण्यात आला होता . सदरील प्रकरणाचा निकाल 25.04.1980 रोजी झालेला असून न्याय निर्णया प्रमाणे भूसंपादनाची रक्कम न मिळाल्याने सदरची रक्कम वसुल होण्यासाठी नियमीत दरखास्त क्रमांक 124/2001 दाखल करण्यात आली होती . दरखास्ती मधील धनकोच्या मागणीप्रमाणे संपादीत रक्कम आणि त्यावरील व्याजाची रक्कम रुपये 16,220/- वसुल होण्यासाठी सहा . जिल्हाधिकारी, सहा. अप्पर जिल्हाधिकारी आणि भूसंपादन अधिकारी नांदेड यांचे विरुध्द दिवाणी अ 564 नुसार पैशासंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी होण्यासाठी वॉरंट बजावण्यात आले होते . उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक 1974/भूसं/सीआर-07/1909 दि 05.07.2011 अन्वये सदरची रक्कम दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर , नांदेड येथे भरणा करावी या आशयाचे पत्र मनपा आयुक्तांना पाठविल्याने सदरचे पत्र प्राप्त झाल्या नंतर दि .05.10.2013 रोजी रक्कम रुपये 16,220/- चा न्यायालयामध्ये भरणा करण्यात आलेला आहे.

2. सदरच्या प्रकरणामध्ये संपादीत संघ कार्यकारी अभियंता ,सार्वजनिक आरोग्य विभाग,नांदेड हेआहेत. महानगरपालिकेने सदरील नियमीत दरखास्त क्रमांक 124/2001मधीलरक्कम रुपये 16,220/- महा नगरपालिका संपादीत संघ नसतांना भरणा केलेली आहे .वजीराबाद येथील सर्व्हे नंबर 72/बी या भू मापन क्रमांकापैकी 28गुंठे इतके क्षेत्राचे मालक या सदरी मनपाचे नाव असल्याचा कोणताही दस्त लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाला नाही.

3. तत्कालीन नांदेड नगर पालिकेने वजीराबाद येथील सर्व्हे नंबर 72/बी या भूमापन क्रमांका पैकी 28 गुंठे इतके क्षेत्र ड्रेनेज स्कीम सेवरलाईन-ए या प्रयोजनासाठी संपादीत करण्यासाठी कार्यकारी अभियंता , सार्वजनिक आरोग्य विभाग,नांदेड यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे दर्शविणारे पुरावे, नगरपालिका ठरावाची प्रत व संपादित संघ म्हणून नियुक्तीचे आदेश, मालमत्तापत्रक किंवा सदरील सर्व्हे नंबर हा मनपा मालकीचा असल्याचे इतर अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाले नसल्याने सदरचे भूसंपादन हे मनपासाठी झाल्याचे अनुपालन दर्शवावे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्रमांक 174 दिनांक 08/11/2017 अन्वये मागणी करुन पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

HCDSHDM7901 (Ref No : 112, Hmm No : 174)

62 सन 2013-2014 महिला व बाल कल्याण विभाग खर्चाची संचिका/अभिलेखे/ प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : महिला व बाल कल्याण मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1941407.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1941407.00/-

सन 2013-2014 महिला व बालकल्याण विभाग खर्चाची मुलींना सायकल वाटप / रोग निदान शिबीर /महिला व्यावसायिक प्रशिक्षण/ बाल महोत्सव कार्यक्रम/ शालेय विदयार्थी गणवेष साहित्य खरेदी इत्यादीची संचिका/अभिलेखे/प्रमांणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक सन 2013-2014 आर्थिक वर्षाचे महिला व बाल कल्याण विभागाचे लेखा शाखेकडील खर्च प्रमाणंक नोंदवही तपासणी केली असता खालील प्रमाणे खर्च झाल्याचे दिसुन आलेला आहे.

अ. क्र.	तपशील	पुरवठादाराचे नांव	खर्च प्रमाणंके क्र.दिनांक	रक्कम रुपये
1	मुलींना सायकल वाटप करणे	व्ही.जी.ट्रेडिंग कंपनी	7281/24.02.14	357000
2	मुलींना सायकल वाटप करणे	व्ही.जी.ट्रेडिंग कंपनी	7997/20.03.14	4300
3	रोग निदान शिबीर	-	1253/04.06.13	300000
4	रोग निदान शिबीर	-	2443/03.08.13	52107
5	महिला व्यावसायिक प्रशिक्षण	-	2479/06.08.13	600000
6	बाल महोत्सव कार्यक्रम	-	5127/05.11.13	200000
7	बालशिबीर विषयक मेळावा	-	5127/05.11.13	100000
8	शालेय विदयार्थी गणवेष साहित्य	-	1282/05.06.13	328000
			एकुण रक्कम रुपये	**1941407**

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.वरील नमुद खर्चाची संचिका/अभिलेखे/प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिलेमुळे योजनाचा उद्देश सफल झाला? व विहीत पक्रिया पुर्ण करुन खर्च केला? याबाबत खात्री करता आलेली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .191 दि.16/11/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 135, Hmm No : 191)

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

63 आश्वासीत प्रगती योजना लाभा अंतर्गत वेतन निश्चीती सुधारीत करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष : मनपा मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

आपल्या आस्थापनेवरील नमूद खालील कर्मचारी याना 24 वर्षाची अहर्ताकारी सेवा पूर्ण झाली असल्यामुळे आश्वासीत प्रगती योजना लाभ ऑगस्ट 2012 पासून फरकासाह अदा करण्यात आला आहे.

आपल्या आस्थापनेवरील नमूद खालील कर्मचारी याना 24 वर्षाची अहर्ताकारी सेवा पूर्ण झाली असल्यमुळे आश्वासीत प्रगती योजना लाभ ऑगस्ट 2012 पासून फरकासाह अदा करण्यात आला आहे.

1.श्री देवराव भीमाजी डुकरे , माळी

दिनांक	अदा केलेली निश्चीती	ग्रेड पे
10.05.2007	7040+260= 7300	1500 का ने. वाढ
01.07.2007	7300+270=7570	1800 नियमीत वे. वाढ

2. सुरेश प्रकाश मालेकर, माळी

दिनांक	अदा केलेली निश्चीती	ग्रेड पे
16.05.2007	6910+260=7170	1500 का ने. वाढ
01.7.2007	7170+260=7430	1800 नियमीत वे वाढ

3. श्रीमती नसरीन बानो अहमद अली, स्त्री मजूर

दिनांक	अदा केलेली निश्चीती	ग्रेड पे
02.06.2007	7340+280=7620	1900
01.07.2007	7620+290=7910	2100 नियमीत वे वाढ

उपरोकत कर्मचारी यांना पदोन्नतीच्या वेळीच काल्पनीक वेतन वाढ देऊ वेतन निश्चीती केलेली आहे.व लागलीच दि.01 जुलै 2009 रोजी नियमीत वेतन वाढ दिलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 अनुसार अदा वेतन निश्चीती 02 जानेवारी ते 30 जुन या दरम्यान झालेली

असल्याने पूढील वेतन वाढ पूढील वर्षाच्या 1 जूलै रोजी मीळाली मात्र आपल्या आस्थापनेकडून त्याच वर्षाच्या 1 जूलै रोजी नियमीत वेतन वाढ मंजूर केलेली आहे.

तरी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) 1981 व शासन निर्णय दि 31.08.2009 अनुसार पुनश्च सुधारीत वेतन निश्चीती करुन जादा प्रदान रककमेची परीगणना करुन रक्कम संबंधीता कडून वसुल करुन योग्य निधीत जमा करणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रं.36 दि.27.01.2017 अन्वये देऊनही अनुपालन प्राप्त नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 26, Hmm No : 36)

64 मुंबई वित्तीय नियमावली नियम 1959 क 42 नुसार वेतन अतिप्रदान वसुली करुन लेख्यात जमा करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : अभियंता आस्था-5 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

अंतिम अमान्य रक्कम रु. 427861.00/-

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 नियम 11(1) नुसार जी वेतन निश्चीती केलेली आहे. ती चूकीची असल्याचे लेखापरीक्षणात आढळले आहे. महानगरपालिका कार्यालयाकडून करण्यात आलेल्या वेतननिश्चीतीमध्ये तफावत आढळून आली आहे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 अनुसार (पूढील वेतन वाढीच्या दिनांकाच्या विकल्प रिक्त) असल्यास ग्रहीत धरून करण्यात आली आहे. सबंधीत कर्मचारी सदर कालावधीत देय वेतन प्रत्यक्ष रु.1897341 असतांना रु.2325202 प्रदान केल्यामुळे अतीरीक्त प्रदान रु 427861 रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य निधीस जमा केल्याचे अनूपालन दर्शवावे.

आपल्या आस्थापनेवरील बांधकाम विभागातील कर्मचारी श्री.सुनील भास्करराव देशमुख हे महापालीका सेवेत कनीष्ठ अभीयंता या पदावर दि.01.01.2005 रोजी रुजु झाले. त्यांना आदेश क्र.आस्था-5/9139/73 दि.12.03.2013 अन्वये उपअभीयंता वेतन श्रेणी 9300-34800 (5400) या वरीष्ठ पदावर पदोन्नती देण्यात आली मात्र त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 नियम 11(1) नुसार जी वेतन निश्चीती केलेली आहे. ती चूकीची असल्याचे लेखापरीक्षणात आढळले आहे. आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या वेतननिश्चीती तफावत सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रं.1 नुसार

सदर वेतन निश्चीती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 अनुसार (पूढील वेतन वाढीच्या दिनांकाच्या विकल्प रिक्त) असल्यास ग्रहीत धरून करण्यात आली आहे. सबंधीत कर्मचारी सदर कालावधीत देय वेतन प्रत्यक्ष रु.1897341 असतांना रु.2325202 प्रदान केल्यामुळे अतीरीक्त प्रदान रु 427861 रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य निधीस जमा केल्याचे अनूपालन दर्शवावे. याबाबत अर्धसमासपत्र क्र.53 दि.22.02.2017 अन्वये कळवूनही अनुपालन प्राप्त नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 29, Hmm No : 53)

65 कर्मचा-यांच्या वेतनावर नियमबाहयरित्या रक्कम खर्च करणे बाबत

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :JNRUM शासकिय निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 11774047.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11774047.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 11774047.00/-

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम योजनेसाठी मंजुर प्रकल्प कामाच्या किंमती प्रमाणे शासनाने उपलब्ध करुन दिलेले अनुदान हे नियमबाहयरित्या माहे सप्टेंबर 2013 कर्मचा-यांच्या वेतनासाठी खाते क्रमांक 318010200000213 मध्ये रुपये 11774047/- दि.25.10.2013 रक्कम वर्ग करुन नियमबाहयरित्या खर्च केले बाबत.

1. सन 2013-2014 मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम योजनेची रोख नोंदवही व प्रमाणके तपासणी केली असता रक्कमा जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम योजनेसाठी शासनाकडून (केंद्र व राज्य) अनुज्ञेय असलेले अनुदान हे मंजूर प्रकल्प कामनिहाय प्राप्त झालेले असतांना ज्या उदिदष्टासाठी प्राप्त झाले ते खर्च न करता रक्कम माहे सप्टेंबर2013 मध्ये कर्मचा-याच्या वेतना साठी नियमबाहयरित्या रुपये11774047/- दिनांक 25/10/2013 खाते क्रमांक 318010200000213 मध्ये वर्ग करुन खर्च करण्यात आला आहे याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

वरील रक्कम वेतन व भत्यापोटी खर्च करणेबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी आदेश लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही. सदर खर्च करण्यास कोणते निकष,प्राधिकार वापरण्यात आले या बाबत

खात्री करता आली नाही तसेच निधी वर्ग करण्याचे प्रयोजन विषद न केल्यामुळे नियम बाहयपणे रक्कमा वर्ग करण्यात आल्याचे दिसून आले आहे.

2.जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम योजनेची मार्गदर्शक तत्वे फेब्रुवारी2011 मधील तरतुदीनुसार अनुदानाच्या प्राप्त रक्कमा या शासनाने ज्या प्रयोजनासाठी (प्रकल्प/ कामे) मंजूर केले आहे त्याच प्रयोजनासाठी महानगरपालिकेने वापरावयाचे असल्याचे स्पष्ट निर्देश असतांना महानगरपालिकेने नियमबाहय वेतनावर खर्च करुन अनियमीतता केली आहे.

3.माहे मार्च 2014 अखेर रक्कम मूळ प्रकल्प कामाच्या बॅक खाती जमा झालेली नाही यामुळे मुळ प्रकल्प कामाच्या प्राप्त रक्कम लेख्याबाहेर राहण्याची अनियमीतता झाली आहे.

4. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/10.02/प्र.क्र 128/अर्थोपाय, दिनांक 06 जून, 2008 नुसार अखर्चित रक्कमा(मंजूर आर्थिक वर्ष व त्यापुढील) आर्थिक वर्ष समर्पित करणे आवश्यक असेल असे स्पष्ट निर्देश असतांना सन 2013-2014 अखेर रुपये 12957502/- रक्कम रोखपुस्तिकेत अखर्चित दिसून आली ती शासनखाती भरणा केली नाही.

5.महानगर पालिकेने सदर योजने अंतर्गत शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी ज्या प्रयोजनार्थ, ज्या प्रकल्प कामासाठी उपलब्ध करुन दिला होता त्या प्रकल्प कामी वापरात न आणता तो इतर निधी नियम बाहय वेतनावर खर्च केल्यामुळे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम या योजनेचा मुळ हेतू साध्य झाला नाही. सदर योजना दिनांक 31/03/2012 रोजी संपुष्टात आलेली आहे तरी वेतना पोटी खर्च झालेली रक्कम रुपये11774047/- व अखर्चित रक्कम रुपये12957502/- अशी एकत्रित रक्कम रुपये 24731549/- शासनखाती भरणा केलेली नाही अर्धसमास पत्र क्रमांक116 दिनांक 13/09/2017 अन्वये खुलासा मागणी करुनही अनुपालन सादर केलेले नाही. तरी रक्कम भरणा करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार परिच्छेद कायम करण्यात येत आहे अनुपालन सादर करावे.

FDAVANM6101 (Ref No : 65, Hmm No : 116)

66 अग्रीम समायोजित न करणे बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 19758662

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 19758662.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 19758662.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 19758662.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 19758662.00/-

सन 2013-14 वर्षात प्रदान केलेल्या अग्रीम रकमेचे समायोजन विहित कालावधीत न करणे, तसेच पुर्वीचा अग्रीम बाकी असतांना नवीन अग्रीम देणे बाबत व रक्कम रु.1174739 व मागील वर्षाच्या अग्रीमाची प्रलबित रक्कम रुपये 18583923 अशी एकुण रक्कम रुपये 19758662 लेख्याबाहेर ठेवल्याची गंभीर अनियमितता करणे बाबत.

सन 2013-14 वर्षाची अग्रीम रक्कम नोंदवही तपासली असता खालील कर्मचारी/अधिकारी यांना मोठया प्रमाणावर रु.19758662 अग्रीम देण्यात आलेला असून सदरील रक्कम हि अदयाप पर्यंत समायोजीत झालेली नसल्यामुळे लेख्याबाहेर ठेवण्यात आली असल्याचे आढळून आले आहे. तसेच अग्रीम नोंदवहीतील प्रत्येक नोंदीवर अंतर्गत लेखापरिक्षक प्रमुखांच्या स्वाक्ष-या नसून प्रमाणीत केलेली नाही. नोंदवहीत महिना अखेर अथवा वर्षाअखेर शिल्लक अग्रीम रकमेचा गोषवारा काढण्यात आलेला नाही.त्यामुळे वर्षाच्या अखेरीस किती रक्कम समायोजीत करावयाची बाकी आहे याची खात्री करता आली नाही. तसेच यापुर्वीचा प्रलबित अग्रीम सन 2012-13 रुपये 18583923 दर्शविलेली नाही. अग्रीम वाटपाचा तपशील खालीप्रमाणे आहे.

अं.क्र.	अधिकारी/कर्मचा-यांचे नांव	टोकन क्रमांक	दिनांक.	अग्रीम रक्कम
1	श्री.विलास भोसीकर अलेप.	416	23/4/2013	150000
2	श्री.एस एन झाकडे विधी सहाय्यक	514	29/04/2013	15000
3	श्री.एस व्ही राहेगांवकर कायदे सल्ला.	658	07/05/2013	13000
4	श्री.रमेश चवरे स्टेडियम व्यवस्थापक	696	08/05/2013	287282
5	सुशील पाटील क.अ.	978	21/05/2013	50000
6	आर.एम गायकवाड फायरमन	1428	12/06/2013	21120
7	सुधीरसिंह तेहरा क.अ.	1444	13/06/2013	45000
8	प्रकाश येवले क्षेत्रीय अधिकारी	00	00	76200
9	शेख रहिस पाशा अग्नीशमन अधि.	924	17/05/2013	25000
10	गूलाम मोहमंद सादीक क्षे.अ.	00	00	76200
11	एस.डी जाधव क.अ.	1856	03/07/2013	7200

12	मिर्झाबेग उदयान अधि.	2312	25/07/2013	120000
13	सोनसळे उप अभियंता	00	00	5000
14	संतोष ढवळे उप अभियंता	3469	10/09/2013	16300
15	संतोष ढवळे उप अभियंता	3954	03/10/2013	28950
16	नागनाथ पतंगे उप अभियंता	4806	08/11/2013	50000
17	श्री.रमेश चवरे स्टेडियम व्यवस्थापक	5116	20/11/2013	50000
18	मो.गुलाम सादेक स.आयु.	5344	30/11/2013	15000
19	संतोष ढवळे उप अभियंता	6332	16/01/2014	41487
20	मो.युनूस गफार	6500	24/01/2014	2000
21	श्री.रमेश चवरे स्टेडियम व्यवस्थापक	7562	06/03/2014	80000
			एकुण रक्कम रुपये (अ)	1174739
			(ब) सन 2012-13 च्या अहवालानुसार प्रलबित अग्रीम	18583923
			एकुण अ + ब	19758662

1.महानगरपालीका लेख्सहिता 1971 नियम 189 व नियम 190(1) अन्वये नमुना नं.147 या विहीत नोदवहीत मंजूर करण्यात आलेल्या व समायोजीत करण्यात आलेल्या अग्रीम रकमांची नोंदवही व लेखे ठेवणे बंधनकारक आहे.

2.मुंबई वित्तीय नियम 1959 व नगरपालीका लेखा सहिता 1971 मधील तरतूदीनुसार अग्रीम मंजूर दिनांकापासून 6 महीन्याचे आंत अग्रीम रकमांचे समायोजन होणे बंधनकारक असतांना सन.2013-14 मध्ये खालील प्रमाणे एकूण 21 अधीकारी/कर्मचारी यांचे लेखापरिक्षा दरम्यान समायोजीत झाल्याचे आढळून आले नाही. अग्रीम समायोजन न झाल्यामुळे सदरील रकमेची अफरातफर व अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संब धि त कर्मचारी यांना अग्रीम वसुली बाबत प्रत्येक वर्षाच्या जुन अखेर कळविणे गरजेचे असताना संबधित कळविण्यात आलेले नाही.

3. मुंबई वित्तीय नियम 1959 मधील तरतूदीनूसार पूर्वीच्या अग्रीम रकमांचे समायोजन झाल्याशीवाय नवीन अग्रीम मंजूर करता येत नाही. तथापी वरील अं.क्र.17 श्री.चवरे यांना रु.50000 व श्री.एस.एन.ढवळे यांना रु.41487 अग्रीम मंजूर करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे कर्मचारी/अधिकारी यांना सन 2013-14 वर्षात रु.1174739 अग्रीम देण्यात आलेला असून सदरील रकमेचे समायोजन विहित कालावधीत न झाल्यामुळे व रक्कम रु.1174739+ (ब) सन

2012-13 च्या अहवालानुसार प्रलबित अग्रीम रक्कम रुपये 18583923 अशी एकुण 19758662 लेख्याबाहेर राहील्यामुळे महानगरपालीकेचे आर्थीक नुकसान झाल्याची गंभीर अनियमितता झालेली आहे. सदरील रक्कम ही संबंधीत् अधीकारी/कर्मचारी यांचेकडून व्याजासहीत वसूल करुन मनपा निधीत जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच काही अधिकारी/कर्मचारी यांचेकडे पुर्वीचाच अग्रीम शिल्लक असतासंना पून्हा त्यांना अग्रीम देण्यात आला आहे. या बाबत अनुपालन करुन सादर झालेले नाही. सन 2013-14 अर्धसमास पत्र क्रमांक 141 दिनांक 06/10/2017 अन्वये अर्धसमास पत्र देवूनही अग्रीम रक्कमाचे समायोजन झालेले दिसून आले नाही म्हणून परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 79, Hmm No : 141)

67 वॉकी टॉकी व व वायरलेसबेस स्टेशन्ं देखभाल व दुरुस्ती मधील अनियमितता

आपत्ती व्यवस्थापन विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 57000.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 1140.00/-

आयकराची रक्कम रु.1140/- संबधीताकडून वसूल करण्यात आलेली नाही.

महानगर पालिका नांदेडचे सन 2013-14 चे लेखापरिक्षणात आपत्ती व्यवस्थापन विभागातील वायरलेस व बेस स्टेशन चालु करण्याकरीता लागणा-या साहीत्याच्या खरेदीचे नस्तींची तपासणी केली असता वायरलेस व बेस स्टेशन चालु करण्याकरीता लागणा-या साहीत्य रु .57000 -/ची खरेदी मे .Portal Infosys यांचे कडुन कमी दर असल्यामुळे खरेदी करण्यात आलेली आहे.

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) सदर देयकातून संबंधिताकडुन2 % आयकर रु.1140 -/कपात करुन उर्वरीत रककम रु.55860 -/चे देयक देयक क्र.1476 दि03 .07. 2014अन्वये मंजुर करण्यात आले .परंतू प्रत्यक्षात धनादेश क्र . 248818 दि8 .7. 2014अन्वये रु .57000 -/प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे कपात न केलेली आयकर रक्कम रु.1140 -/ची वसुली संबंधीताकडुन करण्यात करुन योग्यं शिर्षात जमा होणे आवयश्यंक आहे.

DATRWPM6401 (Ref No : 86, Hmm No : 94)

68 अग्निशमन सेवा फी चे नुतणीकरण करतांना कमी दराने आकारणी करणे बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3000.00/-

01. ना हरकत प्रमाणपत्राची वर्गणी वाढीव दराने करण्यात आलेली नाही.

महानगरपालिका नांदेडचे सन 2013-14 चे लेखापरिक्षणात अग्नीशमन विभागातील ना हरकत-प्रमाणपत्रनुतणीकरण नस्तीची केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.

सन2013 - 14मधील नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र)तात्पुरते प्रमाणपत्र (फी चे दर आदेश क्र.जा.क्र/.नांवाशमनपा/अअसे/130/2013 दि10 .06. 2013स्थायी सभा दि 30.04. 2013ठराव क्र.48 अन्वये सन2013 - 14यावर्षाकरीता अग्निशमन सेवेची फीस मध्ये वाढ करण्यात आली .सदर आदेशाची अंमलबजावणी दि01 .04. 2013पासुन करणे आवश्यक होते .

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) खालील आस्थापनांचे अग्निशमन सेवेचे नाहारकत प्रमाणपत्र) तात्पुरते फीची रक्कम (कमी दराने आकारणी करण्यात आलेली आहे .

अ.क्र.	आस्थापनेचे नांव	पावती क्र.	पावतीचा दि.	नाहारकत प्रमाणपत्र फि ची वसुल केलेली रककम	नाहारकत प्रमाणपत्र फि ची वसुल करावयाची रककम	तफावतीची रक्कम
1	मातोश्री हॉस्पीटल	7674/1	4.4.2013	रु.1000-/	रु.1500-/	रु.500-/
2	व्यवस्थापक भारतीय बँकर	7674/5	12.04.2013	रु.1000-/	रु.1500-/	रु.500-/
3	मातृसेवा हॉस्पीटल	7674/8	17.4.13	रु.1000-/	रु.1500-/	रु.500-/
4	बोले हॉस्पीटल	7674/1	29.4.13	रु.1000-/	रु.1500-/	रु.500-/
5	व्यंकटेश हॉस्पीटल	7674/14	2.5.13	रु.1000-/	रु.1500-/	रु.500-/
6	यश एंटरप्रायजेस	7674/49	7.6.13	रु.3000-/	रु.3500-/	रु.500-/
एकुण रु.						रु.3000-/

कमी दराने आकारणी करण्यात आलेली रक्कम रु.3000 -/ची वसुली करण्यात यावी व सदरचे अनुपालन सादर करण्यात यावे.

DATRWPM6401 (Ref No : 90, Hmm No : 97)

69 अग्नीशमन सेवा ना-हरकत प्रमाणपत्र नुतणीकरण फी कमी दराने आकारणी करणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 14000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 14000.00/-

01.ना हरकत प्रमाणपत्राची वर्गणी वाढीव दराने करण्यात आलेली नाही.

सन2013 - 14मधील नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र)तात्पुरते प्रमाणपत्र (फी चे दर आदेश क्र.जा.क्र/.नांवाशमनपा/अअसे/130/2013 दि10 .06. 2013स्थायी सभा दि 30.04. 2013ठराव क्र.48 अन्वये सन2013 - 14यावर्षाकरीता अग्निशमन सेवेतील ना हरकत प्रमाणपत्र नुतणीकरण फीस मध्ये वाढ करण्यात आली .सदर आदेशाची अंमलबजावणी दि01 .04. 2013पासुन करणे आवश्यक होते .

खालिल आस्थापनांचे अग्निशमन सेवेचे नाहरकत प्रमाणपत्र) तात्पुरते फीची रक्कम (कमी दराने आकारणी करण्यात आलेली आहे .

अ.क्र.	आस्थापनेचे नांव	पावती क्र.	पावतीचा दि.	नाहारकत प्रमाणपत्र फि ची वसुल केलेली रककम	नाहारकत प्रमाणपत्र फि ची वसुल करावयाची रककम	तफावतीची रक्कम
1	गोदावरी हॉस्पीटल	7674/4	8.4.2013	रु2000./-	रु2500./-	रु.500-/
2	अलहयात मॅटरनिर्टी हॉल	7674/7	15.04.2013	रु500./-	रु1000./-	रु.500-/
3	प्रिती नर्सींग हॉल	7674/9	18.4.13	रु500./-	रु.1000/-	रु.500-/
4	देव पॅथॉलॉजी	7674/10	26.4.13	रु500./-	रु.1000/-	रु.500-/

5	डावळे हॉस्पीटल	7674/12	30.4.13	रु500./-	रु.1000/-	रु.500-/
6	रुबी हॉस्पीटल	7674/13	02.5.13	रु500./-	रु1000./-	रु.500-/
7	माहेर हॉस्पीटल	7674/16	03.5.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
8	ममता हॉस्पीटल	7674/18	04.5.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
9	कंधारे हॉस्पीटल	7674/19	-//-	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
10	नांदेड अक्सीडेंट	7674/21	06.5.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
11	यशोदा हॉस्पीटल	7674/23	13.05.13	रु.2000/-	रु2500./-	रु.500-/
12	आधार हॉस्पीटल	7674/24	13.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
13	रजीया मेन्नो हॉस्पीटल	7674/25	13.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
14	अमृतपथ बाल रुग्णालय	7674/28	14.05.13	रु.2000-/	रु.2500-/	रु.500-/
15	निहा आय हॉस्पीटल	7674/29	14.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
16	महाले हॉस्पीटल	7674/30	16.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
17	संजिवनी हॉस्पीटल	7674/31	17.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
18	पाटील हॉस्पीटल	7674/32	18.05.13	रु.2000-/	रु.2500-/	रु.500-/
19	अश्वीनी हॉस्पीटल	7674/34	23.05.13	रु.2000-/	रु.2500-/	रु.500-/
20	पदमावती मॅटरनिटी	7674/35	23.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
21	सलतनत हॉस्पीटल	7674/36	24.05.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
22	पुजा वुमेन्स	7674/41	03.6.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
23	बालाजी बालरुग्णालय	7674/42	6.6.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
24	श्रुती हॉस्पीटल	7674/44	06.6.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
25	काबरा हॉस्पीटल	7674/45	6.6.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/
26	श्रिनिवास ऑथोपेडीक	7674/46	07.06.2013	रु.500-/	रु.100-/	रु.500-/
27	माला हॉस्पीटल	7674/50	7.6.13	रु.500-/	रु.1000-/	रु.500-/

28	सिददीविनायक हॉस्पीटल	7674/51	07.6.13	रु500./-	रु1000./-	रु.500-/
एकुण						रु14000 /-

कमी दराने आकारणी करण्यात आलेली रक्कम रु14000./- ची वसुली करण्यात यावी व सदरचे अनुपालन सादर करण्यात यावे.

DATRWPM6401 (Ref No : 91, Hmm No : 100)

70 अग्नीशमन सेवेची (स्टॅड बाय डयुटी) ची वसूली कमी दराने केल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 1660.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 1660.00/-

01. अग्नीशमन सेवेची (स्टॅड बाय डयुटी) वाढीव दराने करण्यात आलेली नाही.

सन2013 - 14मधील नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या अग्निशमन नाहारकत प्रमाणपत्र)तात्पुरते प्रमाणपत्र (फी चे दर आदेश क्र.जा.क्र/.नांवाशमनपा/अअसे/130/2013 दि10 .06. 2013स्थायी सभा दि 30.04. 2013ठराव क्र.48 अन्वये सन2013 - 14यावर्षाकरीता अग्निशमन सेवेतील स्टॅण्ड बाय डयुटी फीस मध्ये वाढ करण्यात आली .सदर आदेशाची अंमलबजावणी दि01 .04. 2013पासुन करणे आवश्यक होते .

खालिल आस्थापनांचे अग्निशमन सेवेचे नाहारकत प्रमाणपत्र) तात्पुरते फीची रक्कम (कमी दराने आकारणी करण्यात आलेली आहे .

अ.क्र.	आस्थापनेचे नांव	पावती क्र.	पावतीचा दि.	स्टॅण्ड बाय डयुटी फि ची वसुल केलेली रककम	स्टॅण्ड बाय डयुटी ची वसुल करावयाची रककम	तफावतीची रक्कम
1	कार्यकारी संचालक भाऊराव चव्हाण साखर कारखाना	7674/17	23.5.2013	रु.2340/-	रु3000./-	रु660./-
2	अध्यक्ष बागबान पंच कमीटी	7674/20	04.05.2013	रु2000./-	रु3000./-	रु1000./-

एकुण	रु1660 /-

कमी दराने आकारणी करण्यात आलेली रक्कम रु -/1660 .ची वसुली करण्यात यावी व सदरचे अनुपालन सादर करण्यात यावे.

DATRWPM6401 (Ref No : 92, Hmm No : 107)

71 अग्निशमन विभागातील आगीचे प्रमाणपत्र फी चे (हददीत / हददीच्या बाहेर) कमी दराने आकारणी करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 4450.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4450.00/-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र (तात्पुरते प्रमाणपत्र) फी चे दर आदेश क्र.जा.क्र./नांवाशमनपा/अअसे/130/2013 दि 10.06.2013 स्थायी सभा दि 30.04.2013 ठराव क्र.48 अन्वये सन 2013-14 यावर्षाकरीता अग्निशमन सेवेतील आगीचे प्रमाणपत्र फी चे (हददीत/ हददीच्या बाहेर) फीस मध्ये वाढ करण्यात आलेली आहे. तसेच सदरचे आदेशाची अंमलबजावणी दिनांक 01.04.2013 पासून करणे आवश्यक होते. अग्नीशमन सेवेची (हददीत/ हददीच्या बाहेर) वाढीव दराने करण्यात आलेली नाही.

सन 2013-14 मधील नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र (तात्पुरते प्रमाणपत्र) फी चे दर आदेश क्र.जा.क्र./नांवाशमनपा/अअसे/130/2013 दि 10.06.2013 स्थायी सभा दि 30.04.2013 ठराव क्र.48 अन्वये सन 2013-14 यावर्षाकरीता अग्निशमन सेवेतील आगीचे प्रमाणपत्र फी चे (हददीत / हददीच्या बाहेर) फीस मध्ये वाढ करण्यात आली. सदर आदेशाची अंमल बजावणी दि 01.04.2013 पासुन करणे आवश्यक होते.

खालिल आस्थापनांचे अग्निशमन सेवेचे नाहारकत प्रमाणपत्र (तात्पुरते फीची रक्कम) कमी दराने आकारणी करण्यात आलेली आहे.

अ) श्री नंदा ट्रेडर्स, युनायटेड इंडस्ट्रीज एमआयडीसी, नांदेड या बारदान्याच्या कारखान्यास दिनांक 23.03.2013 आग लागली असता आग विझविण्याकरीता अग्निशमन वाहन क्र.MH-26-H-6828 व MH -26-A-7363 पुरविण्यात आले. आगीचे स्थळ अग्निशमन सेवा केंद्रापासुन 36 किलोमीटर असुन त्या करीता प्रती किलोमीटर रु.10/- प्रमाणे (36+36=72) प्रमाणे रु 720/- आकारणी करण्यात आलेले

आहे. ठराव क्र. 48 दि 30.03.13 अनुसार 72 किलोमीटर करीता रु. 20/- प्रती की.मी. प्रमाणे रु.1440/- वसुल करावयास पाहीजे होते कमी वसुल करण्यात आलेले रक्कम रु.720/- ची वसुली करण्यात यावी.

ब) श्री. रघुनाथ भास्कर लोंढे, उपसरपंच रा लोंढेसांगवी यांना अग्नीशमन वाहन क्र. MH-26-A-7763 अन्वये आग लागली असता पुरविण्यात आले आगीचे स्थळ अग्निशमन सेवा केंद्रापासुन 63 कि.मी. अंतर असुन प्रती किलोमीटर रु.10/- प्रमाणे (63) प्रमाणे रु 630/- आकारणी करण्यात आलेले आहे. ठराव क्र. 48 दि 30.03.13 अनुसार 63 किलोमीटर करीता रु. 1260/- प्रती की.मी. प्रमाणे वसुल करावयास पाहीजे होते कमी वसुल करण्यात आलेले रक्कम रु. 630/- ची वसुली करण्यात यावी.

क). श्री भगवान कुंडलीक रा खडकुत यांना अग्नीशमन वाहन क्र. MH 26 A 7763 अन्वये आग लागली असता पुरविण्यात आले आगीचे स्थळ अग्निशमन सेवा केंद्रापासुन 30 कि.मी. अंतर असुन प्रतीकीलो मी. रु.10/- प्रमाणे रु 300/- आकारणी करण्यात आलेले आहे. ठराव क्र. 48 दि 30.03.13 अनुसार 30 किलोमीटर करीता रु. 600/- प्रती की.मी. प्रमाणे वसुल करावयास पाहीजे होते कमी वसुल करण्यात आलेले रक्कम रु. 300/- ची वसुली करण्यात यावी.

ड). चेतन इंडस्ट्रीज डी 59 एमआयडीसी नांदेड दि 21.05.2013 बारदान्याच्या गोदामास आग लागली असता वाहन क्र. MH-26-A-7763 की.मी.100 करीता रु.10/- प्रमाणे 1000/-रुपये आकारणी करण्यात आली. (देयक रु.11903.89/-)

वाहन क्र. MH-26-A-6828 की.मी.70 करीता रु.10/- प्रमाणे 700/- रु आकारणी करण्यात आली. (देयक रु.5656.26/-)

वाहन क्र. MH-26-A-7765 की.मी.50 करीता रु.10/- प्रमाणे 500/- रु आकारणी करण्यात आली.

(देयक रु.3263.44/-)

एकुण देयक रु.20823/- ठराव क्र. 48 दि 30.03.13 अनुसार अनुक्रमे रु 2000/- रु 1400/- व रु 1000/- वसुल करावयास पाहीजे होते करीता कमी वसुल करण्यात आलेली रक्कम अनुक्रमे रु.1000/- रु 700/- रु 500 /- ची वसुली करण्यात यावी.

1. आग एकाच ठिकाणी लागली असताना प्रत्येक वाहनांने आग लागलेल्या ठिकाणचे अंतर वेगवेगळे दर्शविलेले आहे

2. दर रु.20/- प्रती की.मी. असतांना कमी दराने आकारणी केलेली आहे याबाबत सविस्तर खुलासा नस्ती नाही टिप्पीणी इतर बाबी उपलब्ध नाही.

'अ' बाबत खुलासा करुन "ब"' बाबत वसुली कार्यवाही करण्यात यावी.

इ) दि. 27.5.2013 विष्णु एजन्सी एमआयडीसी कृष्णुर जि नांदेड येथे आग लागली असता खालिल अग्नीशमन वाहन पुरण्यात आले.

देयक रु.	वाहन क्र.	अंतर	वसुली करण्यात आलेली रक्कम	वसुल करावयाची रक्कम	रक्कमेतील तफावत

रु 5720.60/-	MH-26-A-7363	90 KM	रु.900/-	रु.1800/-	
रु 3547.95/-	दि 27.5.13	110 KM	रु 1100/-	रु 2200/-	रु 900/-
रु.9268.95/-					

1. एकाच ठिकाणी आग लाएकाच ठिकाणी आग लागली असता अंतरात तफावर आहे तसेच देयकातील bill of cast मध्ये दिनांकात तफावर आहे. तसेच Date of Call मध्ये सुदधा तफावत आहे याबाबत योग्य तो खुलासा करावा.

वरील प्रकरणी कमी दराने आकारणी करण्यात आलेली रक्कम रु. 4450/- ची वसुली करण्यात यावी. व सदरील रक्कम योग्य जमेचे शिर्षात जमा करण्यात यावे.

DATRWPM6401 (Ref No : 93, Hmm No : 107)

72 अग्निशमन विभागातर्फे आग प्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार फायर आडीट न करुन घेण्या बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 21199500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 21199500.00/-

01. व्यावसायिक आस्थापनांचे फायर ऑडीट न केल्यामुळे महानगर पालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

महानगरपालीका वित्तीय वर्ष2013 - 14चे लेखापरीक्षण सुरु असुन अग्निशमन विभागातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालीके अंतर्गत गृहकर विभागाने दिलेल्या माहीतीनुसार सुमारे रु14132 /- एतक्या व्यावसायीक अस्थापना असुन त्यामध्ये कारखाने ,कोल्ड स्टोअरेज ,फर्नीचर कारखाने ,साबन कारखाने , जिनींग गोडावुन ,पेट्रोल डिझेल पंप ,रसायनिक ,गॅस कपंनी वखारी ,सॉ मिल दवाखाने ,फटाके दुकाने ,चित्रपट गृहे असुनही सदर इमारतीमध्ये अद्यापही या अधिनियमां अंतर्गत फायर ऑडीट करुन घेवुन मनपा ठराव क्र . 48 दि10 .6. 2013नुसार मंजुरी दिलेल्या दरवाढीनुसार वरील नमुद केलेल्या व्यावसायीक अस्थापना साठी इतर अस्थापने साठी ना हरकत दाखल्याची व वार्षीक नुतणीकरण फी अनुक्रमे रक्कम रु.1500 -/व रु1000 /- नुसार

मान्यता दिलेली आहे .तथापी व्यावसायीक अस्थापनांने ना हरकत दाखले प्राप्त न केल्याने महानगरपालीकेस प्राप्त होवु शकणा-या अंदाजे रु2 . 12कोटी) 14133x1500(सेवा फी च्या उत्पन्नास मुकावे लागत आहे.

अग्नीशमन विभागाने स्थानिक दैनिक वृत्तपत्रात अग्नीशमन लेखापरीक्षण करुन घेणेबाबत व्यावसायीक अस्थानानां की ,ज्याने असे फायर ऑडीट केलेले नाही त्यांना महाराष्ट्र आग प्रतीबंधक व जीव संरक्षक उपाययोजना 2006 चे कलम 8 (2) नमुना जे नुसार नोटीस देण्यात आलेल्या नाहीत.तरी याबाबत आग प्रतीबंधक उपाययोजना न केलेल्या अस्थापनांना अधिनियमाच्या कलम 7 व 8 नुसार उपाययोजना करणे बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATRWPM6401 (Ref No : 94, Hmm No : 107)

73 विधी विभागातून अदा करण्यात आलेल्या अग्रीमाचे समायोजन न झाले बाबत..

विधी विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : विधी विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 18000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18000.00/-

विधी विभागातील श्री. एस.एन. झाकडे, विधी सहायक यांना न्यायालयीन प्रकरणासाठी दिल्ली येथे जाण्याकरीता अग्रीम रक्कम रुपये 5000/- प्रमाणक क्रमांक 514 दिनांक 29/04/2013 अन्वये अदा करण्यात आले आहे. तसेच MACP 388/2008 या प्रकरणाकरीता विधी सल्लागार श्री. एस.व्ही. राहेरकर यांना अग्रीम रक्कम रुपये 13000/- प्रमाणक क्रमांक 658 दिनांक 07/05/2013 अन्वये अदा करण्यात आले असून अदयाप अग्रीम रक्कमेचे समायोजन करण्यात आलेले नाही.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकाअंतर्गत विधी विभागातून सन 2013-2014 या आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे अग्रीम रक्कमांचे प्रदान करण्यात आलेले असून सदरील अग्रीम रक्कमेचे समायोजन झालेले नाही.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक /दिनांक	अग्रीम कोणास अदा केले	अग्रीम रक्कम	अग्रीम प्रयोजन

1.	514/ 29/04/2013	श्री.एस.एन.झाकडे, विधी सहायक	5000/-	न्यायालयीन प्रकरणात दिल्ली येथे जाण्यासाठी
2	658/ 07-05-2013	श्री.एस.व्ही.राहेरकर, विधी सल्लागार	13000/-	(MACP 388/2008) माधव x मनपा या न्यायालयीन प्रकरणा करिता
		एकुण	18000/-	

वरीलप्रमाणे सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये विधी विभागातून एकुण रक्कम रुपये 18000/- इतक्या अग्रीम रक्कमेचे प्रदान करण्यात आलेले आहे . महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 140 व 141 नुसार अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्यपालनासाठी आवश्यक आणि न टाळता येणारा खर्च करण्यासाठी स्थायी अग्रीम रक्कमा घेणे व त्याची प्रतीपुर्ती करणेबाबत तरतुदी नमुद आहेत. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे आदेश क्रमांक नपप्र -1005/नपअग्रीम/4305 दिनांक 03.01.2006 नुसार व महाराष्ट्र नगरपरिषदा नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम 1965 चे कलम 96 नुसार अग्रीमाचे समायोजन न झाल्यास आर्थिक हानी समजुन अधिनियमाचे कलम 96 नुसार अग्रीमाचे समायो जन न झाल्यास आर्थिक हानी समजुन अधिनियमाचे कलम 150 व 152 प्रमाणे कार्यवाही करुन वसुली करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्रमांक136 दिनांक 03/10/2017 अन्वये मागणी करुनही पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. तरी पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

HCDSHDM7901 (Ref No : 99, Hmm No : 144)

74 नांदेड मनपाने नियुक्त केलेल्या विधीजांना अदा केलेल्या देयकातून आयकराची रक्कम वसुल न केल्याबाबत.

विधी विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : विधी विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1736362.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1736362.00/-

नांदेड वाघाळा महानगरपालिका

वसूलपात्र रक्कम रु. 172136.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1736362.00/-

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये महानगरपालिकेचे वतीने बाजू मांडण्यासाठी आदेश क्रमांक नावामनपा/विधी वि/17881/2014 अन्वये विधीज्ञांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ॲडव्होकेट फी ही व्यावसायीक फी मध्ये समाविष्ठ असून विधीज्ञांना फीचे देयक अदा करतांना आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194(जे) नुसार 10% आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकर कपात करण्यात आलेली नाही.

विधी विभागाने सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये विधीज्ञांना अदा केलेल्या रक्कमांच्या संचिका उपलब्ध करुन दिलेल्या आहे त. रोखनोंदवहीमध्ये नमूद असलेल्या आणि विधी विभागाकडून खर्च करण्यात आलेल्या रक्कमांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे ॲडव्होकेट फीची देयके अदा करतांना आयकर कपात करण्यात आलेली नाही.

अक्र	दिनांक	विधीज्ञांचे नाव	देयकाची स्थूल रक्कम	आयकर कपात	देयकाची निव्वळ रक्कम	कपात न केलेली आयकर रक्कम
1	06.05.2013	Adv. Krhishan J.Sarda	29343	0	29343	2934
2	22.05.2013	Adv. B.R. Bhosale	246750	0	246750	24675
3	22.05.2013	Adv. Murar Deshpande	70000	0	70000	7000
4	11.06.2013	Adv. Murar Deshpande	76130	0	76130	7613
5	05.07.2013	Adv. Shivaji M. Jadhav	225000	0	225000	22500
6	23.07.2013	Adv. Satish M. Phuke	76800	0	76800	7680
7	16.09.2013	Adv. Murar Deshpande	18200	0	18200	1820
8	26.09.2013	Adv. Krhishan J. Sarda	49550	0	49550	4955
9	28.10.2013	Adv. Bharat Patil	30500	0	30500	3050
10	20.11.2013	Adv. Murar Deshpande	256250	0	256250	25625
11	02.12.2013	Adv. Satish M. Phuke	33614	0	33614	3361
12	04.12.2013	Adv. B.R. Bhosale	100000	0	100000	10000
13	16.01.2014	Adv. Krhishan J. Sarda	18850	0	18850	1885
14	22.01.2014	Adv. Shahedali Ansari	15000	0	15000	0

15	24.01.2014	Adv. Satish M. Phuke	29000	0	29000	2900
16	12.02.2014	Adv. B.R. Bhosale	123000	0	123000	12300
17	01.03.2014	Adv. S.V. Raherkar	36600	0	36600	3660
18	04.03.2014	Adv. Krhishan J. Sarda	37000	0	37000	3700
19	04.03.2014	Adv. Satish M. Phuke	25000	0	25000	2500
20	04.03.2014	Adv. S.V. Raherkar	40650	0	40650	4065
21	05.03.2014	Adv. S.V. Raherkar	38200	0	38200	3820
22	22.03.2014	Adv. Murar Deshpande	133750	0	133750	13375
23	26.03.2014	Adv. Krhishan J. Sarda	27175	0	27175	2718
		Total	**1736362**	**0**	**1736362**	**172136**

आयकर अधिनियम, 1961 मधील कलम 194 (जे) मधील तरतुदीनुसार ॲडव्होकेट फी ही व्यावसायिक फी मध्ये समाविष्ठ असल्याने 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे . परंतु वरील नमुद ॲडव्होकेट फीची देयके अदा करतांना देयकातून 10 % आयकर कपात करण्यात आलेली नाही. कपात न करण्यात आलेली आयकराची रक्कम संबंधीतांकडून वसुल करण्यात येवून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्रमांक 143 दिनांक 06/10/2017 अन्वये मागणी करुन पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

HCDSHDM7901 (Ref No : 100, Hmm No : 143)

75 महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक पथदिव्याची देखभाल, दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे या कामासाठी पुरवठादारांकडून व्यवस्था करणे कामी अदा केलेल्या देयकामध्ये वसुल न केलेल्या रकमाबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 247018.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 247018.00/-

सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये विभागाने देयकामधील अदा केलेल्या रकमाबाबत पुरवठादारां कडून वसुल न केलेल्या शासकीय रक्कमाचा भरणा शासनखाती व मनपा रक्कमाचा भरणा मनपा निधीमध्ये भरणा न केल्याची अनियमितता.

नांदेड-वाघाळा महानगरपालिका, नांदेड सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे विदयुत विभागाने महा नगरपालिका हद्दीतील सार्वजनिक पथदिव्याची देखभाल , दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे कामासाठी पुरवठादारांकडून व्यवस्था करणे कामी देयकामध्ये अदा रकमाबाबत उपलब्ध केलेल्या अभिलेख्याशी पडताळणी केली असता , देयकामधील अदा केलेल्या रकमाबाबत वसुल न केलेल्या शासकीय रक्कमेचा भरणा व महानगरपालिका निधी मध्ये भरणा करावयाच्या रकमाचा तपशील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रमा.क्र/दिनांक कालावधी	खरेदी रक्कम	मूल्यवर्धित कर.रक्कम	स्था.सं.कराची रक्कम	आयकर कमी भरणा रक्कम	भरणा न केलेली एकूण रक्कम
1.	दि.23/02/13 ते 22/03/13 दि.23/03/13 ते 22/04/13	1639288	32786	4098	1058	37942
2.	दि.23/04/13 ते 22/05/13	819664	16393	2049	512	18954
3.	दि.23/05/13 ते 22/06/13 दि.23/06/13 ते 22/07/13	1639288	32786	4098	1276	38160
4.	दि.23/07/13 ते 22/08/13 दि.23/08/13 ते 22/09/13	1639288	32786	4098	1384	38268
5.	दि.23/09/13 ते 22/10/13	819664	16393	2049	584	19026
6.	दि.23/10/13 ते 22/11/13	819664	16393	2049	498	18940
7.	दि.23/11/13 ते 22/12/13	819664	16393	2049	498	18940
8.	दि.23/12/13 ते 22/01/14	819664	16393	2049	478	18920

9.	दि.23/01/14 ते 22/02/14	819664	16393	2049	486	18928
10.	दि.23/02/14 ते 22/03/14	819664	16393	2049	498	18940
	एकूण रक्कम रु.	**10655512**	**213109**	**26637**	**7272**	**247018**

यावर अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.विद्युत विभागाने विद्युत साहित्य खरेदीवर खर्च केलेली रक्कम रु .10655512/- एवढी असून शासनाची मूल्यवर्धित कर व स्थानिक संस्था कराची रक्कम , महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 अन्वये 2 टक्के दराने मूल्यवर्धित कराची रक्कम रु .213109/- व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना दि .06.08.2012 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 च्या नियम 27 मधील उपनियम 5 नुसार सदर कामाच्या देयकातून 0.25 टक्के दराने स्थानिक संस्था कराची रक्कम रु.26637/- तसेच आयकर कायदा 1961 नुसार 2 टक्के कराची कपात करावयाची असताना आयकरांची देयकातून कमी कपात झालेली भरणा रक्कम रु .7272/- अशी एकूण रक्कम रु .247018/- सदर पुरवठादारांच्या देयकातून वसूल केलेली नाही . त्यामुळे सदर रक्कम वसूलपात्र ठरविण्यात येत आहे,

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वसूल न केलेल्या शासकीय मूल्यवर्धित कराच्या रक्कमेचा भरणा रक्कम रु.213109/-व आयकरांच्या रक्कमेचा भरणा रक्कम रु .7272/- शासन खाती, तसेच स्थानिक संस्था कराची रक्कम रु .26637/- महानगरपालिका निधीमध्ये भरणा करण्यात येऊन अनुपालन दर्शवावे.

CCRVNRM6701 (Ref No : 107, Hmm No : 155)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

---------- निरंक ----------

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

76 विहीत अहर्ता प्राप्त नसतांना दिलेल्या पदोन्नती बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष : मुख्य कार्या आस्था मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

मुंबई प्रांतिक महानगरपालीका अधिनियम – 1949 नुसार ज्येष्ठता / पात्रता , विहीत करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणी किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहीत नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सुट मीळणे आवश्यक असते.इ. वेळोवळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेश पूर्ण आणी / किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणे आवश्यक असेल, विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे, शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र. सेप्रनि/1098/प्र. क्र. 7/98/12 दि 25.01.1999 अनुसार mscit परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे , शासन निर्णय क्र. एन. व्ही. बी. 3097/1469/ प्र. क्र.-181/97/नवि-22/ दि.5 एप्रील 1999 अनूसार एल. एस. जी. एस. परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे , महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती नियम 1981 अनुसार) पदोन्नतीच्या पदासाठी विहीत करण्यात आलेली ज्येष्ठता, अर्हता पात्रता अर्हता परीक्षा या सर्वबाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे अशा प्रकारची काय्रवाही महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेली नाही.

आपल्या आस्थापनेवरील खालील कर्मचारी यांची सेवापुस्तकांवरुन माहीती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	नांव	पद	जन्म तारीख	पात्रता	जात	नियुक्ती दि.
1	श्री सादीक मो.अ.खान	सहाय्यक आयुक्त	10.3.1960	एस.एस.सी-77 बी.कॉम-1989	मुस्लीम	1.4.1985
2	श्री जगदिश कुलकर्णी	मु.नि.व कर संकलन	24.6.1963	एम कॉम	ब्राम्हण	1.11.1989
3	श्री सुधीर इंगोले	कार्यालय अधीक्षक	15.10.1966	बी.कॉम-1989	मराठा	3.1.2002
4	श्री लक्ष्मण चौरे	सहाय्यक	1.6.1969	बी.कॉम	हिंदु	16.4.1992

		आयुक्त			कोकणी	

उपरोक्त अ.क्र.1 कर्मचारी श्री सादीक खान मो. अहमद खान, लिपीक यांना का.अ.क्र.आस्था-15/6076/दि.18.7.1992 अन्वये सहाय्यक अंतर्गत लेखापरीक्षक का.अ.क्र.आस्था-1/2709/दि31.5.2002 अन्वये उपलेखा परीक्षक पदी का.आ./आस्था-1/15494/06दि.9.3.2006 अन्वये लेखापालपदी व का.आ.क्र.आस्था-1/4540/08 दि.12.08.2008 अन्वये सहाय्यक आयुक्त पदी अशा एकूण 4 पदोन्नती देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त अ.क्र.2 कर्मचारी श्री जगदीश कुलकर्णी, लिपीक यांना क्र.97/आस्था/नपा/वाघाळा/सीआर/14 दि 24.1.1997 अन्वये जकात निरीक्षक का.आ.1/आस्था/ 15494/206 दि 9.3.2006 अन्वये भांडार अधीक्षक पदी का.आ.क्र.आस्था-1/4339/08दि.12.08.2008 अन्वये मुख्य निर्धारक व कर संकलन अधिकारी अशा एकुण 3 पदोन्नती देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त अ.क्र.3 कर्मचारी इंगोले सुधीर, लिपीक यांना का.अ.क्र.99/आस्था/नपा/सीआर/14 दि 29.1.1997 वरीष्ठ लिपीक, का.अ.क्र.आस्था-1/15/54/06 दि.9.3.2006 अन्वये प्रशासकीय अधीकारी पदी व का.आ.क्र./आस्था-1/4339/08 दि.12.8.2008 रोजी कार्यालय अधीक्षक अशा 3 पदोन्नती प्रदान करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त 4 कर्मचारी यांना कार्यालयाने वेळोवेळी पदोन्नती प्रदान केलेली आहे. तथापी यांच्याकडे पदोन्नती साठी आवश्यक असणारी खालील प्रमाणे अर्हता (पात्रता) नसल्याचे सेवापुस्तका वरुन तपासणी अंती निष्पण झाले आहे.

1.मुंबई प्रांतिक महानगरपालीका अधिनियम - 1949 नुसार

अ.ज्येष्ठता / पात्रता /

आ.विहीत करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणी किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहीत नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सुट मीळणे आवश्यक असते.

इ.वेळोवळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेश पूर्ण असावे किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणे सुध्दा आवश्यक असेल.

ई.विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य

2.शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र.सेप्रनि/1098/प्र.क्र.7/98/12 दि 25.01.1999 अनुसार mscit परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे

3.शासन निर्णय क्र.एन.व्ही.बी. 3097/1469/ प्र.क्र.-181/97/नवि-22/ दि.5 एप्रील 1999 अनूसार एल.एस.जी.एस.परीक्षा उत्तीर्ण.

4.महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती नियम 1981अनुसार) पदोन्नतीच्या पदासाठी विहीत करण्यात आलेली ज्येष्ठता, अर्हता पात्रता अर्हता परीक्षा या सर्वबाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

अ.क्र.1 सादीक खान मो.अहमद खान यांना तीसरी पदोन्नती दि 09.03.2006 व चौथ्यांदा पदोन्नती दि.12.08.2008 रोजी देण्यात आली आहे.

कर्मचारी अ.क्र.2 कर्मचारी जगदीश कुळकर्णी यांना दुस-यांदा पदोन्नती दि.09.03.2006 व तीस-या वेळी पदोन्नती दि.12.08.2008 रोजी प्रदान करण्यात आली आहे.

कर्मचारी अ.क्र.3 सुधीर इंगोले यांना दुसरी पदोन्नती दि.09.03.2006 व तीसरी पदोन्नती दि.12.08.2008 रोजी प्रदान करण्यात आली आहे.

तथापी महाराष्ट्र शासन साप्रवि परीपत्रक क्रमांक एसआरव्ही/1088/109/2012 दि 21.08.1988 नूसार विशीष्ट पदावर पदोन्नती करतांना निम्न पदावर 3 वर्षाच्या किमान सेवेची अट म्हणून विहीत करण्यात आली आहे. तसेच आंतर श्रेणीय पदोन्नती साठी निकटच्या पदावर 3 वर्षाच्या किमान सेवेची अट विहीत करण्यात आली आहे.

कर्मचारी अ क्र.4. लक्ष्मण चौरे, सहाय्यक आयुक्त यांना कार्यालयीन आदेश क्र. 3535/दि 17.6.2006 लेखापाल या पदावर, जा.क्र. साप्रवि/आस्था-1/4070/10दि-23.09.2010 मुख्य लेखापाल या पदावर तसेच का.आदेश क्र.साप्रवि/आस्था-1/8936/16 दि 03.10.2016 अन्वये का.अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. याचे बाबत सुदधा उपरोक्त अनुक्रमांक 1 ते 4 ची पुर्तता होत नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त सर्व कर्मचारी यांना पदोन्नती देतांना शासन निर्णय महाराष्ट्र नागरी सेवा 1981 (सेवा व शर्ती) नुसार विभागाने विचार केलेला नाही. म्हणून सदर सर्व कर्मचारी यांना दिलेली पदोन्नती नियमांनुसार योग्य ठरत नाही तरी याबाबत अनूपालन दर्शवावे.

याबाबत अर्धसमासपत्र क्र.47 दि.07.02.2017 अन्वये कळवूनही अनुपालन प्राप्त नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

FDSKVSM6701 (Ref No : 31, Hmm No : 47)

77 विहीत अहर्ता प्राप्त नसतांना दिलेल्या पदोन्नती बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष : मुख्य कार्यालय आस्था मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

मुंबई प्रांतिक महानगरपालीका अधिनियम – 1949 नुसार ज्येष्ठता / पात्रता, विहीत करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणी किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहीत नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सुट मीळणे आवश्यक असते. इ. वेळोवळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेश पूर्ण आणी / किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणे आवश्यक असेल, विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे, शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र. सेप्रनि/1098/प्र.क्र.7/98/12 दि 25.01.1999 अनुसार mscit परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे , शासन निर्णय क्र. एन. व्ही. बी. 3097/1469/ प्र.क्र.-181/97/नवि-22/ दि.5 एप्रील 1999 अनूसार एल. एस. जी. एस. परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे , महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती नियम 1981 अनुसार) पदोन्नतीच्या पदासाठी विहीत करण्यात आलेली ज्येष्ठता, अर्हता पात्रता अर्हता परीक्षा या सर्वबाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे अशा प्रकारची काय्रवाही महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेली नाही.

आपल्या आस्थापनेवरील खालील अधिकारी यांची सेवापुस्तकांवरुन माहीती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	नांव	पद	जन्म तारीख	पात्रता	जात	नियुक्ती दि.
1	श्री अविनाश अटकोरे	सहाय्यक आयुक्त	08.4.1964	एच.एस.सी	महार	1.11.1989
2	श्री संजय जाधव	सहाय्यक आयुक्त	16.12.1966	एचएससी	मराठा	22.9.1989
3	श्री पंडीत पेमो जाधव	सहाय्यक आयुक्त	19.2.1961	एचएससी	लमाणी-डीएनटी	10.08.1981
4	श्री प्रकाश मा.येवले	सहाय्यक आयुक्त	21.01.1961	एचएससी	बौध्द	3.1.2002
5	श्री विलास भोसीकर	अंतर्गत लेखापरीक्षक	1.5.1963	बी.कॉम	मराठा	1.11.1989
6	श्री बंडु उत्तरवार	प्रशासकीय अधिकारी	7.6.1959	एसएससी	कोमटी	27.7.1981

उपरोक्त अ.क्र.1 कर्मचारी श्री अविनाश अटकोरे,सहाय्यक आयुक्त यांना का.अ.97/अस्था-1/नपा/ वाघाळा दि. 29.01.1997 अन्वये लेखापालपदी का.आ.क्र./साप्रवि-1/आस्था-1/5494/06 दि.09.03.2006 अन्वये मुख्य लेखापालपदी व का.आ.क्र.आस्था-1/4339/08 दि.12.08.2008 नुसार सहाय्यक आयुक्त यापदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

उपरोक्त अ.क्रं.2 कर्मचारी श्री.संजय जाधव यांना आपले आदेश क्रं. अ.क्रं.96/आस्था/नपा/वाघाळा/2351 दि.16.12.1996 अन्वये जकात निरीक्षक व का.आ.क्रं.97/आस्था/नपा/वाघाळा/सीआर-14 दि.28.01.1997 नुसार जकात अधिक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे.

उपरोक्त अ.क्र.3 कर्मचारी श्री पंडीत पेमो जाधव यांना आपले आ.क्र.2710/ दि.31.05.2002 अन्वये चेकर पदी पदोन्नती,का.आ.क्र.नांवाशमनपा/आस्था-1/10349/12 दि.11.1.2012 अन्वये उपलेखापरीक्षक पदी पदोन्नती आ.क्र.97/आस्था-4/19590/2013 दि.21.11.2013 अन्वये दि.21.11.1994 पासुन कालबध्द पदोन्नती, तसेच का.आ.क्र.आस्था-1/6091/2014 दि.27.06.2014 अन्वये कुंठीत अवस्था घालवीण्यासाठी वरीष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देण्यात आला त्याचप्रमाणे का.आ.क्र.मनपा/साप्रवि/आस्था-1/10072/ दि 03.11.2015 अन्वये पुर्वलक्ष प्रभावाने दि.14.02.2014 पासुन वेतन श्रेणी 9300-34800 (4300) अभिलेख पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली.

उपरोक्त अ.क्र.4 कर्मचारी श्री प्रकाश येवले यांना का.अ.क्र.97/आस्था/नपा/वाघाळा/सिआर/14 दि 28.1.1997 -अन्वये दि 01.09.1996 पासुन प्रशासकीय अधिकारी पदोन्नती व का.आ.क्र./सा.प्र.वि./आस्था-1/14052/06 दि 06.02.2006 नुसार सहाय्यक आयुक्त म्हणून पदोन्नती देण्यात आली.

उपरोक्त अ.क्र.5 कर्मचारी श्री विलास भोसीकर, लिपीक यांना का.अ. आस्था/ नपा/वाघाळा/2352/दि.16.12.1996 ला लेखापाल पदी का.अ.97/आस्था/नपा/वाघाळा/सीआर-14 दि 28.1.1997 ला मुख्यलेखापाल पदी व साप्रवि/आस्था-1/14052/ दि 06.02.2006 रोजी अंतर्गत लेखापरीक्षक पदी पदोन्नती अशा एकूण 3 पदोन्नती प्रदान केल्या आहेत.

उपरोक्त अ.क्र.6 कर्मचारी श्री बंडु उत्तरवार यांना आपले का.आ.क्र.मनपा/आस्था-1/3535/ 06 दि 17.06.2006 अन्वये वरीष्ठ लिपीक पदी पदोन्नती, का.आ.क्र. लेखावि/ नांवाशमनपा/14311/14 दि 10.11.2014 अन्वये 24 वर्षे पुर्ण झाल्यामुळे दि 01.10.2006 पासुन सुधारीत आश्वासीत प्रगती योजना लाभ देण्यात आला, का.आ.क्र./नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/1881/ दि.24.07.2014 अन्वये

वरीष्ठ लिपीक पदावर केलेली पदोन्नती रदद करुन कालबध्द पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चीत करुन लाभ देण्यात आला त्याचप्रमाणे का.आक्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/275/16 दि 05.04.2016 अन्वये प्रशासकीय अधिकारी पदी पदोन्नती देण्यात आली.

अ.क्र. 6 कर्मचारी बंडु उत्तरवार यांना आ.का.क्र.मनपा/आस्था-1/3535/06 दि.17.6.2006 अन्वये वरिष्ठ लिपीक पदाची पदोन्नती देण्यात आली व दि 17.06.2006 पासुन ग्रेड वेतन 4200 रु. देवुन वेतन निश्चीती करण्यात आली. तदनंतर का.आ.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/8118 दि 24.07.2014 अन्वये सदर पदोन्नती रदद करुन का.आ.क्र.लेखावि/नांवाशमनपा/14311/14 दि 10.11.2014 अन्वये 24 वर्षे पुर्ण झाल्यामुळे दि 01.10.2006 पासुन ग्रेड वेतन 4200 सह आश्वासीत प्रगती योजना व सुधारीत आश्वासीत प्रगती योजना लाभ प्रदान करण्यात आला आहे.

दि 01.07.2010 पासुन ग्रेड वेतन रु. 2400 चा लाभ देण्यात आला आहे. तथापी आदेश रदद केल्यामुळे सदर कालावधीत ग्रेड वेतन रु 4200 ने वेतन निश्चीती करुन वेतन अदा केलेले आहे. त्यामुळे सदर कालावधीत दि.17.06.2006 पासुन दि01.07.2010 पर्यंत ग्रेड वेतन (4200-2400=1800) जादा प्रदान झालेले आहे. तरी सदर ग्रेड वेतनातील फरक व त्यावरील अनुज्ञेय भत्ते व वेतन निश्चीतीतील फरक व त्यावरील अनुज्ञेय भत्ते अतिप्रदान झाल्यामुळे वसुल करणे आवश्यक आहे. संबंधीत कर्मचारी यांना सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देताना एकाच दिनांकास म्हणजे दि 01.10.2006 रोजी ग्रेड वेतन रु.4200 व रु 4300 देवुन दोन वेळा वेतन निश्चीती केली आहे. त्याचप्रमाणे का.आ.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/275/16 दि 05.04.2016 रोजी प्रशासकीय अधिकारी पदी पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच सदर कर्मचारी यांना 2 वेळा आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ मुळे लिपीक पदावर असतांना वरिष्ठ लिपीक पदाची वेतन श्रेणी दिलेली होती प्रत्यक्ष वरीष्ठ लिपीक पदी पदोन्नती झालेली नव्हती त्यामुळे त्यांना दिलेली प्रशासकीय अधीकारी ही पदोन्नती अनुज्ञेय ठरत नाही. सदर कर्मचारी यांना कालबध्द तथा आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देताना शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन/1199/प्र.क्र.2/99 सेवा-3 दि.20 जुलै 2001 अ.क्र.2 (5) अ.क्र.2 (7) तसेच शासन निर्णय क्र.वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 दि 01 एप्रील 2010 अ.क्र.क. (2), ड (1) चे अनुपालन झालेले नाही. तरी याबाबत अनुपालन दर्शविण्यात यावे.

अनु.क्र.3 कर्मचारी पंडीत पेमो जाधव यांना दि 31 मे 2002 ला चेकर पदी दि. 11.01.2012 ला उपलेखापरीक्षक पदी दि.12.1.2013 रोजी कालबध्द पदोन्न्ती (दि.21.11.2014 पासुन) दि.27.06.2014 ला कुंठीता घालविण्यासाठी वरिष्ठ वेतनश्रेणी लाभ तसेच दि.03.11.2015 रोजी पुर्वलक्षी प्रभावाने दि.14.02.2014 पासुन वेतन श्रेणी 9300-34800 (4300) मध्य अभिलेख पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली.

श्री पंडीत पेमो जाधव मुळ पद लिपीक यांना ज्या पदोन्नती तथा वरिष्ठ श्रेण्या कार्यालयाकडुन प्रदान करण्यात आलेल्या आहेत त्या शासन निर्णय क्र.:एसआरव्ही-1095/प्र.क्र.1/बारा.दि.08 जुन 1995, शासन निर्णय क्र.:वेतन-1099/प्र.क्र.1/99/सेवा-3/दि.25 जानेवारी 1999 अनु क्र.2, शासन निर्णय वेतन 1199/प्र.क्र.2/सेवा-3 दि 20 जुलै 2001 अनु.क्र.2 (5) व (6) व शासन निर्णय क्रमांक:वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3 दि.1 जुलै 2011. अनु.क्र.4 (ब) अनुसार देय ठरत नाहीत.

महानगरपालीका वित्तीय वर्ष 2013-2014चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षाअखेर झोपडपटटी सुधार योजना (बी.एस.यू.पी.)अंतर्गत अभिलेख्याची पडताळणी केली असता महानगर पालिका लेखासंहिता 1971चे नियम 182(1) नुसार नमुना क्रमांक 139अन्वये विभागाअंतर्गत घेण्यात आलेले घर कुल कामे /रस्ते/ नाल्या/ पाणीपुरवठा का मे कार्यारंभ देण्यात आलेले मंजुर कामाच्या आदेशाची नोंद घेवून रकानानिहाय नोंदी अदयावत करुन वर्षाअखेरीस कामाची सदयस्थिती व त्या वरील झालेला खर्चाचा तपशिल नोंदविणे आवश्यक असताना झोपडपटी सुधार योजना (बी.एस.यू.पी.) विभागाने लेखापरिक्षण तपासणी कालावधीपर्यंत नों दवही अदयावत न ठेवल्यामुळे 31 मार्च 2014 अखेर मंजुर कामे,पुर्ण झालेली कामे, अपुर्ण कामे व झालेला खर्च, योजनानिहाय प्राप्त निधी व योग्य ती अचुकता पडताळणी करता आली नाही.

झोपडपटटी सुधार योजना (बी.एस.यू.पी.) विभागाकडे 31 मार्च 2014 अखेर शासननिधी प्राप्त होवून कामे मंजूर केलेली असून निधी प्राप्त असतांना बहुतांश कामे हाती घेवून विहीत कालावधीत पुर्ण करण्यात आलेली नाही ती अपुर्ण स्थितीत राहिलेली आहेत . संबंधीत प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण झाले नसल्यामुळे त्यांच्या किंमती वाढत गेल्या .कंत्राटदाराने कामे वेळीच पु र्ण न केल्यामुळे योजनेचा उददेश सफल झालेला नाही . लाभार्थ्यांस / जनतेस फायदा झालेला नाही . प्रकल्पाच्या वाढीव किंमती साठी सुधारीत प्रशासकिय मान्यता घेतलेल्या नाही.

तरी नियमानुसार विहीत नमुन्यात नोंदवही सर्व रकान्यासह अदयावत ठेवून सक्षम प्राधिका-याकडून अनुपालन दर्शवावे.

FDAVANM6101 (Ref No : 81, Hmm No : 119)

94 पुर्ण/ अपुर्ण कामाची योजनानिहाय नोंदवही न ठेवणेबाबत.

पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग अंतर्गत शासकिय/ मनपा निधी अंतर्गत करण्यात येणा-या कामाची सदयस्थिती दर्शविणारे विहीत नमुन्यात पुर्ण/अपुर्ण कामाची नोंदवही न ठेवल्यामुळे योजनाअंतर्गत कामाची तपासणी करता आली नाही.

महानगरपालीका वित्तीय वर्ष 2013-2014 चे ले खापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षाअखेर पाणीपुरवठा मलनिस्सारण विभाग अंतर्गत अभिलेख्याची पडताळणी केली असता महानगरपालिका लेखासंहिता1971चे नियम 182(1) नुसार नमुना क्रमांक 139 अन्वये विभागाअंतर्गत घेण्यात आलेले नाल्या/मलनिस्सारण/पाणीपुरवठा कामे कार्यारंभ देण्या त आलेले मंजुर कामाच्या आदेशाची नोंद घेवून रकानानिहाय नोंदी अदयावत करुन वर्षाअखेरीस कामाची सदयस्थिती व त्यावरील झालेला खर्चाचा तपशिल नोंदविणे आवश्यक आहे . पाणीपुरवठा मलनिस्सारण विभागाने लेखापरिक्षण तपासणी काला वधीपर्यंत नोंदवही अदयावत न ठेवल्यामुळे 31 मार्च 2014 अखेर मंजुर कामे , पुर्ण झालेली कामे,अपुर्ण कामे व झालेला खर्च ,योजनानिहाय प्राप्त निधी व योग्य ती अचुकता पडताळणी करता

आली नाही.

पाणीपुरवठा मलनिस्सारण विभागाकडे मार्च 2014 अखेर शासननिधी प्राप्त होवून कामे मंजूर केलेली असून निधी प्राप्त असतांना बहुतांश का मे हाती घेवून विहीत कालावधीत पुर्ण करण्यात आलेली नाही ती अपुर्ण स्थितीत राहिलेली आहेत . संबंधीत प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण झाले नसल्यामुळे त्यांच्या किंमती वाढत गेल्या . कंत्राटदाराने कामे वेळीच पुर्ण न केल्यामुळे योजनेचा उददेश सफल झालेला नाही.लाभार्थ्यांस / जनतेस फायदा झालेला नाही . प्रकल्पाच्या वाढीव किंमतीसाठी सुधारीत प्रशासकिय मान्यता घेतलेल्या नाही.

तरी नियमानुसार विहीत नमुन्यात नोंदवही सर्व रकान्यासह अदयावत ठेवून सक्षम प्राधिका -याकडून अनुपालन दर्शवावे.

FDAVANM6101 (Ref No : 82, Hmm No : 91)

95 पाणीपुरवठा विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही न ठेवणे बाबत

पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा शासन निधी निधी

अनियमितता कलम : 95

पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग अंतर्गत नांदेड-वाघाळा महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जंगम मालमत्ता नोंदवही अदयावत न ठेवल्यामुळे जंगम मालमत्तेबाबत पडताळणी न झाले बाबत-

महानगरपालीका वित्तीय वर्ष 2013-2014 चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षाअखेर पाणी पुरवठा मलनिस्सारण विभागअंतर्गत अभिलेख्याची पडताळणी केली असता महानगरपालिका लेखा संहिता1971 चे नियम 144 नुसार पाणीपुरवठा विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या सर्व चल /अचल साधनसामग्री , साहित्य,वस्तु उदा .पाईपालाईन,सलयुज हॉल ,इंधन मोटारी , विदयुतपंप, विविध यंत्रसामग्री ,जलशुध्दीकरण यंत्र ,फर्निचर,जनरेटर,पंखे,संगणक,कपाटे,वाहने इत्यादी विविध प्रकार च्या जंगम साहित्याची नोंद नमुना क्रमांक 114 मध्ये विहीत नमुन्यात नोंदी वे ळोवेळी नोंदविणे आव श्यक असतांना विभागाने नियमानुसार नोंदी घेतलेल्या नाही यामुळे सन 2014 अखेर विभागाकडे अस

लेल्या जंगम मालमत्तेतील साहित्य प्रकार,नग,खरेदी कालावधी,किंमत,वापर करणारी यंत्रणा,अधि कारी /कर्मचारी नांव,साहित्य सदयस्थिती नोंद ,वापर ठिकाण इत्यादी बा बींची अचुकता नोंदवही न ठेवल्या मुळे पडताळणी करता आली नाही.

वरील नमुद नियमानुसार विहीत नमुन्यात जंगम मालमत्ता नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक असून आपल्या कार्यक्षेत्रात विविध प्रकारनिहाय पानावर स्वतत्र नोंदी घेवून नियमातील तरतुदीप्रमाणे नियमीत वर्ष समाप्तीनंतर सदर मालमत्ता सुस्थितीत व वापरयोग्य असल्याचे सक्षम प्राधिकारी यांनी पडताळणी केलेले प्रमाणपत्र नोंदवहीस नोंदविणे आवश्यक असून अशी जंगम मालमत्ता नोंदवही अनु पालन कामी उपलब्ध करण्यात यावी . उपयोगात न येणारे साहित्य / यंत्रसामग्री/ वाहन बंद स्थितीत असलेले/पडून असलेले निर्लेखन करुन रक्कम शासनखाती भरणा करण्यात यावी . विभागाने यापुर्वी योग्य ती कार्यवाही केलेली नाही. तरी परिच्छेद अंतिम नोंदविण्यात येत आहे.

FDAVANM6101 (Ref No : 83, Hmm No : 91)

96 पाणीपुरवठा विभागाने स्थावर मालमत्ता नोंदवही अदयावत न ठेवणे बाबत

पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा शासन निधी निधी
अनियमितता कलम : 95

पाणी पुरवठा मलनिस्सारण विभागाने स्थावर मालमत्ता नोंदी नियमानुसार विहीत नमुन्यात न ठेवल्यामुळे आर्थिक वर्षाअखेर विभागातील स्थावर मालमत्ता बाबत सत्यता पडताळणी करता आलेली नाही.

महानगरपालीका वित्तीय वर्ष 2013-2014 चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षाअखेर पाणी पुरवठा मलनिस्सारण विभागअंतर्गत अभिलेख्याची पडताळणी केली असता महानगरपालिका लेखा संहिता1971चे नियम155 नुसार नमुना क्रमांक 128 मध्ये स्थावर मालमत्ता जमीन वगळून नोंदवही वर्षाअखेर सर्व रकान्यासह नोंदी अदयावत करुन सक्षम प्राधिका -याचे सहीने प्रमाणित करुन घेणे आव श्यक आहे. तथापि पाणीपुरवठा विभागाकडील अभिलेख्याची पडताळणी केली असता विभागाने आपल्या अखत्यारीतील स्थावर मालमत्तेची नोंद असलेली उपरोक्त नमुन्यातील नोंदवही परिरक्षित केलेली नाही.वास्तविकता,पाणीपुरवठा विभागाकडे विविध शासकिय ,म.न.पा..निधी अंतर्गत (उदाहरणार्थ जसे

JNNURM,दलितवस्ती सुधार योजना,म.न.पा.निधी)मोठया प्रमाणावर निधी प्राप्त होऊन त्या अंतर्गत विविध योजना जसे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था ,जलकुंभ बांधकाम,जलशुध्दीकरण उभारणी, विविध पाणीपुरवठा पाईपलाईनचे चेंबर इत्यादी अंतर्गत संबंधित मक्तेदार / व्यक्ती/ संस्था यांचे कडून कामे करुन घेण्यात येऊन त्यांनी सदर बाबी/साहित्य/बांधकामे इत्यादी विभागास/ महानगरपालिकेस वेळोवेळी हस्तांतर केलेले आहेत . त्यामुळे त्यांची नोंद वेळोवेळी उपरोक्त नियमान्व्ये विहीत नोंदवहीत घेणेत येऊन ती प्रमाविणत करणे क्रमप्राप्त होते .मात्र,निमोचित कार्यवाही झालेली नसल्याने विभागा कडील स्थावर मालमत्ता सन 2013-2014 अखेर अभिलेख्याबाहेर राहिल्या असल्याने त्याची सत्यता नोंदवही अभावी लेखापरिक्षणात पडताळता आलेली नाही.

तरी,स्थावर मालमत्ता नोंदवही परिरक्षीत करुन अदयावत मालमत्तेच्या नोंदीसह सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्रमाणित करुन अनुपालन दर्शविणे आवश्यक आहे.

FDAVANM6101 (Ref No : 84, Hmm No : 91)

97 संगणक विभागातील देयके अदा करतांना तसेच संगणक साहित्याची दुरुस्ती करतांना झालेल्या अनिमितता

संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष : संगणक किंवा माहिती त मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 50650.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 50650.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 50650.00/-

संगणक साहित्याचे देखभाल व दुरुस्तीसाठी मे.ॲमेट्रीक्स प्रा.लि.नांदेड यांचेशी करण्यात आलेल्या संगणक साहित्य देखभाल व दुरुस्तीच्या दरकरारातील शर्त क्रमांक 2 चे पालन करण्यात आले नाही. यु.पी.एस. दुरुस्तीसाठी दरपत्रके न मागविता दुरुस्ती करुन घेण्यात आलेली असल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे अभिलेख्याचे लेखापरिक्षण करताना खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत. त्यावर अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. मे.ॲमेट्रीक्स प्रा.लि.नांदेड यांचेशी संगणक साहित्य देखभाल व दुरुस्तीचा दरकरार दिनांक 01.09.2012 ते 31.08.2015 या तीन वर्षाचे कालावधीसाठी करण्यात आलेला आहे.सदरच्या करारनाम्यातील शर्त क्रमांक 2

अन्वये देखभाल व दुरुस्तीच्या कामाचा तिमाही कालावधी संपल्यानंतर देयक सादर करणे आवश्यक असतांना 7 व्या व 8 व्या तिमाहीचे (सप्टेंबर 2013 ते नोव्हेंबर 2013 व डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014)या कालावधीच्या देखभाल दुरुस्तीच्या देयकाची रक्कम रुपये 150000/- बील नंबर 004 दिनांक 10.02.2014 अन्वये मागणी करण्यात आलेली असून सदरील मागणी करारातील शर्तीचा भंग करणारी आहे.

2. मे.ॲमेट्रीक्स प्रा.लि.नांदेड यांचेशी करण्यात आलेल्या संगणक साहित्य देखभाल व दुरुस्तीच्या दरकरारातील शर्त क्रमांक 2नुसार मनपा संगणक सिस्टीम मॅनेजर यांनी दरकरार केलेल्या संस्थेचे देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक असल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रत्येक देयकावर नमूद करणे आवश्यक असतांना असे प्रमाणपत्र देयकावर न नोंदविता देखभाल व दुरुस्तीची देयके अदा करण्यात आलेली आहेत.

3. मे.ॲमेट्रीक्स प्रा.लि.नांदेड यांचेशी संगणक साहित्य देखभाल व दुरुस्तीचा दरकरार दिनांक 01.09.2012 रोजी करण्यात आलेला आहे.सदरच्या करारनाम्यावर मनपाचे वतीने सक्षम अधिका-यांच्या सहया केलेल्या नाहीत.तसेच ज्या स्टॅम्पपेपर करारनामा करण्यात आलेला आहे तो स्टॅम्प दिनांक 19.03.2013रोजी खरेदी करण्यात आलेला असून करारनाम्याचा दिनांक 06 महिण्यापुर्वीचा नमुद करण्यात आलेला आहे.

4. मनपा नोटीस क्र.नावाशमनपा/संगकक्ष/31826/2014 दिनांक 05.03.2014अन्वये कॉमात निष्काळजीपणा होत असल्याबाबतची नोटीस मे.ॲमेट्रीक्स प्रा.लि.13/1, उत्कर्षा पेट्रोलपंपाजवळ, दौड हायवे, आरणगाव, अहमदनगर यांना देण्यात आलेली असून पुन्हा त्याच संस्थेला मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

5. मनपा आदेश क्रमांक नांवाशमनपा/संगणककक्ष/8260/2013 दिनांक 24/07/2013 या प्रशासकिय व आर्थिक मान्यतेच्या आदेशान्वये क्षेत्रीय कार्यालय-1, शिवाजीनगर व स्थानिक संस्था कर विभागातील 5 केव्हीए क्षमतेचे युपीएस मे.वत्सल एन्टरप्रायजेस,नांदेड यांचेकडून दुरुस्त करुन घेण्यात आले आहेत.त्याची मंजुर करण्यात आलेली देयके खालीलप्रमाणे आहेत.सन अभिले वर्षाचे आर्थिक या 14-2013ख्याचे लेखापरिक्षण करताना खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत. त्यावर अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

देयक क्र.	दिनांक	रक्कम	विभाग
01/34	03.01.2013	22800	क्षेत्रीय कार्यालय-1
01/35	29.06.2013	27850	स्थानिक संस्था कर विभाग

वरील नमुद युपीएस दुरुस्तीकरिता दरपत्रके न मागविण्यात आल्याने, देखभाल व दुरुस्तीचा दरकरार न केल्याने जास्त रक्कम अदा करावी लागलेली आहे असे वाटते. तसेच स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेला फायदा मिळू शकला नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 चे नियम 6 अन्वये अर्धसमास पत्र क्रमांक 136दिनांक 04.10.2017 रोजी अनुपालन सादर करण्याबाबत कळविण्यात येवूनही अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

98 ग्रंथालय विभागाने पुस्तके खरेदी प्रकियेत झालेली अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :00 स्थानिक निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 425100.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 50562.00/-

ग्रंथालय विभागाने सन 2013-14 या अर्थीक वर्षात खालील एकुण रक्कम रु.425100/- ची खरेदी केलेली आहे. खरेदी प्रक्रियेत खालील अनियमतता आढळुन आलेली आहे.1 निविदा न मागविता पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत.2 साहीत्य खरेदी संबंधी समीती स्थापन न करण्याची अनियमीतता झालेली आहे.3 खरेदी रक्कमेंवर नियमाप्रमाणे आयकर रक्कम कपात केलेली नाही.4 सहाय्यक ग्रंथालय संचालक औरंगाबाद यांच्याकडुन सन 2013-14 मधील ग्रंथालयाच्या ग्रंथ खरेदीकरीता कीती अनुदान प्राप्त झाले तसेच नियमांप्रमाणे एकुण अनुदान रक्कमेच्या कीती टक्के रक्कम ग्रंथ खरेदी करणे बंधनकारक होती याबाबतची माहीती ग्रंथालयाकडुन उपलब्ध झालेली नाही.5 किताबवाला नई दिल्ली यांचे प्रमाण रु.50562/- संचीकामध्ये आढळुन आलेली नाही. त्यामुळे पुस्तके उपलब्ध झाले कींवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही.6 पावती बुक क्र.7468 अनुक्रम 29 मधील अनामत रक्कम परत करण्यात आली कींवा कसे याबाबत नस्तीमध्ये कोणतीही नोंद घेण्यात आलेली नाही.

ग्रंथालय विभागाने सन 2013-14 या अर्थीक वर्षात खालील एकुण रक्कम रु .425100/- ची खरेदी केलेली आहे.

अनु.क्र.	खरेदी बाब	प्रकाशनाचे नांव	रक्कम
1	पुस्तके	निता बूक एजन्सी, पुणे	रु.250000/-
2	-//-	ओम सन्स बुक्स ड्रिस्ट्रीब्युटर, नई दिल्ली	रु.124538/-
3	-//-	किताबवाला, नई दिल्ली	रु.50562/-

याबाबत खालीलप्रमाणे त्रुटया आढळुन आलेल्या आहेत.

1. महाराष्ट्र शासन उद्योग व कामगार विभाग शासन क्र.भासक/1088/2512/उद्योग-6 दि 02.01.2006 अन्वये एका प्रकरणी अथवा वार्षीक गरज रु.50,000/- पैक्षा अधिक असेलतर जाहीर निवीदा मागविणे आवश्यक आहे तसेच उपपरिच्छेद 8.3 (ह) नुसार राजपत्र कींवा जास्त खपाच्या दैनिक राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहीर होणे आवश्यक होते परंतु अशी निवीदा प्रसिध्द न करता ग्रंथपालाने पुस्तके पुणे व दिल्ली येथुन खरेदी केलेली आहेत. त्यामुळे महानगरपालीकेला

दराचा लाभ न होण्याची अनियमीतता झालेली आहे.

2. साहीत्य खरेदी संबंधी समीती स्थापन न करण्याची अनियमीतता झालेली आहे.

3. खरेदी रक्कमेंवर नियमाप्रमाणे आयकर रक्कम कपात केलेली नाही.

4. सहाय्यक ग्रंथालय संचालक औरंगाबाद यांच्याकडुन सन 2013-14 मधील ग्रंथालयाच्या ग्रंथ खरेदीकरीता कीती अनुदान प्राप्त झाले तसेच नियमांप्रमाणे एकुण अनुदान रक्कमेच्या कीती टक्के रक्कम ग्रंथ खरेदी करणे बंधनकारक होती याबाबतची माहीती ग्रंथालयाकडुन उपलब्ध झालेली नाही.

5. किताबवाला नई दिल्ली यांचे प्रमाण रु.50562/- संचीकामध्ये आढळुन आलेली नाही. त्यामुळे पुस्तके उपलब्ध झाले कींवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

6. पावती बुक क्र.7468 अनुक्रम 29 मधील अनामत रक्कम परत करण्यात आली कींवा कसे याबाबत नस्तीमध्ये कोणतीही नोंद घेण्यात आलेली नाही.

DATKRPM6601 (Ref No : 95, Hmm No : 84)

99 बाजार परवाने (मालमत्ताविभाग) अंतर्गत महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडे रक्कम स्विकारणा-या कर्मचा-यांकडून तारण न घेणेबाबत

मालमत्ता / भुमी विभाग
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : मालमत्ता / भुमी विभा मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

मालमत्ता विभागात पावती पुस्तक नोंदवही अदयावत न ठेवणे, कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरी न घेणेबाबत.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-2014 चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षात मालमत्ता विभाग महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडेकरुच्या भाडेवसुलीचे काम खालील कर्मचारी यांनी रककम स्वीकारली असुन संबंधीत कर्मचा-याचे नांवे रक्कम स्वीकारण्याचे आदेश काढलेले नाहीत.

अ.क्र.	कर्मचारी नांव
1	श्री दुर्गादास त्रयंबकराव

	देशपांडे
2	श्री म गौस मोईनोद्दीन

महानगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 138 रोख रक्कम हाताळणे कर्मचारी यांचेकडुन रोख रक्कमेचा तारण किंवा नमुना 5 मध्ये वैक्तिक जमानत बंधपत्र घेणे आवश्यक असताना घेतलेले नाही. रक्कम वसुल करणेबाबत आहरण व सवितरण अधिकारी/कार्यालय प्रमुख यांनी अधिपत्याखाली कर्मचा-यांचे नांवे आदेश काढण्यात आलेले नाहीत . शासन निर्णय क्र संकीण /1011/प्र.क्र.41/कोषा/प्र.5, दि.25/09/2012 सहपत्र परिशिष्ठ 26 मध्ये कोरे पावती पुस्तके ठेवण्यात यावीत . तसेच भांडार विभागाकडुन सहा अंकी पावती पुस्तक शासकीय मुद्रणालयाकडुन न घेता स्थानिकरित्या छपाई करु न घेतलेले आहे . पावत्या प्रदान केलेल्या स्थळ प्रतीवर लाभार्थीच्या स्वाक्षरी घेतलेल्या नाहीत . कार्यालयाप्रमुखांची स्वाक्षरी घेण्यात आलेले नाही . रोखपाल कर्मचा -याकडे पावती पुस्तके ठेऊन त्यांचेकडुन पावत्या न फाडता एकपेक्षा जास्त कर्मचा -याकडे पावती बुके देण्यात आलेली आहेत. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 9(5) नुसार कार्यालया प्रमुखांकंडुन वसुल होणा -या सामान्य पावती बाबत कोणतीही नियमोचित्त कार्यवाही होत नसल्याने तसेच त्यावर सक्षम प्राधिका -यांचे नियंत्रण नसल्याचे आढळुन आले.

महानगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 9(4) नुसार त्वरीत आवश्यक्ता असल्या शिवाय संकलन कर्मचारी यांना पुर्ण वापरलेले पावती पुस्तक जमा केले शिवाय नविन पावती पुस्तके देण्यात येऊ नये. खाते प्रमुखांनी याबाबत खात्री केलेली नाही . नियम क्र.9(8) प्रमाणे पावत्यांचा दुरुपयोग केला नाही . याची खात्री कार्यालय प्रमुखांनी केलेली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी व अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 149 दिनांक 25/10/2017 अन्वये मागणी करुनही पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्या त येत आहे. तरी पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

FDAVANM6101 (Ref No : 101, Hmm No : 149)

100 बाजार परवाने (मालमत्ता विभाग) अंतर्गत महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडे रक्कम ॲक्सीस बँक मध्ये भरणा केलेली बँक स्क्रोल प्रमाणे जमा झाल्याची खात्री करणेबाबत.

मालमत्ता / भुमी विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : मालमत्ता / भुमी विभा मनपा निधी

नांदेड वाघाळा महानगरपालिका

अनियमितता कलम : ९ड

महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडेकरुच्या भाडेवसुलीची रक्कम ॲक्सीस बँक खातेक्रमांक 318010200000213 महानगरपालिका नांदेड वाघाळा खात्यात भरणा मालमत्ता विभागाने केलेली आहे. सदर जमा रक्कमेचे बँकस्क्रोल प्राप्त करुन मनपा खात्यात रक्कम जमा झाल्याची खात्री करण्यात येत नसल्याने रक्कम बँक खाती जमा असल्याची खात्री होत नाही.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013--2014 चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षात मालमत्ता विभाग महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडेकरुच्या भाडेवसुलीची रक्कम ॲक्सीस बँक खातेक्रमांक 318010200000213 महानगरपालिका नांदेड वाघाळा खात्यात भरणा मालमत्ता विभागाने केलेली आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

पुस्तक क्रमांक	चलन क्रमांक	दिनांक	रक्कम
2211	55	3.3.2014	55563
	56	4.3.2014	60360
	57	10.3.2014	33313
	58	10.3.2014	155955
	59	12.3.2014	51641
	60	18.3.2014	92208
	61	20.3.2014	8351
	62	20.3.2014	347322
	63	26.3.2014	65917
	64	30.3.2014	76166
	65	31.3.2014	157586
	66	31.3.2014	600000
	67	31.3.2014	113020
	68	31.3.2014	25018

	69	31.3.2014	491317
1741	70	01.3.2014	3800000
	71	7.3.2014	17223
	72	10.3.2014	3054
	73	11.3.2014	35239
	74	12.3.2014	11449
	75	14.3.2014	1800000
	76	14.3.2014	37794
	77	18.3.2014	14582
	78	18.3.2014	151000
	79	19.3.2014	114281
	80	20.3.2014	55502
	81	21.3.2014	78000
	82	24.3.2014	100254
	83	25.3.2014	83659
	34	26.3.2014	65328
	85	27.3.2014	103202
	86	28.3.2014	17468
	87	29.3.2014	50000
	88	31.3.2014	112567
	89	31.3.2014	105505
	90	31.3.2014	300000
	91	31.3.2014	75159
	92	31.3.2014	41447

	93	31.3.2014	415503

मालमत्ता विभागाकडे धनादेशाव्दारे भरणा केलेल्या चलनावर बँकेच्या पोच घेतलेली नाही यामुळे रक्कमा भरणा झाल्याबाबत खात्री पटत नाही . वसुली लिपीक यांनी ठेवलेल्या दैनदिन नोंद हीवर कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी नाही. मध्यवर्ती वसुली नोंदवहीस कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी नाही. सेच मागणी नोंदवहीस येणारी रक्कम , वसुल रक्कम, अखर्चीत रक्कम तपशिल नोंदवुन नोंदवहीस ार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी घेतलेली नाही. तरी स्वाक्षरी घेवुन खात्री पटवावी.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार नुपालन कामी व अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 158 दिनांक 6/10/2017 अन्वये मागणी करुनही पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे . री पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

FDAVANM6101 (Ref No : 102, Hmm No : 158)

101 बाजार परवाने (मालमत्ता विभाग) अंतर्गत महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडे रक्कम मागणी, वसुली व प्रलंबीत नोंदवही अदयावत ठेवून प्रलंबित रक्कम वसुल करणे बाबत.

मालमत्ता / भुमी विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : मालमत्ता / भुमी विभा मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

सन 2013-14 या आर्थीक वर्षातील महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडेकरुच्या 504 गाळेभाडे यांच्याकडील एकुण मागणी 10865835 पैकी एकुण वसुली 923593 नाममात्र वसुल केली असुन थकबाकी रक्कम 9942242 जून 2014 अखेर वसुल न करणे बाबत.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013--2014 चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षात मालमत्ता विभाग महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील भाडेकरुच्या भाडेवसुलीची थकबाकी खालीलप्रमाणे दिसून आली.

नांदेड वाघाळा महानगरपालिका

अ.क्र.	गाळे संख्या	एकुण मागणी	एकुण वसुली	शिल्लक थकबाकी
1	504	10865835	923593	9942242

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या मालकीची एकुण 504 गाळे भाडेतत्वावर देण्यात आलेले असून सदरील व्यापारी संकुलाचे भाडयाची थकबाकी जून -2014 अखेर रक्कम रुपये 99,42,242/- इतकी प्रलंबित आहे. महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम 1949 चे कलम 81-ब मधील तरतुदी नुसार महानगरपालिकेचे कायदेशीररीत्या येणे असलेले भाडेकिंवा कर हे दोन महिन्यापेक्षा अधिक मुदतीपर्यंत दिलेले नसल्यास अथवा थकीत असल्यास भाडेपट्टा रद्द करुन गाळा ताब्यात घेण्याचा अधिकार मनपा आयुक्तांना आहे. असे असतांना वसुलीसाठी ठोस उपाययोजना अंमलात आणलेल्या नाहीत . व्यापारी संकुलाचे थकीत गाळाभाडे वसुल न करण्यात आल्याने महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान झाले असून उत्पन्नात वाढ झालेली नाही . आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन आदेश क्र नपाप्रश/1-6/सर्वनपा/2004/944/कक्ष7 दि28.10.2004 अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम 1949 (2) अन्वये व्यापा-यास नोटीस देण्यात येवून थकबाकी रक्कम रुपये 9942242/- वसुल करुन अनुपालन सादर करावे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी व अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 150 दिनांक 25/10/2017 अन्वये मागणी करुनही पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. तरी पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

FDAVANM6101 (Ref No : 103, Hmm No : 150)

102 श्री स.मुस्तफा अली बंदे अली (लिपिक) यांनी अपहारा केलेली रक्कम वसुली बाबत.

सामान्य प्रशासन विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन 00 निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 67500.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 67500.00/-

श्री स.मुस्तफा अली बंदे अली (लिपिक) यांनी अपहारा केलेली रक्कम रुपये 67500 वसुली झालेबाबत चलन/पावती उपलब्ध करुन दिले नसल्याने झालेली अनिमियता बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक नगरसचिव विभागाचे सन 2013-14 वर्षाचे लेखापरिक्षण केले असता स्थायी समिती ठरावाची तपासणी केली असता ठरावामध्ये श्री स.मुस्तफा अली बंदे अली (लिपिक) यांचेकडे महानगरपालिका कार्यक्षेत्रात गर्भजल परिक्षण निधाणयंत्र अधिनियम 1949 अन्वये सोनोग्राफी सेंटर, जैनेटिक लॅब, जैनेटिक क्लिनिक, जैनेटिक सेंटरर्स धारकाकडुन नोंदणी करणे बंधणकारक असल्याने त्यांचे काम श्री अली यांचेकड सोपविण्यात आले होते. त्यांनी रक्कम रुपये 67500 अपहार केलेबाबत त्यांना मनपा सेवेतनु बडतर्फ करण्यात आलेले होते.

श्री स.मुस्तफा अली बंदे अली (लिपिक) यांनी नमुद शिक्षेविरुध्द स्थायी समिती सभेपुढे अपील अर्ज केलेला होता त्यास बडतर्फीचे आदेशाविरुध्द ठराव क्र.108 दि.01/12/2014 अन्वये त्यांना आयुक्तानी दिलेले बडतर्फीचे शिक्षेविरुध्द त्यांना दोन वर्षाची वेतनवाढ कायम स्वरुपाची बंद करुन त्यांना महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापीत करणेबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आलेला आहे. परंतु त्यास मनपा प्रशासनाने त्यांचेकडील पत्र क्र.नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/13840/17, दि.16/01/2017 अन्वये नगरविकास विभाग मुंबई यांना सदरील ठराव प्रशासकीय टिपनीच्याविरुध्द असुन संयुक्तिक व सनदशीर असुन ठरत नसल्याचे निर्दशनास आणुण ठराव विखंडीत करण्यास शासनास कळविण्यात आलेले आहे. दिलेले अर्धसमास पत्राचे अनुषंगाने आस्थापना शाखेने अनुपालन सादर केलेले असुन त्यात अपहार रक्कम रुपये 67500 वसुल केले बाबतची चलन/पावती सोबत जोडलेली नसल्याने श्री स.मुस्तफा अली बंदे अली यांनी अपहार केलेली रक्कम वसुल झालेची खात्री करता येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र. 137 दि.05/10/2017 अन्वये मागणी करुन ही रक्कम रुपये 67500 वसुली चलन/पावती पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 108, Hmm No : 137)

103 श्री विजय मोहन तोटावाड (लिपिक) यांनी अपहारा केलेली रक्कम वसुली बाबत.

सामान्य प्रशासन विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन 00 निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 485000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 485000.00/-

श्री विजय मोहन तोटावाड (लिपिक) यांनी अपहारा केलेली रक्कम रुपये 485000 वसुली झालेबाबत चलन/पावती उपलब्ध करुन दिले नसल्याने झालेली अनिमियता बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक नगरसचिव विभागाचे सन 2013-14 वर्षाचे लेखापरिक्षण केले असता स्थायी समिती ठरावाची तपासणी केली असता ठरावामध्ये श्री विजय मोहन तोटावाड यांचेकडे बीएसयुपी वसुली लिपिक घरकुल लाभार्थी रक्कम स्विकारणेचे काम सोपविण्यात आले होते . त्यांनी रक्कम रुपये 485000 इतकी अपहार केलेबाबत त्यांना मनपा सेवेतनु बडतर्फ करण्यात आलेले आहे.

श्री विजय मोहन तोटावाड यांनी नमुद शिक्षेविरुध्द स्थायी समिती सभेपुढे अपील अर्ज केलेला होता त्यास बडतर्फीचे आदेशाविरुध्द ठराव क्र .109 दि.09/12/2014 अन्वये त्यांना आयुक्तानी दिलेले बडतर्फीचे शिक्षेविरुध्द त्यांना दोन वर्षाची वेतनवाढ कायम स्वरुपाची बंद करुन त्यांना महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापीत करणेबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आलेला आहे . परंतु त्यास मनपा प्रशासनाने त्यांचेकडील पत्र क्र .नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/14569/17, दि.30/01/2017 अन्वये नगर विकास विभाग मुंबई यांना सदरील ठराव प्रशासकीय टिपनीच्याविरुध्द असुन संयुक्तिक व सनदशीर असुन ठरत नसल्याचे निर्दशनास आणुण ठराव विखंडीत करण्यास शासनास कळविण्यात आलेले आहे. दिलेले अर्धसमास पत्राचे अनुषंगाने आस्थापना शाखेने अनुपालन सादर केलेले असुन त्यात अपहार रक्कम रुपये 485000 वसुल केले बाबतची चलन/पावती सोबत जोडलेली नसल्याने श्री विजय मोहन तोटावाड यांनी अपहार केलेली रक्कम वसुल झालेची खात्री करता येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930सुधारणा 2011(अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र . 138 दि.05/10/2017 अन्वये मागणी करुन ही रक्कम रुपये 485000 वसुली चलन/पावती पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 109, Hmm No : 138)

104 सन 2013-2014 जावक विभाग अंतर्गत नोंदवही अ व ब अदयावत न ठेवणे, अग्रीम रक्कम खर्चाचे अनियमितते बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : जावक मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 45000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 45000.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 45000.00/-

जावक नोंदवहीस दैनदिन नोंदी घेवुन जावक पत्रव्यवहा कोणाशी केली याचा तपशील नोंदवहीस न दर्शविणे तसेच अग्रीम घेण्यात आलेली रक्कम कार्यालयात तिजोरीत न ठेवता कर्मचा-याकडे ठेवणे, पोस्टेज स्टॅम्प रक्कम प्राप्त झालेस एकाच वेळी खरेदी न करणे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका वित्तीय वर्ष सन2013-2014लेखापरीक्षण जावक विभागाचे केले असता खालील खर्च करण्यात आलेला आहे.

अ.क्र.	आदेश क्र.	दिनांक	अग्रीम कर्मचारी नांव	रक्कम रुपये
1	714	02/04/2013	संदिप पांडुरंग पोटलाचेस – लिपिक	15000
2	8818	01/08/2013	संदिप पांडुरंग पोटलाचेस – लिपिक	10000
3	2320	08/12/2013	संदिप पांडुरंग पोटलाचेस – लिपिक	10000
4	1459	-	संदिप पांडुरंग पोटलाचेस – लिपिक	10000
			एकुण खर्च रुपये	45000

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एमआयएम/100/प्र.क्र./46/2001 दिनांक 26/11/2001 नुसार पोस्टेज खर्च फ्रॅकिंग मशीन खरेदी करुन त्याव्दारे करण्यात यावा जेणेकरुन अनिय-मिततेस वाव राहणार नाही. असे असताना महानगरपालिकेने फ्रॅकिंग मशीन खरेदी न करता कर्मचा-यांचे नांवे अग्रीम रक्कम मंजुर करुन पोस्टेज खर्च करण्यात आलेला आहे.त्यामुळे रुपये 45000 खर्चावर 3% रिबिट डाक खातेचे परिपत्रक क्र.डायरेक्टर पोस्टल टेक्निक्ल पी ॲंड टी नवी दिल्ली क्र.23.8/80 सिंडी-केटेड दि.22/08/1984 अन्वये फ्रॅकिंग मशीन खरेदी करुन व मशीन मध्ये रक्कम भरणा करुन झालेल्या खर्चाच्या 3% रिबिट रुपये 1350/-प्राप्त झालेला नाही.

2.नोंदवही विहित प्रपत्र अ व ब मध्ये ठेवण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी व अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्रक्रमांक 186 दिनांक 16/11/2017 अन्वये

मागणी करुनही पुर्तता सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

FDAVANM6101 (Ref No : 129, Hmm No : 186)

105 सन 2013-14 पाणीपुरवठा टँकर नोंदवहीतील अनियमीतता.

पाणीपुरवठा विभाग
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2013-14 पाणीपुरवठा टँकर नोंदवहीतील अनियमीतता.

1. महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 चे लेखापरीक्षण केले असता , माहे 2014 ची टँकर पाणीपुरवठा नोंदवहीत पाणीपुरवठा करावयाची तारीख व वेळ या कॉलम मध्ये माहीती भरली नसुन सदरील नोंदवहीत रक्कमेचा कॉलम नसुन कीती रक्कम भरली याचा बोध होत नाही . तसेच नोंदवहीत पैसे भरल्याची पावती क्रमांक व दिनांक नमुद नसुन कीती रक्कम भरली हे दर्शविलेले नाही. नोंदवहीत दिनांक निहाय एकुण कीती रक्कम जमा झाली याचा ताळमेळ होत नाही संपुर्ण नोंदवही अद्यावत दर्शवुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

2. माहे मार्च 2014 मध्ये खाजगी पिण्यासाठी 08 टँकर देण्यात आल्याची नोंद आहे परंतु त्याची किती रक्कम जमा झाली हे न द र्शविल्यामुळे ताळमेळ दिसुन येत नाही . तसेच सदरील टँकरच्या पावत्या मागणीधारकाचे अर्ज , मनपा समिती ठराव इत्यादी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत

स्मरणपत्र क्रमांक 110 दिनांक 22/08/2017 अन्वये मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात आला आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन सादर करावे.

DATKYKM6301 (Ref No : 68, Hmm No : 94)

106 पाणीपुरवठा विभाग तुरटीचा ग्रेड 1 सन 2013-14 च्या अनियमीततेबाबत

पाणीपुरवठा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 9430.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 9430.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 9430.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 9430.00/-

पाणीपुरवठा विभागातील तुरटीचा ग्रेड-1 सन 2013-14 पुरवठा आदेश क्र.569/12 दि.10.09.2012 अन्वये मे सार्क केमिकल्स औरंगाबाद यांना रुपये 8200 प्रती मेट्रीक टना प्रमाणे 454 टन मेट्रीक 17 पुरवठा आदेश देण्यात आलेले असून तुरटीचा पुरवठा 453 टन मेट्रीक 02 पुरविण्यात आलेला आहे. तुरटीची खरेदी आणि पुरवठा यामध्ये 1.15 मे. टन तुरटीचा फरक असून 1.15 मे.टन तुरटी कमी पुरविण्यात आलेली असून खरेदी आदेशानुसार संपूर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे. त्यामुळे 1.15 मे.टनाची रक्कम रुपये 9430 जास्तीची प्रदान झालेली आहे.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 चे लेखापरीक्षण केले असता पाणीपुरवठा विभागातील तुरटीचा ग्रेड-1 सन 2013-14 पुरवठा आदेश क्र.569/12 दि.10.09.2012 अन्वये मे सार्क केमिकल्स औरंगाबाद यांना रुपये 8200 प्रती मेट्रीक टना प्रमाणे पुरवठा देण्यात आलेला आहे. तसेच त्यांचा तिमाही मागणी पुरवठा खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	तिमाही मागणी	पुरवठा मेटन .	शेरा

1	एप्रील,मे,जुन	टन .मे 200	
2	जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर	टन .मे 120	
3	ऑक्टोबर,नोव्हेंबर,डिसेंबर	टन .मे 320	
4	जानेवारी,फेब्रुवारी,मार्च	टन .मे 60	
एकुण		टन .मे 700	

वरील प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेले असुन प्रत्यक्षात मे सार्क केमीकल औरंगाबाद यांच्या मार्फत खालीलप्रमाणे पुरवठा करण्यात आलेला आहे.

अ.क्र.	पुरवठा दिनांक (प्रमाणे साठानोंदवही)	डिसी नंबर	दिनांक	एकुण प्राप्तसाठा मे . टन	वितरीत
1	25.04.2013	019	24.4.2013	16.टन .मे 04	16.टन .मे 04
2	29.04.2013	021	28.4.213	18.टन .मे 06	18.टन .मे 06
3	01.5.13	019	30.04.13	18.टन .मे 82	18. .मे 82टन
4	03.5.13	22	02.5.13	17.टन .मे 40	16.टन .मे 83
5	06.5.13	022	-	17.टन .मे 07	17.टन .मे 07
6	06.5.13	021	-	20.टन .मे 16	20.टन .मे 16
7	20.7.13	29	18.7.13	20.टन .मे 00	20.टन .मे 00
8	21.7.13	30	20.7.13	20.टन .मे 06	20.टन .मे 06
9	24.7.13	32	23.7.13	16.टन .मे 075	16.टन .मे 075

10	28.7.13	33	27.7.13	16.टन .मे 055	16.टन .मे 055
11	1.8.13	35	31.7.13	16.टन .मे 070	16.टन .मे 070
12	1.8.13	34	30.7.13	16.टन .मे 085	15.टन .मे 815
13	3.8.13	37	2.8.13	20.टन .मे 07	20.टन .मे 07
14	4.8.13	39	3.8. 13	20. 05मेटन .	20.टन .मे 05
15	4.8.13	40	4.813	19.टन .मे 05	19.टन .मे 05
16	30.9.13	202	28.9.13	17.टन .मे 170	16.टन .मे 72
17	30.9.13	203	29.9.13	20.टन .मे 11	19.टन .मे 41
18	09.10.13	207	8.10.13	16.टन .मे 01	16.टन .मे 01
19	9.10.13	208	8.10.13	16.टन .मे 08	16.टन .मे 08
20	15. 10.13	212	14.10.13	20.टन .मे 14	2014. मेटन .
21	15.10.13	211	14.10.13	21.टन .मे 120	21.टन .मे 120
22	16.3.2014	9651	15.3.13	25.टन .मे 130	25.टन .मे 130
23	20.03.2014	9652	19.3.13	16.टन .मे 07	16.टन .मे 07
24	26.3.14	9653	25.3.13	16.टन .मे 07	16.टन .मे 07
25	27.3.14	9654	26.3.13	16.टन .मे 06	16.टन .मे 06
एकुण				454.टन .मे 17	453.टन .मे 02

वरील प्रमाणे तुरटीचा पुरवठा करण्यात आला असुन वितरीत करण्यात आला आहे. तसेच पुरवठा व वितरीत यातील फरक 1.15 मे. टनाने कमी केलेला आहे. तसेच मंजुर दर रुपये 8200 प्रती मे.टन प्रमाणे

1.15 मे.टनाची रक्कम रुपये 9430 जास्तीची प्रदान झालेले आढळुन आलेले आहे तसेच तुरटी ग्रेड-1 रसायन साठी नोंदवही तपासली असता दिनांक 30/09/2013 पासुन पुरवठा झाल्याच्याडिलेवरी चलन आढळुन आलेले नाहीत. त्यामुळे रसायन किती प्राप्त झाले याची खात्री करता आलेली नाही. याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अर्धसमास पत्र क्र.92/10.08.17 अन्वये कळवुन सुध्दा अनुपालन झालेले नाही. तरी रुपये 9430 वसुल करुन मनापा फंडात जमा केलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 69, Hmm No : 92)

107 कॅनॉन डिजीटल हेवीडयुटी कॉपीअर एडीव्ही-4045 (40 पीपीएम) च्या खरेदीबाबत.

पाणीपुरवठा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 421814.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 421814.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 421814.00/-

कॅनॉन डिजीटल हेवीडयुटी कॉपीअर एडीव्ही-4045 (40 पीपीएम) च्या खरेदीबाबत झालेल्या प्रदानाची अनियमितता.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 oव सन 2014-15 चे लेखापरीक्षण चालु असुन पाणीपुरवठयाचे 2013-14 चे लेखे तपासले असता वरील खरेदी केलेली दिसुन आलेली आहे त्याचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

1. पुरवठाधारकांचे नांव - श्री सेल्स कॉपोरेशन, औरंगाबाद

2 प्रमाणक क्रमांक व दिनांक- 2926 / 3.3.14 रक्कम - रु 421814/-

3. प्रशासकिय व आर्थीक मान्यता- जाक्र.नांवशमनपा/पापुवि/15923/2013 दि 7.10.2013

नांदेड वाघाळा महानगरपालिका

4. पुरवठा आदेश - जाक्र.नांवशमनपा/पापुवि/15924/2013 दि 7.10.2013

5. खरेदी दर - डिजीएसDG & Dडी यांचे दरकरार कालावधी 26.10.2013 ते 25.12.14 रु 100/- मुद्रांकावर

6. बॅंक गॅरंटी - स्टेट बॅंक ऑफ हैद्राबाद शाखा औरंगाबाद

1. वरील प्रमाणे सदरील खरेदी डिजीएस DG & Dडी दिल्ली dकॅनॉन डिजीटल हेवीडयुटी कॉपीअर एडीव्ही-4045 (40 पीपीएम) यांचे मंजुर दरसुची क्रमांक /आयटी/आरसीक्यु/0413/83/2589/ 1889/दि.30.07.2012 अन्वये सदरील दर सुचीचा वैधता कालावधी 30.07.2012 ते 30.06.2013 असा असतांना आपण प्रशासकीय / आर्थीक मान्यता व पुरवठा आदेश 7.10.2013 अन्वये डिजीटल हेवीडयुटी कॉपीअर एडीव्ही -4045 ची खरेदी करण्यात आलेली आहे जेकी नियमबाहय आहे त्यास स्थायी समीतीची मंजुरी आदेश लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

2. डिजीएस DG & Dडी दिल्ली दरकाराप्रमाणे शेडुयल्ड बी प्रमाणे 50 टक्के रक्कम अगावु भरावी व पुरवठा सुस्थीतीत झाल्यानंतर पुरवठा झाल्यानंतर 50 टक्के रक्कम भरण्याचे नमुद असतांना आपण 100 टक्के अगावु रक्क्म प्रदान केली असुन नियमाप्रमाणे नियमबाहय आहे . तसेच अंतीम देयक व भरणापावती लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

3. कॅनॉन डिजीटल हेवीडयुटी कॉपीअर एडीव्ही-4045 व इतर तत्सम साहित्य प्राप्त झाल्याचे नोंद जड संग्रह नोंदवही लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच कॅनॉन कंपनीचे कॅटलॉग वारंटी कार्ड व इतर कागदपत्रे लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

वरील कागदपत्रे लेखापरीक्षणांस कागदपत्रे उपलब्ध् करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक111 दिनांक 22/08/2017 अन्वये कळवून सुध्दा लेखे उपलब्ध झाले नाहीत करिता महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 70, Hmm No : 111)

108 सन 2013-14 या वर्षातील खर्चाच्या प्रमाणकांबाबत.

पाणीपुरवठा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1177191.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1177191.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1177191.00/-

सन 2013-14 या वर्षामध्ये मे. सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांचे देयकामध्ये रक्कमेत खाडाखोड करण्यात आलेली असून खाडाखोड सक्षम प्राधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केली नाही तसेच महावितरणची देयके अदा केली असल्याची भरणा पावती देयकासमवेत जोडली नसलेबाबत.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 चे लेखापरीक्षण चालु असुन पाणीपुरवठयाचे 2013-14 चे लेखे तपासले खालील प्रमाणे अनियमीतता आढळून आलेली आहे.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	प्रदानाचा तपशिल	रक्कम	त्रुटी
1	94	09.10.13	मे.सार्के केमीकल्स औरंगाबाद	रु 990101/-	1.सोबत मंजुरी आदेश जोडलेले नाही 2.देयकात खाडाखोड असुन स्वाक्षरी नाही
2	164	27.12.13	म रा वि कंपनी नांदेड (विसावा झोन अंतर्गत)	रु 36590/-	1.म रा वि कंपनीचे विद्युत देयक व भरणा पावती जोडलेली नाही.
3	163	27.12.13-	म रा वि कंपनी नांदेड (वजीराबाद झोन)	रु 149700/-	1.म रा वि कंपनीचे विद्युत देयक व भरणा पावती जोडलेली नाही.

1. मे .सार्क केमीकल्स औरंगाबाद यांचे रक्कम रुपये 9,90,101/- रक्कमेचे रसायन पुरवठयाचे देयक प्रमाणक क्रमांक 94 दिनांक 09/10/2013 अन्वये अदा करण्यात आलेले आहे. त्यासोबत सक्षम प्राधिकारी यांचे मंजूरी आदेश व स्थायी समितीचे ठरावाची प्रत देयकासमवेत जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरील देयक अदा करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेण्यात आली किंवा नाही याबाबत खात्री पटविता आली नाही. तसेच देयकातील रक्कमेमध्ये खाडाखोड करण्यात आलेली असून सदरील खाडाखोड सक्षम प्राधिका-

यांच्या सहीने साक्षांकित करण्यात आलेली नाही.

2. महावितरण कंपनीचे विसावा झोन अंतर्गतचे विदुयत देयक रक्कम रुपये 1,49,700/- हे प्रमाणक क्रमांक 163 दिनांक 27/12/2013 अन्वये अदा करण्यात आले असून सदरील विदयुत देयकासमवेत देयक भरणा केल्याची पावती सोबत जोडण्यात आलेली नाही त्यामुळे देयकाची रक्कम अदा केली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

3. महावितरण कंपनीचे विसावा झोन अंतर्गतचे विदुयत देयक रक्कम रुपये 39,590/- हे प्रमाणक क्रमांक 164 दिनांक 27/12/2013 अन्वये अदा करण्यात आले असून सदरील विदयुत देयकासमवेत देयक भरणा केल्याची पावती सोबत जोडण्यात आलेली नाही त्यामुळे देयकाची रक्कम अदा केली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन करणेकामी अर्धसमास पत्र क्रमांक 106 दिनांक 18/08/2017 अन्वये कळवून सुध्दा अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. करिता परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 74, Hmm No : 107)

109 सन 2013-14 ची स्थानिक संस्था कराची व्यापारी प्रतिष्ठाणचे नोंदवहीत झालेल्या अनियमितता.

स्थानिक संस्था कर विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर वि मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

सन 2013-14 या वर्षामध्ये स्थानिक संस्था कर विभागातील व्यापारी प्रतिष्ठाणच्या नोंदवहया प्रमाणित केलेल्या नसून व्यापा-यांचा स्थानिक संस्था कर वर्षनिहाय किती भरला व किती शिल्लक आहे याचा तपशिल नसून करनिर्धारण अल्प प्रमाणात होत असून जलदगतीने होणे आवश्यक आहे.

सन 2013-14 वर्षातील स्थानिक संस्था कर विभागाची व्यापारी प्रतिष्ठणच्या नोंदणीच्या नोंदवही अनु क्र. 01 ते 13 तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता झाल्याचे आढळुन आलेले आहे.

1. सदरील नोंदवहीत अनु.क्र.01 ते 7949 असे एकुण 7949 व्यापारी प्रतिष्ठाणच्या नोंदी केलेल्या आहेत.

2. स्थानिक संस्था कर विभागाचे व्यापारी प्रतिष्ठाणच्या नोंदणीच्या नोंदवहया हस्तलिखीत ठेवण्यात आलेल्या असून सक्षम अधिका-याच्या सहीने नोंदवहया प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच प्रत्येक पानावर अनुक्रमांक नमूद केलेले नसून मनपाचा गोल शिक्का उमठविण्यात आलेला नाही.

3. सदरील नोंदवहीत व्यापा-याचा फक्त वैयक्तीक तपशिल भरण्यात आलेला असुन व्यापा-यांनी कोणत्या वर्षापासुन LBT भरला व किती शिल्लक आहे याचा तपशिल दिसुन येत नाही.

4. सदरील नोंदवही वरुन कोणत्या वर्षापासुन किती व्यापा-यांचे कर निर्धारण (Assessment) केले व कोणत्या वर्षाचे करनिर्धारण करवयाचे बाकी आहे. याची वर्षनिहाय माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

5. सदरील नोंदवहीत करनिर्धारणाची किती रक्कम भरली व किती रक्कम भरावयाची शिल्लक आहे याचा ताळमेळ दिसुन येत नाही.

6. वरील नोंदवहयावरुन व्यापा-यांचे करनिर्धारण अत्यंत अल्प होत असून ते जलदगतीने व जास्तीत जास्त स्थानिक संस्था कराची रक्कम मनपा फंडात भरण्यात आली नसल्याचे दिसून येते.याबाबत कार्यवाही होत नसल्याने मनपा आर्थिक नुकसान होत आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन करणेकामी अर्धसमास पत्र क्रमांक 167 दिनांक 02/11/2017 अन्वये कळवून सुध्दा अनुपालन झाले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 114, Hmm No : 167)

110 सन 2013-14 मधील विवीध लेखाशिर्षाखालील रक्कमांसाठी एकाच पावतीवर रक्कम स्विकारल्या बाबतची अनियमीतता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 95

सन 2013-2014 मध्ये विभागाकडुन रहिवास व वाणीज्य प्रयोजनार्थ करण्यात येणा-या बांधकाम प्रस्तावांना शासन निर्देशाप्रमाणे विकास शुल्क व इतर फी यांची आकारणी करुन बांधकाम परवानगी देण्यात येते. संबंधीताकडुन देय होणारे विकास शुल्क व इतर फी रक्कमांचा भरणा लेखा (रोखपाल) विभागाकडे करण्यात येवुन लेखा विभागाकडुन सामान्य पावती देण्यात येते. अविरत शाखेने बांधकामा बाबतचे विवीध शुल्क जसे, विकास शुल्क, भुविकास शुल्क, प्रशमन चार्जेस, हार्डशिप प्रिमीयम, स्थानिक संस्थाकर, अनामत रक्कम, कंपाऊंडीग चार्जेस ईत्यादी बाबींसाठी केवळ एकच सामान्य पावतीवर सर्व शुल्क् नमुद करुन पावती संबंधीतास अदा केली आहे. सदर पावतीचे चलन करतेवेळेस यातील वेगवेगळया रक्कमा वेगवेगळया चलनाव्दारे बँक खात्यात भरण्यात आलेली आहेत. महानगरपालीकेने प्रशमन शुल्क / गुंठेवारी विकास रेखांकन निहाय स्वतंत्र लेखाशिर्षात जमा करुन स्वतंत्र रोख वही महानगर पालीकेने परिरक्षीत केलेली नाही यामुळे विकास शुल्क थेट मनपा निधीत जमा झाले किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे सन 2013-14 चे लेखापरीक्षण उपलब्ध केलेल्या अभिलेख्याची पडताळणी केली असता सदर विभागाकडुन रहिवास व वाणीज्य प्रयोजनार्थ करण्यात येणा-या बांधकाम प्रस्तावाना शासन निर्देशाप्रमाणे विकास शुल्क व इतर फी यांची आकारणी करुन बांधकाम परवानगी देण्यात येते. संबंधीताकडुन देय होणारे विकास शुल्क व इतर फी रक्कमांचा भरणा लेखा (रोखपाल) विभागाकडे करण्यात येवुन लेखाविभागाकडुन सामान्य पावती देण्यात येते . अविरत शाखेने बांधकामा बाबतचे विवीध शुल्क जसे, विकास शुल्क , भुविकास शुल्क , प्रशमन चार्जेस , हार्डशिप प्रिमीयम , स्थानिक संस्थाकर , अनामत रक्कम , कंपाऊंडीग चार्जेस ईत्यादी बाबींसाठी केवळ एकच सामान्य पावतीवर सर्व शुल्क् नमुद करुन पावती संबंधीतास अदा केली आहे . सदर पावतीचे चलन करतेवेळेस यातील वेगवेगळया रक्कमा वेगवेगळया चलनाव्दारे बँकेखात्यात भरण्यात आलेली आहेत , यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.शासन निर्देश नगरपरिषद प्रशासन संचालानालय क्र.न.प.प्र.स./विकास कामे 2005/प्र.क्र.292/32/ दि. 28.11.2005 तसेच स्थायी निर्देश क्र.34 दि.28.5.2005चे आदेश 3(फ)(ग) अन्वये विकास शुल्क रक्कमे साठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे नियंत्रण अधिनियम 2001 चे कलम (6)(1) नुसार महानगरपालीकेने प्रशमन शुल्क/गुंठेवारी विकास रेखांकन निहाय स्वतंत्र लेखाशिर्षात जमा करुन स्वतंत्र रोखवही महानगरपालीकेने परिरक्षीत केलेली नाही यामुळे विकासशुल्क थेट मनपा निधीत जमा झाले किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहीता1971 चे नियम 9 (5) नुसार लेखा विभागाकडुन वसुल होणा-या सामान्य पावत्याबाबत कोणतेही नियमोचीत कार्यवाही होत नसल्याचे आढळुन आलेले आहे . तरी लेखा विभागांने नियमांत दर्शविल्याप्रमाणे व त्याप्रमाणे ठेवावयाचे अभिलेखे यांचे अदयावत नोंद घेवुन सदर कालावधीत वापरलेली पावती पुस्तके व चलननिहाय संबंधीताने वसुल केलेल्या जमा रक्कमां उचित होवुन रक्कमां विकास शुल्क निधीत स्वतंत्र रोखवही त घेण्यात आल्याचे अधिका -यांकडुन प्रमाणीत

करुन लेखा परीक्षणांस उपलब्ध होणे आवश्यक आहे.

3. एकच सामान्य पावतीवर सर्व शुल्क आकारुन त्यातील रक्कमेबाबत वेगवेगळे चलन बनवण्यात आले व तीन वेगवेगळया बँ क खात्यात जमा करण्यात आली परीणामी वास्तवीक स्वतंत्र लेखाशिर्ष निहाय किती शुल्क जमा झाले याची पडताळणी करता आली नाही.

3. धनादेश नोंदवही अभावी महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहीता 1971 मधील नियम46(5)47 ते 50 नुसार व महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहीता 2011 मधील 98,100,186ते188 नुसार कोणतेही कार्यवाही केलेली नाही.

4. रोखवही आभावी बँकस्क्रॉलशी ताळमेळ घेता आला नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 198 दिनांक16/11/2017 नुसार संबंधित विभागास अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु अनुपा लन् प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

MUMARAM8201 (Ref No : 140, Hmm No : 198)

111 आग्निशमन सेवा फी आकारणी करुन वसुल कार्यवाही न केल्याने झालेल्या नुकसानी बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0300 शासन निधी
अनियमितता कलम : 9ड

01. आग्निशमन सेवा फी ची शासन निर्देशानुसार आकारणी केलेली नाही.

महानगरपालिका नांदेडचे सन 2013-14 चे लेखापरिक्षणात आग्निशमन सेवा फी आकारणी चे नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.
यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील प्रकरण चार अन्वये नमुद केलेले कलम 11 ते 16 नुसार महानगरपालीकेने अधिनियम अनुसुची-2 मध्ये नमुद केलेल्या विहीत दराने वेगवेगळया प्रकारच्या सर्व इमारती व त्यांच्या मालकांवर अग्निशमन सेवा फि जी राज्यशासनाच्या पूर्वमंजुरीने आकारावयाची आहे.

तथापी ,सन2013 - 14अखेर पर्यंत महानगरपालीकेने उपरोक्त अधिनियमामतील तरतुदीनुसार हददीतील झालेल्या इमारत बांधकाम तसेच प्रस्तावित होणा-या इमारत बांधकाम परवानगी संदर्भात शासनाकडून विहीत दर मंजूर करुन संबंधीतावर त्याप्रमाणे आकारणी करुन अग्निशमन सेवा फी वसुलात आणण्याची कोणतीही कार्यवाही केल्योच आढळुन येत नाही .यामुळे अग्निशमन सेवा फि उभारणीचा मुळ उददेश साध्य झालेला नाही .तसेच उपरोक्त फि वसुल न झाल्याने महानगरपालीकेचे मोठया प्रमाणावर आर्थीक नुकसान होत आहे.

तरी उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्वलक्षी प्रभावाने शासनाकडुन मंजुर केलेल्या विहीत दराने अग्निशमन सेवा फि आकारणी करुन वसुलात आणल्याचे अनुपालन दर्शवावे.

DATRWPM6401 (Ref No : 87, Hmm No : 98)

112 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधी खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी
अनियमितता कलम : 95

01. शासन निर्देशानुसार स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले नाही.02. सुरक्षा निधीची रक्कम साधनसामुग्रीवर खर्च न करता इतर बाबीवर करण्यात आलेला आहे.

महानगरपालिका नांदेडचे सन 2013-14 चे लेखापरिक्षणात आग सुरक्षा निधीचे नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना अधिनियम 2006 कलम 25 तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.704/अस दि.23.09.2009 नुसार अग्निशमन सेवा विकसीत करण्यासाठी आग सुरक्षा निधी (Fire Protection Fund) निर्माण करणे नागरि स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक असतांना स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येवून त्यांचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही.
2) अग्निशमन कर मालमत्ता धारकांकडुन झोन निहाय वसुल करण्यात येतो व आग सुरक्षा निधीमध्ये जमा करण्यात येतो .परंतु सदर निधी हा अत्याधुनिक साधन सामग्री व उपकरणे यांवर खर्ची न करता काही प्रमाणांत वेतनांवर खर्च करण्यात येतो तसेच इतर बाबींवर हा निधी जास्त प्रमाणावर खर्च करण्यात आल्याचे निर्दशनास येते .उदा .सन2013 - 14मधील खालील बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे.

नांदेड वाघाळा महानगरपालिका

अनु.	धनादेश क्र/.दिनांक	रक्कम	शेरा
1	4737दि04 .04.2013	रु438396 /-	
2	294415दि04 .05.2013	रु429774 /-	
3	294416दि15 .05.2013	रु39709 /-	
4	244414दि04 .05.2013	रु18000 /-	अध्यक्ष यांच्या नांवाने पासबुकातील नोंदणी नुसार
5	294618दि06 .06.2013	रु7500 /-	
6	294619दि06 .06.2013	रु6500 /-	
7	294420दि08 .06.2013	रु8500 /-	
8	294381दि26 .06.2013	रु251280 /-	
9	रोखीने26 .06.2013	रु14601 /-	
10	294385दि20 .07.2013	रु61017 /-	
11	294384दि20 .07.2013	रु17701 /-	
12	294386दि23 .07.2013	रु425180 /-	
13	294389दि26 .07.2013	रु10000000 /-	आयुक्त खाते क्र.213
14	294387दि26 .07.2013	रु68239 /-	Axis Bank
15	294388 दि30 .07.2013	रु23495 /-	Axis Bank
16	294399दि03 .08.2013	रु12000000	आयुक्त खाते क्र.213
17	294392दि28 .08.2013	रु26193 /-	Vijaya Bank
18	294391 दि28 .08.2013	रु19464 /-	Vijaya Bank
19	29493दि03 .9.2013	रु431098 /-	Vijaya Bank
20	294383दि06 .09.2013	रु6992 /-	Sbh
21	294395 दि26 .09.2013	रु10000000 /-	आयुक्त खाते क्र.213
22	294396दि19 .10.2013	रु77920 /-	BM Axis Bank
23	294341 दि13 .11.2013	रु174400 /-	BM Axis Bank
24	294343दि27 .11.2013	रु11320 /-	Vijaya Bank
25	294342दि27 .11.2013	रु11320 /-	Vijaya Bank
26	294344दि29 .11.2013	रु580000 /-	आयुक्त खाते क्र.1458
27	294345दि11 .12.2013	रु153840 /-	आयुक्त खाते Axis Bank
28	294348दि31 .12.2013	रु38981 /-	Axis Bank
29	दि03 .01.2014	रु453709 /-	P O Upload
30	294351 दि24 .01.2014	रु125160 /-	Axis Bank
31	294352दि25 .01.2014	रु15140 /-	Vijaya Bank
32	294355दि13 .02.2014	रु200000 /-	आयुक्त खाते क्र.236
33	294354दि05 .02.2014	रु1760 /-	Axis Bank
34	294353दि05 .02.2014	रु3960 /-	Axis Bank

35	294356दि12 .02.2014	रु1110000 /-	आयुक्त खाते क्र.9236
36	रोखीने दि03 .03.2014	रु12477 /-	आयुक्त खाते क्र.9236
37	294358दि03 .1.2014	रु149640 /-	Axis Bank
38	294359दि11 .03.2014	रु12000000	आयुक्त खाते क्र.236
39	294360दि12 .03.2014	रु26000000	आयुक्त खाते क्र.236

उपरोक्त खर्च अग्नीशमन सेवा विकसीत करणे करीता केलेला आढळुन येत नाही .याबाबत खुलासा सादर करावा .

DATRWPM6401 (Ref No : 88, Hmm No : 108)

113 अग्निशमन विभागातील लेखे रोजच्या रोज बंद ना करणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :0000 स्थानिक निधी
अनियमितता कलम : 9ड

01.जमा संकलन नोंदवही प्रमाणीत केलेली नाही.02. रोखवहीत सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरी नाहीत.03. गोषवारे काढण्यात आलेली नाही.

महानगरपालिका नांदेडचे सन 2013-14 चे लेखापरिक्षणात अग्नीशमन विभागातील रोखपुस्तीकेची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.
यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) जमा संकलन नोंदवही महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहीता 1971मधील नियम क्र.33)2.क्र नमुना (12 विहीत नमुन्यात नसुन ती प्रमाणीत केलेली नाही.
2) महाराष्ट्र नगरपालीका लेखासंहीता 1971 मधील नियम क्र.33 ,34 ,35 व 51 नुसार नोंदवहीमधील लेखे प्राधिकृत अधिका-यांच्या स्वाक्षरीने रोजच्या रोज बंद केले जात नाही तरी जमा संकलन नोंदवहीतील दिवसअखेर जमा झालेला महसुल अक्षरी व अंकी स्वरुपात रोजच्या रोज प्राधिकृत अधिका-यांच्या सहीने रोजच्या रोज बंद होणे आवश्यक आहे .
3) नोंदवहीमधील जमा रक्कमांचा मासिक गोषवारा काढलेला नसुन वार्षीक गोषवारे प्रमाणीत केले नसल्याने झालेल्या एकुण फि चा भरणा बरोबर असल्याची तपासणी करता आली नाही तरी विभागाने याबाबत वसुल झालेल्या रक्कमां बरोबर व अचुक असल्याची खात्री करावी.

DATRWPM6401 (Ref No : 89, Hmm No : 97)

114 केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील अग्नीशमन व आणीबाणी सेवेचे बळकटीकरण करण्यामधील अखर्चीत रकमा

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 2197885.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2197885.00/-

01.अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आली नाही.

नांदेड महानगरपालिकेकरीता केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील अग्नीशमन व आणीबाणी सेवेचे बळकटीकरण करण्याबाबत केंद्रं हिस्सा रु.1648410/- धनादेश क्रमांक 132741 दिनांक 31.05.2013 व राज्यं हिस्सा रु .549475/- धनादेश क्रमांक 134742 दिनांक 31.05.2013 एकूण रु.2197885/- अनुदान प्राप्तं झाले आहे. त्यापैकी खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

अ.क्र.	कंपनीचे नांव	धनादेश क्र.दि.	रक्कम
1	Solaroy Engineenrs pvt ltd	248776	रु. 1003500/-
2	Babolott Associates Pune	31.10.2013	रु 1060000/-
3	Fitech Equipments (i) Pvt Ltd	24877	रु. 104400/-
4	Tata Motors Ltd Thane	531.10.2013	रु 475626/-
5	Vijay Fire Vehicles & Pumps Ltd	248809	रु. 425300/-

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. एकुण अनुदान रु.2197885/- प्राप्त झाले असुन त्यापैकी रु.2168826/- खर्च झालेला आहे उर्वरीत रक्कम रु.29059/- अखर्चीत शिल्लक आहे. सदर रक्कम शासनास जमा करुन अनुपालन सादर करण्यात यावे . तसेच केंद्र शासनाकडुन व राज्य शासनाकडुन प्राप्त झालेल्या रक्कमांचे विनीयोग प्रमाणपत्र सादर केल्याचे संचिकामध्ये आढळुन आलेली नाही.

115 नांदेड महानगर पालिकेसाठी संगणक प्रणाली विकसीत करण्यासाठी अदा केलेल्या देयकातून आयकराची रक्कम कमी वसूल करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :0000 शासन निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 5706614.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 5706614.00/-

01.आयकराची कपात कमी दराने करण्यात आली आहे.

महानगरपालीका नांदेडचे सन 2013-14 या वित्तीय वर्षामधे मध्ये संगणक विभागातील खालील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. रोख पुस्तकांची पडताळणी केली असता खालिल बाबीवर आयकर कमी कपात केलेला आहे.

अ.क्र.	व्हाऊचर क्रंमाक/ दिनांक	फर्मचे नांव	देयकाची रक्कम	आयकर कपात	एकुण
1	1/4.5.13	M/s. Aumetrix Nanded	150000/-	3000/-	147000
2	2/ 4.5.13	M/s Vision tech Solution Aurangabad	852000/-	17040/-	254934
3	3/3.7.13	M/s. Aumetrix Nanded	16200/-	-	16200
4	4/20.8.13	M/s Siddhi core And Multimedia service Nanded	215000/-	4300/-	210700
5	5/13.9.13	M/s Daccess Security System Pvt Ltd. Pune	1256800/-	25136/-	1231664
6	6/13.9.13	M/s. Aumetrix Nanded	75000/-	1500/-	73500
7	7/13.9.13	M/s M N Enterprises Nanded	81300/-	1626/-	79674
8	8/24.9.13	M/s Fortech Computer Pune	153085/-	3061/-	15024
9	9/4.10.13	M/s Vatsal Enterprises Nanded	49950/-	999/-	48951

10	10/7.10.13	e-space communication nanded	660000/-	-	660000
11	11/17.10.13	Vyamtech Technology Delhi	1836453/-	36435/-	1800018
12	12/18.10.13	M/s. Aumetrix Nanded	75000/-	1500/-	75300
13	13/30.10.13	Shri satish Kalaskar (Advance)	48000/-	-	48000
14	14/1.11.13	Shri s p pantange (advance)	84000/-	-	84000
15	15/6.11.13	M/s. Aumetrix Nanded	37275/-	746/-	36529
16	16/6.11.13	M/s Softech Engineer Pvt Ltd.	250000/-	5000/-	245000
17	17/6.11.13	M/s Siddhi core And Multimedia service Nanded	130000/-	2600/-	127400
18	18/11.12.13	M/s Siddhi core And Multimedia service Nanded	65000/-	1300/-	63700
19	19/23.12.13	M/s Siddhi core And Multimedia service Nanded	224000/-	4480/-	219520
20	20/12.3.14	Fountain Head Info Solution Pvt Ltd Mumbai	275000/-	5500/-	269500
		Total			**5706614**

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

2) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 (जे) मधील तरतुदीनुसार तांत्रीक सेवा ही व्यावसायिक फी मध्ये समाविष्ठ असल्याने 10% आयकर आकारल्या जातो परंतु देयकांतुन 2 टक्के आयकर कपात केलेला आहे . परंतू उपरोक्त प्रमाणके / नस्त्यां लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्यामुळे कपात करण्यात आलेली आयकराची रक्कम योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

DATKRPM6601 (Ref No : 97, Hmm No : 112)

116 विदयुत विभागाने सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची मागील थकबाकी / व्याज अदा न केल्यामुळे आकारण्यात येत असलेल्या थकबाकी /व्याजामुळे महानगरपालिकेच्या होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 02

नांदेड वाघाळा महानगरपालिका

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 7671390.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7671390.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 7671390.00/-

विभागाने देयके विहित मुदतीत अदा न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान तसेच परिस्थिती बिकट असताना दायित्वामध्ये वाढ झालेली आहे.

नांदेड-वाघाळा महानगरपालिका , नांदेड सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे विदयुत विभागाने क्रमांक 01 ते 06 मधील निवडक महिन्यातील भरणा केलेल्या वीज बिल देयकाची देयके बिलावरुन नोंदवहीशी तपासणी केली असता ,खालील तक्त्यात नमूद केलेल्या काही निवडक उदाहरणावरून वीज वितरण कंपनीने विभागाला दिलेल्या वीज देयकामध्ये ब -याच प्रमाणात बिलामधील चालू महिन्यातील देयकाची रक्कम अदा केली असून मागील थकबाकी / व्याज अदा न केल्यामुळे वीज वितरण कंपनीने देयकावर मागील थकबाकी / व्याज आकारलेले न भरल्याचे दिसून येते हे स्पष्ट होते.

झोन क्रमांक 01

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1	900060001881	27/02/14	73925	20098	1863	95890	1870	94020
2	900010027293	27/02/14	69220	696	12264	82180	12270	69910
3	900010028460	27/02/14	6041	20672	2071	28790	2080	26710
4	900010028940	27/02/14	56315	3859	25168	85340	25170	60170
5	900010027234	27/02/14	0	38364	4324	42690	4330	38360
6	900010028389	27/02/14	99471	11229	12053	122750	12060	110690
7	900010027242	27/02/14	351344	146052	8197	505590	8190	497400
8	900010028117	27/02/14	78169	37069	6028	121270	6030	115240
9	900010028753	27/02/14	344050	71609	6861	422420	6860	415560
	एकुण		1078535	349648	78829	1506820	78860	1428060

झोन क्रमांक 02

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1	900010028532	27/02/14	56912	5502	7140	69560	7150	62410
2	900010027960	27/02/14	15705	3236	3529	22460	3520	18940
3	900010027943	27/02/14	31102	2806	644	34550	650	33900

4	550011152180	27/02/14	103997	14417	8886	127300	8886	118414
5	550013040761	27/02/14	25348	781	2159	28290	2160	26130
6	900010028265	27/02/14	65519	5799	7228	78550	7230	71320
7	550013040702	27/02/14	77762	2744	5279	85790	5280	80510
8	900010027889	27/02/14	28131	1434	5261	34830	5270	29560
9	900010027846	27/02/14	30178	5126	2367	37670	2360	35310
10	900010027722	27/02/14	40759	529	9487	50780	9490	41290
11	900010027552	27/02/14	73428	12513	1691	87630	1690	85940
12	900010028273	27/02/14	23246	796	460	24500	460	24040
13	900010027871	27/02/14	43399	2983	913	47300	920	46380
14	900060001856	27/02/14	110309	32664	1768	144740	1768	142972
15	900010027994	27/02/14	18766	3774	7131	29670	7120	22550
16	900010028672	27/02/14	25294	1711	3838	30840	3840	27000
17	900060002020	27/02/14	76836	6567	5681	89090	5681	83409
18	900010027692	27/02/14	19568	1843	2347	23760	2350	21410
19	900010028575	27/02/14	228398	33106	15044	276550	15050	261500
	एकुण		**1094657**	138331	90853	1323860	90875	1232985

झोन क्रमांक 03

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1	900010014094	01/03/14	13975	596	13252	27820	13250	14570
2	900010014035	01/03/14	25963	689	12896	39550	12900	26650
3	900010014205	01/03/14	16596	884	7911	25390	7910	17480
4	900010014639	01/03/14	90649	29720	17215	137590	17220	120370
5	900010015121	01/03/14	44139	3382	4545	52070	4550	47520
6	900010014051	01/03/14	112120	32831	7706	153660	7710	145950
7	900010015210	01/03/14	25614	1417	10509	37540	10510	27030
8	900010014949	01/03/14	97920	16205	17982	130750	17980	112770
9	900010014400	01/03/14	69608	9189	8107	86910	8110	78800
10	900010014426	01/03/14	75086	1891	9179	65860	9180	56680
11	900010014485	01/03/14	31287	2210	1204	34710	12010	22700
12	900010014531	01/03/14	308273	98073	24043	430390	24050	406340

13	900010014647	01/03/14	101647	12853	16504	131010	16510	114500
14	900010104352	01/03/14	111089	1867	7056	120010	7060	112950
15	900010104344	01/03/14	68522	1154	6414	76090	6420	69670
16	900010104361	01/03/14	425632	5157	8204	440990	8200	432790
17	900010818096	01/03/14	25881	1462	12162	39510	12160	27350
18	900010014884	01/03/14	221419	42466	10544	274430	10550	263880
19	900010104336	01/03/14	58540	986	3870	63400	3870	59530
20	900010014922	01/03/14	49720	3242	6909	59870	6910	52960
21	900010818134	01/03/14	119193	13358	17614	150170	17620	132550
22	550018088223	01/03/14	114072	1758	7011	122840	7010	114072
	एकूण		**2192970**	**280795**	**217585**	**2672740**	**228440**	**2192970**

झोन क्रमांक 04

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1	90001001381	11/03/14 -	51729	3253	4028	59010	25500	33510
2	550010797365	11/03/14	9270	2363	9757	21390	9980	11410
3	900010013543	11/03/14	37812	2384	3334	43530	25000	18530
4	900010014272	11/03/14	110528	1580	5304	117410	50000	67410
5	900010015074	11/03/14	22089	866	3510	26470	3510	22960
6	550010797373	11/03/14	52479	3317	--	66370	25575	40795
7	900010818207	11/03/14	32422	1753	4015	38190	33960	4230
8	550018071673	11/03/14	61533	1437	5625	68600	25900	42700
9	900010013926	11/03/14	91024	42803	2484	136310	2480	133830
10	900010013829	11/03/14	86154	1707	14272	102130	40900	61230
11	900010013756	11/03/14	4440	2291	2365	9100	2370	6730

12	900010013951	11/03/14	40540	3105	7118	50760	35000	15760
13	900010015392	11/03/14	67415	2212	22428	92060	40600	51460
14	900010818169	11/03/14	64849	6463	6968	78300	30600	47700
15	900010014175	11/03/14	40596	1208	12627	54430	12630	41800
16	900010014337	11/03/14	6215	715	6557	13490	6690	6800
	एकूण		779095	77457	110392	977550	370695	606855

झोन क्रमांक 05

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1	900090004141	03/03/14	609	200	2413	3220	2410	810
2	900090004124	03/03/14	878	266	6344	7490	6340	1150
3	550012052421	03/03/14	96652	2693	14546	113890	14550	99340
4	550012052430	03/03/14	113839	1	14230	128070	100000	28070
5	950720910355	03/03/14	344270	148694	1518	494480	100000	394480
6	551110004903	03/03/14	131553	10872	5265	147690	5270	142420
7	550018102811	03/03/14	39188	428	4958	44570	4960	39610
	एकूण		**726989**	**163154**	**49274**	**939410**	**233530**	**705880**

झोन क्रमांक 06

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1	900060001473	27/02/14	55039	7160	2543	64740	2580	62160
2	900070001587	27/02/14	41365	9757	1660	52780	1680	51100
3	900060001384	27/02/14	1823	1392	2796	6010	2900	3110
4	900060001431	27/02/14	810	2146	2186	5140	2240	2900
5	900060001376	27/02/14	30234	10655	2147	43040	2420	40620
6	900070001510	27/02/14	1108	1719	2659	5490	2710	2780
7	900070001706	27/02/14	568	2826	2760	6160	2820	3340
8	900060002216	27/02/14	0	4144	3282	7430	3430	4000
9	900060001805	27/02/14	912	1969	2488	5370	2540	2830
10	900060002178	27/02/14	4900	1947	2587	9440	2650	6790
11	900070001528	27/02/14	18126	6083	4640	28850	5100	23750
12	900070001609	27/02/14	57627	11823	4800	74250	4890	69360

13	900060001481	27/02/14	39526	4237	6121	49890	6260	43630
14	900070002419	27/02/14	0	2042	1495	3540	1530	2010
15	900070001561	27/02/14	0	1675	1395	3070	1420	1650
16	90006000235	27/02/14	135654	29074	2409	167140	2420	164720
17	900060001333	27/02/14	41289	6612	3350	51250	3420	47830
18	900060001422	27/02/14	39922	1800	3920	45640	4060	41580
19	900060001449	27/02/14	50611	3732	3817	58160	3910	54250
20	900010028851	27/02/14	90056	22211	1636	13900	1640	12260
21	900010028842	27/02/14	45657	1528	6135	53320	6260	47060
	एकूण		**655227**	**134532**	**64826**	**754610**	**66880**	**687730**

झोन क्रमांक 01 ते 06 (2013-14)

अक्र	ग्राहक क्रमांक	बिल दिनांक	थकबाकी	व्याज	चालू बिल	एकुण रक्कम	भरणा रक्कम	एकुण रक्कम
			1	2	3	4	5	6 (4-5)
1.	झोन क्रमांक 1	--	1078535	349648	78829	1506920	78860	1428060
2.	झोन क्रमांक 2	--	1094657	138331	90853	1323860	90875	1232985
3.	झोन क्रमांक 3	--	2192970	280795	217585	2672740	228440	2443300
4.	झोन क्रमांक 4	--	779095	77457	110392	977550	370695	606895
5.	झोन क्रमांक 5	--	726989	163154	49274	939410	233530	705880
6.	झोन क्रमांक 6	--	655227	134532	64826	754610	66880	687730
	एकूण	--	6527473	114917	611759	8175090	1069280	7104850

यावर अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. उपरोक्त निवडक महिन्यातील देयकांची तपासणी केली असता , देयकामध्ये ब-याच प्रमाणात वीज वितरण कंपनीकडून देण्यात आलेल्या वीज बिलामध्ये व्याजाची व थकबाकीची आकारणी केलेली दिसून येते. विदयुत विभागाकडून शहरामध्ये झोन क्रमांक 01 ते 06 च्या देयकामधील रस्त्यावरील स्ट्रीट लाईट (पोलवरील लाईट) लावण्यात आलेल्या विदयुत मीटरमधील देयकातील व्याजाची रक्कम रु.1143917/- व थकबाकीची रक्कम रु .6527473/- अशी एकूण रक्कम रु 7671390/- आहे. सन 2013-2014 या आर्थिक वर्षातील एकूण व्याज व थकबाकी बाबत खात्री करून रक्कम परीगणित करावी व वीज वितरण कंपनीची व्याज व थकबाकी रक्कम तात्काळ अदा करावी जेणे करून व्याजाचा

भूर्दंड टाळता येईल . विदयुत देयके वेळेवर अदा केली असती तर थकबाकी/ व्याजाचा भूर्दंड तसेच दायित्वा मध्ये होणारी वाढ टाळता येणे शक्य झाले असते .याबाबत वेळीच योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.

2. झोन क्रमांक 01 ते 06 च्या नोंदवहीतील देयक भरणा नोंदवहया अनुक्रमाणित करुन प्रत्येक पृष्ठावर गोल मोहोर उमटवून प्रमाणित केलेल्या नाहीत.त्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

CCRVNRM6701 (Ref No : 98, Hmm No : 153)

117 सन 2013-14 अखेर मनपा लेख्यावरील अहवाल मुख्य लेखापरिक्षक यांनी मा.स्थायी समिती पुढे सादर न करणे बाबत...

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 95

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106(3) नुसार आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर संपूर्ण लेख्यावरील आपला अंतर्गत लेखापरिक्षणाचा अहवाल तयार करुन मुख्य लेखापरिक्षक यांनी मा.स्थायी समिती पुढे ठेवण्याची वैधानिक तरतुदीप्रमाणे सन 2013-14 अखेर मनपा लेख्यावरील अहवाल स्थायी समितीस सादर न करणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105 व 106 (3) नुसार महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांनी अर्थीक वर्षाच्या समाप्तीनंतर संपुर्ण लेख्या वरील आपला अतर्गत लेखापरीक्षणांचा अहवाल तयार करुन स्थायी समीतीस सादर करणे आवश्यक असल्याची वैधानीक तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी, सन 2013-14 या अर्थीक वर्षाच्या समाप्तीनंतर मुख्य लेखापरीक्षक यांनी लेख्यावरील आपला अहवाल तयार करुन स्थायी समीतीस अद्याप पावेतो सादर केलेला नाही.

1.अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्य लेखापरीक्षक यांनी लेख्यावरील अहवाल सादर न केल्यानमुळे वैधानिक तरतुदीचे पालन झालेले नाही.

2.मुख्य लेखापरीक्षक यांनी अहवाल सादर केला नसल्याने कलम 106 (1) नुसार सदरच्या वित्तीय वर्षात झालेल्या नियमबाहय / अयोग्य बाबीं वेळीच सक्षम प्राधिका-यांच्या तसेच महानगरपालिकेच्या निर्दशनास आणून न देण्याची अनियमीतता झालेली आहे.

3.कलम 106 (4) नुसार मुख्यलेखापरीक्षकांनी स्थायी समीतीसमोर सादर केलेल्या अहवालाच्या प्रती कलम 94

अन्वये नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे अर्थीक वर्षाचे प्रशासन अहवाला सोबत प्रत्येक पालिका सदस्यास पाठविणे आवश्यक आहे. मात्र अहवाल सादर झालेला नसल्याने वैधानिक तरतुदीप्रमाणे सन 2013-14 चे प्रशासन अहवाला सोबत पालिका सदस्यांना मुख्य लेखापरीक्षंकाचा लेख्यावरील अहवाल प्राप्त हऊ शकला नाही.

4.मुख्य लेखापरीक्षंक यांच्याकडुन लेख्या वरील अहवाल सादर झालेला नसल्याने महानगरपालीकेस संबंधीताकडुन नेमुन दिलेल्या कर्तव्य प्रमाणे कार्यवाही झाली अथवा कसे याबाबत माहीती प्राप्त होऊ शकलेली नाही.

5.सन 2013-14 अहवालात याबाबत अर्धसमास पत्र क्र.147 दि 24.10.2017 अन्वये आक्षेप नोंदवुन देखील मुख्य लेखापरीक्षंक यांचेकडुन लेख्यावरील अहवाल सादर न झाल्याची अनियमीतता झालेली आहे.

6.मुख्य लेखापरीक्षंक यांनी सन 2013-14 नुसार अहवाल स्थायी समीतीसमोर अहवाल सादर केला असता तर अनेक नियमबाहय झालेल्या किंवा होणा-या बाबींवर वेळीच अटकाव करता आला असता व या लेखापरीक्षंण अहवालात नमुद आक्षेपांत दर्शविण्यात आलेल्या अनियमीतता बाबत वेळीच योग्य कार्यवाही होवुन सदरच्या बाबी महानगरपालीके समोर वेळीच आणुन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्यती फलश्रृती प्राप्त झाली असती असे लेखापरीक्षणांचे मत आहे.

7.अहवाला अभावी लेखापरीक्षण कालावधीत लेख्यांची पडताळणी करतांना मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्रायानुरुप लेख्यांचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

8.मुख्य लेखापरीक्षक यांनी जा.क्र.नावाशमनपा/मुलेप/11608/2017 दि.31.10.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106(3) अन्वये महानरगपालीकेच्या सालसन 2011 व 2012-13 लेखापरीक्षण सुरु असल्याचे व अंतीम टप्यात असल्याचे व सन 2013-14 व 2014-15 या वर्षाचे लेखापरीक्षण अद्यापर्यंत प्रलंबीत असल्याचे लेखापरीक्षणांस कळविले असुन सदरची कार्यवाही अत्यंत उशीराने होत असल्याची व अधिनियमातील कलमांचे पालन होत नसल्याचे दिसुन येते.

तरी सन 2013-14 या अर्थीक वर्षाचे लेख्यांचे अहवाल वेळीच सादर न होणेबाबत अनुपालन होणे आवश्यक असुन यापुढे तरतुदीप्रमाणे प्रत्येक अर्थीक वर्ष समाप्तीनंतर विहीत वेळेत मुख्य लेखापरीक्षक यांनी अहवाल स्थायी समीतीसमोर सादर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही अपेक्षीत आहे.

सन 2013-2014 अर्धसमास पत्र क्रमांक147 दिनांक24/10/2017 अन्वये मागणी करुनही अनुपालन सादर करण्यात न आल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 104, Hmm No : 147)

118 सन 2013-14 या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापूस्तकातील अनियमितते बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : आस्थापना 00 निधी

अनियमितता कलम : 9ड

कमर्चा- यांच्या सेवापूस्तकातील अनियमितता असतांना संबंधीत कर्मचा- यांना निवृत्ती वेतन, सेवाउपदान, अंशराशीकरण मंजूर करण्यात आल्याने झालेल्या अनियमितते बाबत.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 लेखा शाखेचे उपलब्ध अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता लेखा शाखेतील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा -यांचे सेवापुस्तक व निवृत्तीवेतनाच्या संचिकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

अ.क्र.	कर्मचा-यांचे नांव व पदनाम	अनियमितता.
1	श्री.मदनसिंग दरबारसिंग वर्ग-4	1.सेवापूस्तकातील प्रथम पानावरील तपशीलात जन्म दिनांक सक्षम प्राधीकारी यांनी प्रमाणीत केलेला नाही. 2.सेवापुस्तकात जन्म तारखेचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. 3.सेवानिवृत्ती बाबत वारसदारांचे नामनिर्देशन जोडलेले नाही. 4.जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे वैदयकीय प्रमाणपत्र नाही. 5.सहाव्या वेतन आयोगाच्या दि.1.1.2006 रोजी वेतननिोश्चीतच्या नोंदीवर सक्षम प्राधीकारी यांची स्वाक्षरी नाही. 6.सेवेतदि.16.03.1993 पासून कायम करुन सेवानिवृत्तीचे लाभ दिले. परंतू सेवापुस्तकात दि.1.7.1999 पासून नोंदी आहेत.दि.16.3.93 ते 1.7.99 या कालावधीच्या सेवा तपशीलाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नसतांना त्यांना कोणत्या आधारावर दि.16.3.93 पासून सेवानिवृत्ती वेतन व इतर तत्सम लाभ दिला आहे.
2	1.प्रभाकर गणपती खानसोळे. 2.सुशीलाबाई पोटपेलवार. 3.बी.आर.थोरात.	1.सेवापूस्तकातील प्रथम पानावरील तपशीलात जन्म दिनांक सक्षम प्राधीकारी यांनी प्रमाणीत केलेला नाही. 2.सेवापुस्तकात जन्म तारखेचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. 3.सेवानिवृत्ती बाबत वारसदारांचे नामनिर्देशन जोडलेले

	4 जिजाबाई विठठल जोंधळे 5.रमाबाई मारोती बळवंते. 6.शांताबाई राजाराम 7.विदया बाळू तरटे.	नाही. 4.जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे वैदयकीय प्रमाणपत्र नाही. 5.वेतन आयोगाचा विकल्पाचा नमूना जोडलेला नाही. 6.वेतन आयोगाचे वेतननिश्चीतीचे जोडपत्र जोडलेले नाही. 7.स्थायीकरणाची नोंद घेतलेली नाही. 8.भनिनि,गवियो,निवृत्ती वेतन,सेवाउपदान,अंशराशीकरण प्रदान केल्याच्या नोंदी नाहीत.

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.वरील प्रमाणे कमर्चा -यांच्या सेवापूस्तकातील अनियमितता असतांना संबंधीत कर्मचा-यांना निवृत्ती वेतन,सेवाउपदान, अंशराशीरण मंजूर करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अर्धसमास पत्र क्रमांक 198 दिनांक 18/11/2017 अन्वये कळवून ही अनुपालन सादर केलेले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 137, Hmm No : 198)

119 सन 2013-14 वर्षात सेवानिवृत्त झालेले अधीकारी/कमर्चारी यांचे सेवानिवृत्ती

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

सेवानिवृत्त अधीकारी/कमर्चारी यांची रु.48100482 एवढी रक्कम प्रदान करावयाची बाकी आहे. तसेच नियमाप्रमाणे दरवर्षी महाराष्ट नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 100 नुसार महानगरपालिकेने अधीकारी/कमर्चा-यांच्या तीन महिन्याच्या एकूण वेतना इतका वेतन/निवृत्तीवेतन राखीव निधी उभारणे बाबत.

सन.2013-14 वर्षात सेवानिवृत्त झालेले अधीकारी/कमर्चारी यांचे प्राप्त अभीलेख्याची तपासणी केली असता एकूण 81 अधीकारी/कमर्चारी सेवानिवृत्त झालेले असून त्यांचे दि .31.03.2014 अखेर खालील प्रमाणे सेवानिवृत्ती उपदान व अंशराशीकरण प्रदान करावयाचे शिल्लक असल्याचे आढळून आलेले आहे.

अ. क्र.	सेवानिवृत्त अधीकारी/कमर्चारी	**प्रलंबीत उपदान**	प्रलंबीत अंशराशीकरण	दि.31.3.2014 अखेरचे प्रलंबीत अंशराशीकरण	एकूण प्रलंबीत रक्कम
1	2	3	4	5	6
1	81	2419581	20002222	25678639	-48100482

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.सन 2013-14 वर्षात सेवानिवृत्त अ धीकारी/कमर्चारी यांची रु .48100482 एवढी रक्कम प्रदान करावयाची बाकी आहे. तसेच नियमाप्रमाणे दरवर्षी महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 100 नुसार महानगरपालिकेने अधीकारी/कमर्चा-यांच्या तीन महिन्याच्या एकूण वेतना इतका वेतन/निवृत्तीवेतन राखीव नि धी उभारणे आवश्यक असतां ना अशी कार्यवाही महा नगरपालिकेने केलेले नाही.

महाराष्ट्र स्थानिक नि धी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अर्धसमास पत्र क्रमांक 204 दिनांक 21/11/2017 अन्वये कळवून ही अनुपालन सादर केलेले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात आला आहे.

DATKYKM6301 (Ref No : 138, Hmm No : 204)

120 नमुना नं.45 ईमारत परवाना नोंदवही अद्यावत न ठेवणे बाबत.

नगर रचना

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :नगर रचना मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 ईमारत बांधकाम परवाना नोंदवही नमुना नं.45 अदयावत ठेवलेली नाही. नोंदवहीस दिनांकीत नोंदीस कर्मचा-याच्या अधिका-यांच्या स्वाक्ष-यासह शिक्का दर्शवुन प्रमाणीत केलेली नाही. नोंदवहीस किती टक्के, विकास शुल्क, एलबीटी, रेनवॉटर हार्वेस्टींग, दंडनिय व्याज रक्कम घेतली यांचा तपशील दर्शविलेला नाही.

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 चे लेखापरीक्षण मध्ये ईमारत बांधकाम परवाना नोंदवही नमुना नं.45 तपासणी केली असता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली 2010 मधील नियम क्र.32 (2) अन्वये अधिमुल्य प्रती चौरस मीटर आकारणी करुन वसुली केल्याची नोंद नोंदवहीस घेतलेले नाही.

याबाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.ईमारत बांधकाम नोंदवही नमुना नं.45 नियम 75 (6) अनुक्रमांक 1 ते 7 मधील रकाना क्र.5 बांधकामाचे स्वरुप रकाना नं.8 काम पुर्ण झाल्याचा दिनांक, रकाना क्र.9 ताबा घेतल्याचा दिनांक, रकाना क्र.10 कराधान विभागास सुचना दिल्याचा दिनांक, रकाना क्र.11 आकारणीचा दिनांक, रकाना क्र.12 आकारणीची रक्कम तपशील दर्शवुन नोंदवही सर्व रकान्याशी अद्यावत ठेवलेली नाही. नोंदवहीस दिनांकीत नोंदीस कर्मचा-याच्या अधिका-यांच्या स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत. शिक्का दर्शवुन नोंदवही स्वाक्षरीसह अद्यावत ठेवण्यात आलेली नाही. नोंदवहीस किती टक्के, विकास शुल्क, एलबीटी, रेनवॉटर हार्वेस्टींग, दंडनिय व्याज रक्कम घेतली यांचा तपशील दर्शविलेला नाही.

2.नोंदवहीस प्रथम पानांवर नोंदवही पृष्ठांकने नोंदवुन सक्षम अधिका-यांची स्वाक्षरी घेतलेली नाही.

3.मार्च 2014 अखेर नोंदवहीस बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक दर्शविलेला नाही.

4.रकाना क्र. 11 ते 12 कर आकारणी झाल्याचा दिनांक व अनुज्ञेय क्षेत्रफळ काही ठिकाणी तपशीलाची नोंद नोंदवहीस घेतलेली नाही. त्यामुळे कर आकारणी वेळेत झाली का याची खात्री करता आलेली नाही.

5.नगर रचना विभागाने प्राप्त बांधकाम परवाना प्रस्तावाची पडताळणी करुन बांधकाम परवाना मंजुरी व प्रारंभ प्रमाणपत्र अंतीम अभिन्यास मंजुरी फी घेतल्याची नोंद नाही. अतिक्रमण विभागाकडुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन तशी नोंद नोंदवहीस घेण्यात आली नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्रक्रमांक 186 दिनांक 10/11/2017 अन्वये मागणी करुनही पुर्तता न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

HCDSHDM7901 (Ref No : 117, Hmm No : 186)

121 बांधकाम परवाना नोंदवहीस बेरजेत कमी रक्कम दर्शवीलेली वसुल करणे बाबत.

नगर रचना

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

नांदेड वाघाळा महानगरपालिका

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :नगर रचना मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1271575.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1271575.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1271575.00/-

महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 चे लेखापरीक्षण केले असुन नगररचना विभागातील बांधकाम परवाना नोंदवही नमुना नं.45 तपासणी करतांना रजिस्टरला नोंदविण्यात आलेल्या बेरजा तपासल्या असता खालील मालमत्ता धारकांच्या बेरजेत रक्कमा कमी दर्शविलेल्या आहेत. बेरीज करतांना कमी दर्शविलेली रक्कम रुपये 12,71,575/- वसुल करुन मनपा फंडात जमा करुन नोंदवहीस नोंद घेणेबाबत.

नांदेड-वाघाळा महानगरपालीका वित्तीय वर्ष सन 2013-14 चे नगररचना विभागाचे लेखापरीक्षण केले असुन महानगरपालिका लेखासंहिता कलम 75(6) अन्वये बांधकाम परवाना नोंदव ही अदयावत ठेवणेबाबत नियम नमुद आहेत .त्यानुसार महानगरपालिकेने बांधकाम परवाना नोंदवही नमुन नं .45 मध्ये ठेवलेली आहे . बांधकाम परवाना नोंदवही नमुना नं.45 तपासणी केली असता मालमत्ता धारकांना बांधकाम परवाने देण्यात आली असुन नोंदवहीस रक्कम रु.12,71,575/- कमी वसुल केल्याचे बेरजा तपासल्या असता दिसुन आले आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 143 व विकास नियंत्रण नियमावली,2010 नियम क्र.32 (2) अन्वये अधिमुल्य तसेच नियम 124 मध्ये सुधारणा2010 प्रमाणे बाजार मुल्य दरानुसार विकास शुल्क/एलबीटी शुल्क/पावसाळी पुर्नरभरण/ अनामत रक्कम/नॉन स्टॉकींग रक्कम/प्रशमन शुल्क/दंडनिय व्याज रक्कम वसुल झाल्याचे अचुक नोंद घेण्यात आलेल्या नाहीत.

अ.क्र.	मालमत्ताधारकाचे नांव	नोंदवही क्रमांक	पान क्रमांक	नोंदवहीत नोंदवलेली बेरीज	प्रत्यक्ष बेरीज	फरक
1	पद्मा उमेश निहलाणी	2	6	25628	25633	05
2	डॉ. शैला भंजगराव वाडीकर	2	15	32915	32965	50
3	राजेंद्र बन्सीलाल अग्रवाल	2	16	81449	81864	415
4	बनारसीदास रामजीलाल अग्रवाल	2	17	81685	837410	755545
5	सौ. श्यादरी नागराज आईलवार	2	40	30351	38761	8410
6	मारोती दत्तात्रय गोरे	2	50	32643	32644	1
7	डॉ. लिंगारेड्डी राजअण्णा अकीटवार	2	67	31792	31822	30
8	जगन्नाथ विश्वनाथ निलावार	2	76	30240	30260	20
9	शे.शकील अब्दुल मन्नारसाब	2	83	24148	24154	6
10	कमलसिंग शंकरसिंग व इतर	2	107	936061	125078	31472

11	अलकनंदा रमेशकुमार पंडीत	2	114	83231	189332	106101
12	प्रियदर्शनी मनोज मुंदूरकर	2	147	14146	14196	50
13	उत्तम मच्छिंद्रनाथ कांबळे	2	158	16804	16864	60
14	रमेश नागनाथआप्पा बाबगे	2	188	24545	24645	100
15	ईश्वचर नारायणराव पांढरे	2	194	39115	136062	96947
16	संतोष मदनलाल अग्रवाल	4	17	35402	35408	6
17	गोपाल रामेश्वर बत्तलवार	4	37	187022	195226	8204
18	विश्वनाथ विठ्ठलराव जोगदंड	4	42	24522	30477	5955
19	सुरेश चंद्रकांतराव पंडीतराव	4	60	305569	305589	20
20	झीयादीन इरामुद्दीन सिद्दीकी	4	75	29692	29693	1
21	राजकुमार चंदुलाल कासलीवाल	4	103	31487	31497	10
22	बालाजी फर्टीलायझर्स प्रा.लि.	4	106	132408	132468	60
23	साईबाबा मंदीर संस्थान	4	122	76252	92300	16048
24	प्रमोद उत्तमराव बावदाने	4	131	105557	105571	14
25	सलीमशाह मलगशाह	4	131	29126	29161	35
26	बाळासाहेब महादेवराव देशमुख	4	139	46754	32855	13899
27	उत्तम शंकरराव वरपडे	4	143	59488	71990	12502
28	दिनेश नारायण गायकर	4	159	51680	51686	6
29	कुमूदिनी व्यंकटराव घवाड	4	165	29764	29768	4
30	डॉ. रमेश लिंबाजीराव रेंगे	4	179	647907	685907	38000
31	भगवान मारोती बुरकुले	4	188	21640	25931	4291
32	प्रदीप गुणवंत पापटवार	4	195	22050	22650	600
33	सौ. सुनंदा नंदकुमार ढाले	5	2	40631	40633	2
34	संतोष रमेश पवार	5	10	41816	4616	5000
35	गीतादेवी आलोककुमार धूत	5	61	107970	185940	77970
36	धोंडीबा ग्यानोबा वास्तुरकर	5	65	35172	35173	1
37	सुनिल शंकरराव दालावार	5	69	14110	14115	5
38	संदीप चंद्रकांत तुप्पेकर	5	71	7287	7347	60
39	नागनाथ रामराव काबले	5	115	24832	24932	100
40	तरीलोसींग साहेलसींह रामगडीया	5	132	24824	25024	200
41	शेख राउफ शे. गणी साहब	5	153	30135	30137	2
42	सौ. वर्षा संभाजी वर्ताळे	6	34	49812	50632	820
43	रावसाहेब मारोतराव तोरणे	6	69	39759	99040	59281
44	रावसाहेब पोमा राठोड	6	108	33178	33495	1317
45	रजीयाबेगम शेख खैसर	7	39	17929	17930	1

46	अनुराधा अनिल कुलकर्णी	7	46	141590	141591	1
47	कांताबाई बाजीराव बोबडे	7	142	37292	37312	20
48	गजानन हरीप्रसाद हसनपल्ली	7	159	39332	39544	212
49	दिलीपसिंग दशरथसिंग ठाकूर	8	11	213390	241106	27716
					एकुण रक्कम रुपये	1271575

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 अन्वये कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्रक्रमांक 203दिनांक20/11/2017 अन्वये मागणी करुनही पुर्तता न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

HCDSHDM7901 (Ref No : 141, Hmm No : 203)

122 सन 2013-2014 मध्ये महानगरपालिकेने वाहन घसारा निधीची तरतुद केलेली नसल्याने झालेल्या अनियमितते बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

सन 2013-2014 मध्ये महानगरपालिकेने त्यांच्या चल-अचल मालमत्तेचे नुतणीरकरण करणे या उददेशाने घसारा निधी ठेवणे व त्यात प्रतिवर्षी अशंदान जमा करणे आवश्यक असताना घसारा निधीची तरतुद केलेली नसल्याने झालेल्या अनियमितते बाबत.

1.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक यांत्रि की विभागाचे सन 2013-14 लेखापरिक्षण केले महानगरपालिकेने त्यांच्या चल-अचल मालमत्तेचे नुतणीरकरण करणे या उददेशाने घसारा निधी ठेवणे व त्यात प्रतिवर्षी अशंदान जमा करणे आवश्यक असताना मार्च 2014 अखेर याबाबत कोणेतेही विशिष्ट धोरण अथवा मंजुर अर्थ संकल्पात कोणतीही आर्थिक तरतुद केली नसल्याचे दिसुन येत नाही.

2.महानगरपालिकेने घसार निधी अशंदान जमा करणेबाबत उदासिनता दाखविलेली आहे . घसारा निधी

निर्माण करण्याचा कोणतीही उददेश/फलश्रुती मार्च 2014 अखेर झालेली नाही.

3.महानगरपालिकेने घसार निधी बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सक्षम अधिकारी यांचे कडुन वार्षिक घसा-याचे दर निश्चित करुन घसा -याची प्रति वर्ष चल -अचल संपत्ती परिगणना करण्यात आलेली नाही . यामुळे अशंदान रक्कमेची निश्चिती न होणे व रक्कमा जमा न होण्यासारखी अनिमियता झालेली आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .159 दि.26/10/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 118, Hmm No : 159)

123 सन 2013-2014 मध्ये महागनरपालिका वाहन निर्लेखन करतेवेळी झालेली अनियमितते बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष : यांत्रिकी मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

सन 2013-2014 मध्ये महागनरपालिका वाहन निर्लेखन करतेवेळी झालेली अनियमितते बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक यांत्रिकी विभागाचे सन 2013-2014 या वर्षाचे विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिकेकडील खालील नमुद वाहने बंद स्थितीत असल्याने ती निर्लेखन करणेबाबताची संचिकेची पडताळणी केली असता प्रमाणे अनियमिता झालेली आहे.

अ.क.	वाहन क्रमांक	मॉडेल	वाहन बंद	प्रवास किलोमीटर
1	एमएच-26,बी-7160	1998	2007	-

2	एमझेडझेड 886	1986	2006	-
3	एमझेडझेड 530	1983	2003	-
4	सी मिक्सर 1	1974	-	-
5	सी मिक्सर 1	1974	-	-
6	एमएचक्यु	1976	2014	-
7	एमएच-26 7139	1991	2014	-
8	एमएच-26 जे 3991	2002	2014	-

यावर अभिप्राय खालील आहेत.

1.वरील नमुद वाहने पैकी अ.क्र. 1ते 3 ही वाहने 2012-2013 निर्लेखन वेळी लिलाव झालेली नाहीत. याबाबत कोणतीही कार्यवाही झालेचे दिसुन येत नाही.

2.प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना दि . 30/12/2013 रोजी दरनिश्चिती बाबत पत्रव्यवहार करण्यात आलेचे दिसुन आले परंतु माहे 03/2014 अखेर आर.टी.ओ.कडुन दर प्राप्त झालेले नाहीत त्याबाबत कोणताही पाठपुरवा केल्याचे दिसुन येत नाही . याबाबत पालिका प्रशासनाची वाहन निर्लेखनबाबत उदासिनता दिसुन येते. वाहनाची निर्लेखन प्रक्रिया वेळी वेळेत झालेली नसल्याने वाहनाचे घसारा मुल्य कमी झालेले आहे.

3.वाहन निर्लेखन करणेपुर्वी सदर वाहन हे दुरुस्ती करुन ते यपपुढे उपयोगता आणेणे आर्थिकदुष्टया किफायतशीर राहणार नाही याबाबत वित्तिय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला उप विभाग दोन अ .क्र.19 क नियम क्रमांक 69 अन्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी /औद्योगिक प्रशिक्षण संस्था/तंत्रनिकेतन संस्था /सार्वजनिक बांधकाम विभागाचे यांत्रिक विभागतील कार्यकारी अभियंता,शासकीय परिवहन सेवा यांचेकडुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तसे प्रमाणपत्र करुन घेण्यात आलेले नाही . त्यामुळे वाहन निर्लेखन करणेस योग्य होते का याबाबत खात्री करता आलेली नाही.

4. वित्तिय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला उप विभाग दोन अ.क्र.19 क नियम क्रमांक 69 अन्वये लॉरी व इतर अवजड वाहने 200000 कि.मी. व 10 वर्षे, मोटार वाहने व जीप 240000 कि.मी. व 10 वर्ष यापैकी जे नंतर पुर्ण होईल त्या वेळीस वाहन निर्लेखन करणेबाबत नमुद असताना वरील वाहनाचे लॉग बुक लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने ते किती कि .मी. धावले याची खात्री

करता येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .164 दि.26/10/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 119, Hmm No : 164)

124 सन 2013-14 तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांनी महानगरपालिका कार्यालयास केलेल्या वाहन पुरवठा बाबत झालेली अनियमितते.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष : यांत्रिकी मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 216322.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 216322.00/-

सन 2013-2014 मध्ये तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांचेशी केलेल्या वाहन पुरवठा महानगरपालिका अधिकारी/पदाधिकारी यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. प्रवास-1010/ प्र.क्र.2/ सेवा-5, दिनांक 03/03/2010 मधील 5 अन्वये वर्ग-1 व वर्ग-2 शासकीय अधिकारी यांचेसाठी पेट्रोलवरील वाहनासाठी 9 रु. प्रती कि.मी. व डिझेल वरील वाहनासाठी प्रती कि.मी. 7 रुपये दर नमुद असताना जास्त दराने भाडे प्रदान केले बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक यांत्रिकी विभागाचे सन 2013-2014 या वर्षाचे विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिकेच्या खालील नमुद पदाधिकारी व अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी कार्यक्षेत्राच्या बाहेर जाणेसाठी तन्वीर टुरिष्ट सेंटर नांदेड यांचे मार्फत खाजगी वाहन पुरवठा करुन खालील प्रमाणे रक्कमा त्यांना अदा प्रदान झाल्याचे संचिकेवरुन दिसुन आले.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र .प्रवास-1010/ प्र.क्र.2/ सेवा-5, दि.03/03/10 मधील 5 अन्वये वर्ग-1 व वर्ग-2 शासकीय अधिकारी यांचेसाठी पेट्रोलवरील वाहनासाठी 9 रु. प्रती कि.मी. व डिझेल वरील वाहनासाठी प्रती कि .मी. 7 रुपये दरा अन्वये प्रवास भत्ता देयक अदा करणे

आवश्यक असताना जादा दराने प्रवास वाहन भाडे मंजुर केल्याने अनियमिता झालेली आहे.

अधिकारी विभाग					
अ. क्र.	अधिकारी	कालावधी	प्रति कि.मी./प्रति दिवस दर	एकुण दिवस/ कि.मी.	रक्कम रुपये
1	मुख्य लेखापरिक्षक	13/05/13 ते 25/05/13	12	1360	1632(
2	सहाय्यक आयुक्त	15/08/13 ते 19/08/13	14	1947	1801{
3	सहाय्यक आयुक्त	12/08/13 ते14/08/13	14	1287	1801{
4	उप आयुक्त	23/08/13 ते 25/08/13	14	1268	1775:
5	सहाय्यक आयुक्त	28/08/13 ते 29/08/13	14	656	918<
6	विधी अधिकारी	23/12/13	14	580	812(
7	अपर आयुक्त	31/05/13	14	600	840(
8	अपर आयुक्त	14/06/13 ते 19/06/13	14	1300	1820(
9	अपर आयुक्त	22/05/13	14	650	910(
10	सहाय्यक आयुक्त	21/06/13	-	1	640(
11	सहाय्यक आयुक्त	11/06/13	-	1	660(
12	अपर आयुक्त	08/02/14	14	625	875(
13	अपर आयुक्त	10/02/14	14	630	882(
14	सहाय्यक आयुक्त	09/07/13	14	621	870(
15	उपायुक्त	19/09/13	14	670	938(
16	विधि अधिकारी	10/10/13	14	650	910(
17	उपायुक्त	28/10/13	14	650	910(

18	उपायुक्त	25/01/14	12	400	4800
19	लेखाधिकारी	04/10/13	14	640	8960
20	लेखाधिकारी	20/10/13 ते 16/11/13	14	900	12600
				एकुण	216322/-

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.वरील अ.क्र.1 ते 20 नमुद पुरवठा केलेली वाहने ही पेट्रोल वाहन की, डिझेल वाहने आहेत हे लेखा परिक्षणाला उपलब्ध केलेल्या अभि लेखेवरुन स्पष्ट होत नसल्याने परि णामी किती रक्कमेचे जादा प्रदान झाले याची परि गणणा करता आलेली नाही. त्यामुळे अदा रक्कम रुपये 216322/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2.खाजगी वाहने कार्यक्षेत्राबाहेरील वापरासाठी नियंत्रक अधिकारी यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक असताना, तशी परवाणगी घेतल्याचे दिसुन येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमा स पत्र क्र .171 दि.07/11/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 120, Hmm No : 171)

125 सन 2013-14 महानगरपालिका वाहन दुरुस्ती व सुटटे भाग खरेदी बाबत झालेली अनियमिता व आयकर वसुली बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष : यांत्रिकी मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 749098.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 749098.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2672.00/-

सन 2013-14 महानगरपालिका वाहन दुरुस्ती व सुट्टे भाग खरेदी साठी निविदा प्रक्रिया/शासनाशी दरकरार न करणे/शासन मान्यता प्राप्त संस्थाकडुन खर्च वाजवी नसलेबाबत प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेणे/आयकर

रककम कपात न करणे/वित्तिय अधिकार खर्चापेक्षा जादा खर्चा करणे इत्यादी अनियमितते बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक यांत्रिकी विभागाचे सन 2013-2014 या वर्षाचे विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिकेच्या वाहनासाठी देखाल/दुरुस्ती व सुट्टे भाग खरेदी बाबत खालील प्रमाणे अनिमियता झालेली आहे.

अ.क्र.	पुरवठादराचे नांव	देयक माहे	रक्कम रुपये	वसुन आयकर रुपये
1	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	49975	0
2	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	12430	247
3	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	14500	290
4	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	18906	378
5	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	19991	400
6	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	48327	0
7	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	49872	0
8	सेंट्रल अटोमोबाईल	12/2013	55166	0
9	सेंट्रल अटोमोबाईल	12/2013	4725	95
10	सेंट्रल अटोमोबाईल	12/2013	14680	294
11	सेंट्रल अटोमोबाईल	03/2014	39993	0
12	सेंट्रल अटोमोबाईल	11/2013	30905	0
13	सेंट्रल	03/2014	37751	0

	अटोमोबाईल			
14	सेंट्रल अटोमोबाईल	11/2013	49307	0
15	सेंट्रल अटोमोबाईल	12/2013	25349	507
16	सेंट्रल अटोमोबाईल	12/2013	33746	0
17	पारस अटोमोबाईल	03/2014	25930	0
18	सना फॅनिचर	03/2014	20215	0
19	वायडिग, वायरींग	11/2013	82580	0
20	दातार स्प्रे पेटींग	09/2013	30250	0
21	दातार स्प्रे पेटींग	10/2013	30150	0
22	दातार स्प्रे पेटींग	7/2013	10700	214
23	दातार स्प्रे पेटींग	12/2013	12350	247
24	दातार स्प्रे - पेटींग	01/2014	31300	0
		एकुण	749098	2672

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.वित्तिय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला उप विभाग दोन अ.क्र.19 नियम क्रमांक 69 अन्वये पेट्रोलवरील वाहनासाठी प्रतिवर्ष रुपये 50000 व डिझेलवरील वाहनासाठी प्रतिवर्ष रुपये 40000 पर्यंत दुरुस्तीसाठी खर्च मर्यादा आहे त्यावरील खर्चासाठी प्रशासनिक विभाग प्रमु ख यांची मंजुरी आवश्यक असताना महासनगरपालिकेकडुन बरेच वाहनावर प्रदान करण्यात आलेल्या अधिकारापेक्षा दुरुस्तीवर जादा खर्च करण्यात आलेला असुन त्यास प्रशासनिक विभाग प्रमुखाची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

2.महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र मांक:भाप्रस1088/ (2512)/

उदयोग-6, दि.02/01/1992 अन्वये खर्च रक्कम रुपये 1000 पुढील रुपये 100000 पर्यंत दरपत्रके मागवुन व त्यापुढील खर्च जाहिर निविदा मागवुन व रुपये 1000000 खर्चासाठी ई निविदा करुन कामे करणे आवश्यक असताना ही कोणत्याही प्रकाराची कार्यवाही न क रता स्थानिकरित्या विना निविदा/दरपत्रके माविगता काम केलेचे दिसुन येते त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा न होता जास्तीचा खर्च झालेला आहे.

3.शासनाशी सुट्टे भाग खरेदी करणेसाठी दर करार का करण्यात आला नाही . वांरवार एकाच स्थानिक पुरवठा धारकाकडुन सुट्टे भाग खरेदीचे व काम करुन घेण्यात आलेचे दिसुन येते . अधिकृत्त डिलर कडुन वाहन दुरुस्त करण्यात आलेले नाही.

4. वित्तिय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला उप विभाग दोन अ.क्र.19 क नियम क्रमांक 69 अन्वये नमुद वाहन शासकीय कार्यशाळेत दुरुस्त करण्यात आले नसेल तर वाहनावरील दुरु स्तीचा खर्च वाजवी नसलेबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन संस्था, सार्वजनिक बांधकाम विभागाचे यांत्रिक विभागतील कार्यकारी अभियंता , शासकीय परिवहन सेवा यांचेकडुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना ही तसे प्रमाणपत्र करु न घेण्यात आलेले नाही. तसेच नमुद वाहनावर खर्च करताना वित्तीय अधिकारा पेक्षा जादा खर्च झालेचे दिसुन येते.

5.खालील नमुद देयके तपासणी केली आयकर अधीयन 1961 नियम 194 सी अन्वये देयकामधुन 2टक्के आयकर केलेला नसल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे . तरी त्यांचेकडुन त्यां चे नांवासमोर दर्शविले आयकर कपात रक्कम रुपये 2672 ही संबधिताकडुन वसुल करुन घेवुन शासन खाती जमा करण्यात यावी.

6.वाहन ज्या अधिका -याच्या अधिपत्याखालील आहे त्या अधिका -याचा वाहन दुरुस्ती बाबत अहवाल घेण्यात आलेला नाही. चालकाचे अहवाल करुन वाहन दुरुस्त करण्यात आले ले असुन देयक प्रमाणित करण्यात आलेली नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .160 दि.26/10/2017 व 169 दि.03/11/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 121, Hmm No : 169)

126 सन 2013-2014 मध्ये महागनरपालिकेसाठी खाजगी वाहन भाडे करार व अदा रक्कम यामध्ये झालेल्या अनियमितते बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष : यांत्रिकी मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 100000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 100000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 50000.00/-

सन 2013-2014 मध्ये महागनरपालिकेसाठी तन्वीर टुरिष्ट सेंटर नांदेड यांचेशी खाजगी वाहन भाडे करार/वसुली रक्कम व अदा रक्कम यामध्ये झालेल्या अनियमितते बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक यांत्रिकी विभागाचे सन 2013-14 या वर्षाचे विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिकेच्या अधिकारी यांना वाहन उपलब्ध करुन देणेसाठी तन्वीर टुरिष्ट सेंटर नांदेड यांचे मार्फत मनपा आदेश क्र.नावाशामनपा/यांत्रिकी/वि/3989/13 दि.01/06/2013 अन्वये मासिक भाडे तत्वावर खाजगी वाहने पुरवठा करण्यात आलेली आहेत.

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.नांदेड वाघाळा महानगरपालिकेसाठी खाजगी वाहन पुरवठा करणेसाठी दि .08/11/2012 चे स्थानिक दैनिक प्रजावनी या दैनिक वृत्त पत्रामध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आलेच्या दिसुन आले महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र . जाहिरात 2009/प्र.क.137/का-34 दि 29/08/2009 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नसल्याने निविदेस आवश्यक त्या प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नसल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही.

2.निविदा मध्ये वाहन पुरवठा कालावधी दिनांक 01/12/2012 ते 30/11/2013 पर्यंत नमुद असताना प्रत्यक्षात तन्वीर टुरिष्ट्र सेंटर नांदेड यांचे दर निश्चिती करताना दि .01/06/2013 ते 31/05/2014 या कालावधीसाठी करण्यात आलेला आल्याने निविदा व करार यांचेमध्ये विसंगती दिसुन येते.

3.तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांचेशी वाहन पुरवठा करार करणेपुर्वी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील नमुद वाहन पुरवठा करणेबाबतचे दर उपलब्ध करुन घेणे आवश्यक असताना त्यांचेकडुन तशी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4.निविदा सुचना मध्ये निविदा कोरे फॉर्म फी , निविदा इसार रक्कम यांचा उल्लेख नसल्याने नमुद निविदा प्रक्रियामधुन किती रक्कम प्राप्त झाली याची खात्री करता आलेली नाही तसेच निविदा मंजुर धारकाकडुन रक्कम रुपये 50000/- ही इतकी सुरक्षा ठेव रक्कम जमा करुन घेण्यात आली नाही.

5.सन 2013-2014 मध्ये महानगरपालिकेसाठी तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांचेकडुन किती वाहन उपलब्ध् पुरवठा करण्यात आली त्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करुन दिली नाही /वाहनाची लॉग बुक/ आर.टी.ओ. रजिस्ट्रर प्रमाणपत्रे/वाहन चांगल्या स्थिती बाबत व वाहन आर .टी.ओ. कार्यालया कडुन वाहन टुरिष्ट्र परवाना असणे आवश्यक असणे आवश्यक आहे परंतु त्याबत कोणतीही अभिलेखे तपासणीस उपलब्ध करुन दिलेले नसल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही.

6. तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांचेशी केलेल्या करारपत्रात अधिकारी यांचेसाठी मासिक 1200 कि.मी.प्रवास नमुद करण्यात आलेला आहे . परंतु प्रत्यक्षात झालेला प्रवास 1000 कि.मी.पेक्षा कमी आहे. यावरुननिवीदेच्या अटी व शर्ती यांचा अभ्यासपुर्ण समावेश केलेला नसल्याचे आढळुन येते.

7.करविभागासाठी एकुण दोन वाहने तन्वीर दुरिष्ट्र सेंटर नांदेड यांनी पुरवठा केली . प्रति महिना रुपये 25000/- देय असताना रुपये 50000/- अदा केलेले आहे. वाहन भाडयाची गणना ही मासिक रक्कमेशी समित करण्यात येवुन जादा अदा करण्यात आलेली रक्कम रुपये 50000/- ही तन्वीर टुरिष्ट सेंटर यांचेकडुन वसुल करुन महानगरपालिका फंडात जमा कारावी.

अ. क्र	अधिकारी	कालावधी	प्रति दिन भाडे	दिवस	अदा रक्कम रुपये	वसुल रक्कम रुपये
1	करविभागसाठी जीप -1	12/03/14 ते 31/03/14	2500	20	50000	25000
2	करविभागसाठी जीप -2	12/03/14 ते 31/03/14	2500	20	50000	25000
				एकुण	100000	50000

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .175 दि.08/11/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात

आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 122, Hmm No : 175)

127 सन 2013-2014 मध्ये महागनरपालिका वाहन लॉग बुक/ हिस्ट्री शीट मधील नोंदीच्या अनियमितते बाबत.

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष : यांत्रिकी मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2013-2014 मध्ये महागनरपालिका वाहन लॉग बुक प्रमाणति /गोल शिक्याने मुद्रीत कलेले नसणे/इंधन वापर/प्रवास/मासिक गोषवार व हिस्ट्री शीट पानावरील वाहनाचा प्रकार पेट्रोल/डिझेल/इंधन टॉकी क्षमता/चेचेस नंबर इत्यादी महतपुर्ण नोंदी जसे इंधनावरील खर्च/सुट्टे भागावरील खर्च इत्यादी बाबची इतर बाबतच्या महतपुर्ण नोंदी नसल्याने व तपासणीस उपलब्ध करुन दिलेली नसल्याने झालेल्या अनियमितते बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिक यांत्रिकी विभागाचे सन 2013-14 या वर्षाचे विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिकेच्या मालकीच्या खालील नमुद वाहनाचे लॉग बुक/हिस्ट्री शीट पडताळणी केली असता महतपुर्ण नोंदी नसल्याने अनियमिता झालेली आहे.

1.लॉग बुक		
अ.क्र	वाहन क्रमांक	अनियमिता
1	एमएच -26, आर-1111	दि.18./04/13 रोजी 52 लिटर इंधन भरणा करुन प्रवास 520 कि.मी.केल्याचे नमुद आहे परंतु सदर प्रवास कोठे केला हे नमूद आहे.
2	एमएच -26, आर-7000	दि.17/10/13 ते 31/03/14 या कालावधीचे लॉग बुकला नोंद

		घेण्यात आलेली नाही . सदर कालावधी मध्ये 45 लिटर इंधन खर्च झाल्याचे नमुद आहे.
3	एमएच -26, जे -1111	दि.11/11/13 ते 30/11/13 या कालावधीचे दोन लॉग बुक मध्ये नोंदी करण्यात आलेल्या आहेत . एका लॉक बुक मध्ये 139 लिटर व दुस-या लॉग बुकमध्ये 91 लिटर इंधन वापरले आहे.
4	एमएच -26, 4505	दि.08/09/2013 व 12/09/2013 रोजी रविवार सुटटी असल्याने गाडी बंद असुन अनुक्रमे 9 लिटर व 1 लिटर इंधन खर्ची दाखविण्यात आलेली आहे.
5	एमएच -26, एच -7350	दि.25/03/14 रोजी 4 लिटर व दि .27/03/14 रोजी 3 लिटर इंधन कोणत्या कामासाठी प्रवास/खर्च केले हे नमुद नाही.
6	एमएच -26, सी -1796	माहे 08/2013 पासुन नोंदी नाहीत.

वरील नमुद लॉग बुक प्रमाणित / गोल शिक्कयाने मुद्रीत करण्यात आलेले नाही . तसेच बरेच वाहनावर मासिक गोषवार काढण्यात आलेला नाही.

खालील नमुद वाहनाचे लॉग बुक तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही . सदर वाहनामध्ये इंधन/वापर/प्रवास व इतर बाबतच्या नोंदी याची खात्री करता आलेली नाही.

एमएच-26,क्यु 5000	एमएच-26, सी-2730	एमएच-26,ई-283	एमएच-26,ई-273
एमएच-26, 1556	एमएच-26, 445	एमएच-26, 1754	एमएच-26, 1753
एमएच-26, 3103	एमएच-26, 3103	एमएच-26, 3104	एमएच-26, 3105
एमएच-26, 3106	एमएच-26, 3108	एमएच-26, 4506	एमएच-26, 4508
एमएच-26, 559	एमएच-26, क्यु-2856	एमएच-26, 4118	एमएच-26, 8159
एमएच-26, 7320	एमएच-26, 7253	एमएच-26, 7360	एमएच-26, 4880
एमएच-26, आर-172	एमएच-26, 7764	एमएच-26, 6828	एमएच-26, 3991

2.हिस्ट्री शीट

1.वाहन हिस्ट्री शीट पाहिल्या पानावरील वाहनाचा प्रकार पेट्रोल /डिझेल/इंधन टॉकी क्षमता /चेचेस नंबर इत्यादी महतपुर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

2.हिस्ट्री शीट मध्ये रुपये 500 पेक्षा कमी खर्चाच्या नोंदी/विमा नोंदी करण्यात आलेल्या नाहीत.

3.अधिकारी यांचे प्रमाणित स्वाक्षरीसह वाहन हिस्ट्री शीट प्रमाणित / गोल शिक्कयाने मुद्रीत करण्यात आलेले नाही..

4.परिणामी सदर वाहनावरील होणा-या खर्चाबाबतची अचुकता जसे इंधनावरील खर्च/सुट्टे भागावरील खर्च इत्यादी बाबची तपासणी/खात्री करता आलेली नाही.

एमएच-26, आर-1111	एमएच-26,जे -1111	एमएच-26,आर-1177	एमएच-26, बी-4507
एमएच-26, ई-445	एमएच-26, 5555	एमएच-26, 1754	एमएच-26, ई-3103
एमएच-26, ई-3107	एमएच-26, ई-3108	एमएच-26,सी 1796	एमएच-26, 4503
एमएच-26, 4504	एमएच-26,आर-559	एमएच-26,क्यु-2856	एमएच-26, 8159
एमएच-26, एच-7320	एमएच-26, 7350	एमएच-26,एच-7764	एमएच-26,एच-7765
एमएच-26, एच-6828	एमएच-26, 1368	एमएच-26, ई-3104	एमएच-26, ई-1556

खालील नमुद वाहना हिस्ट्री शीट मध्ये एकही नोंद करण्यात आलेली नसल्याने वाहन हिस्ट्री शीट मध्ये आवश्यक असलेल्या वाहनाचा प्रकार पेट्रोल-डिझेल/इंधन टॉकी क्षमता/चेजीस नंबर/वाहन विमा तपशील/वाहन दुरुस्ती खर्च /मासिक गोषवार इत्यादी महतपुर्ण नोंदी घेतलेल्या आढळुन आले ल्या नसल्याने सदर वाहनावरील होणा -या खर्चाबाबतची अचुकता जसे इंधनावरील /सुट्टे भागावरील खर्च इत्यादी बाबची तपासणी/खात्री करता आलेली नाही.

एमएच-26, एन-1755	एमएच-26, ई-3106	एमएच-26,एन-8935	एमएच-26,आर-7000
एमएच-26, सी-2730	एमएच-26, ई-283	एमएच-26, 273	एमएच-26, 3680
एमएच-26, 1753	एमएच-26, 4118	एमएच-26,एन-8935	एमएच-26, 6598
एमएच-26, 3991	एमएच-26,एन-8926	रोड रोलर	टॅकर

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 सुधारणा 2011 (अन्वये) कलम 6 नुसार अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .161,162 दि.26/10/2017 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 123, Hmm No : 161)

128 लेखा विभागाने वेतन राखीव निधी पुरेसा न ठेवणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 200563.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 200563.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 366 व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 91 प्रमाणे वेतन राखीव निधी या नावाने स्वतंत्र निधी उभारणे आवश्यक आहे. विभागाने नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

सन 2013-2014 मध्ये महानगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 91 प्रमाणे वेतन राखीव निधी ठेवण्यात आलेला आहे. सदर निधीबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 366 व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 91 प्रमाणे वेतन राखीव निधीचे स्वतंत्र खाते ठेऊन सर्व अधिका -यांच्या व कर्मचा-यांच्या एका महिन्याच्या वेतन व भत्त्याच्या एकुण रकमे इतकी रक्कम दरवर्षी दि .31 डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी हस्तांतरीत करुन निर्धारीत केलेल्या कार्यपध्दतीस्नुसार ठेवण्यात येईल तसेच मनपा निधीपासून वेगळा व स्वतंत्र ठेवण्यात येईल .वेतन राखीव निधी ठेवल्यास भविष्यात ज्या महिन्यात महानगरपालिकेस कमी उत्पन्न प्राप्त होऊन कर्मचा -यांचे वेतन देण्यामध्ये अडचण होते त्यावेळी या निधीमधून वेतन देणे आवश्यक आहे .तथापि महानगरपालिकेने वेतन राखीव निधीत रक्कम रु .200563/-ची गुंतवणूक AXIS बॅकेत ठेव म्हणून ठेवण्यात आलेली असून निर्धारीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार वेतन राखीव निधी ठेवण्याची कार्यवाही केलेली नाही.

2.महाराष्ट्र न गरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 101(1) नुसार वेतन राखीव निधीचा लेखा नमूना क्रमांक 73 व 74 प्रमाणे विहीत नमून्यात परिरक्षित करणे आवश्यक असतांना नियमोचित कार्यवाही झालेली नाही.तरी नियमानुसार निधीची नोंदवही परिरक्षित करणे आवश्यक आहे.

3.सदर वेतन राखीव निधीत नि यमानुसार एकूण कर्मचा -यांच्या एक महिन्याच्या वेतनाच्या दरवर्षी दि.31 डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी हस्तांतरीत करून निर्धारीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार रक्कम राखीव निधीत ठेवण्यात आलेली नसल्याने निधी ठेवण्याचे प्रयोजन सफल झालेले नाही.

CCRVNRM6701 (Ref No : 124, Hmm No : 193)

129 पाणीपुरवठा राखीव निधी पुरेसा न ठेवणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3586320.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3586320.00/-

